म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १५८५

# सुवर्णरेखा

***

पंडिता सुमतिबाई शहा

REFBK-0015135


सुवर्ण रेखा
सुमतिबाई शहा

४२०३२
निबंध
१६८७
२२/११/६६
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ४२०३२ वि: निबंध
क्रमांक १६८७ नों: दि: २२/११/६६
१८८९
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१५१३५
ग्रंथ प्रत
REFBK-0015135
REFBK-0015135

# सुवर्णरेखा

पंडिता सुमतिबाई शहा

: प्रकाशक :

न. गौ. व्होरा,
सुरस ग्रंथमाला,
सोलापूर.

प्रथमावृत्ति १९३३

मूल्य तीन रुपये

सर्व हक्क प्रकाशकाधीन

: मुद्रक :

नारायण हरि कोल्हटकर,
महाराष्ट्रमित्र मुद्रणालय,
७७, शुक्रवार पेठ, सातारा.

... समर्पण ...

माझ्या परमपूज्य वडिलांस

▲ ▲ ▲

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ........................ वि: ........................
नोंदि: ..................
१२०८५

# सुवर्ण-रेखेच्या निमित्तानें

●●

महाराष्ट्रीय रसिक वाचकांच्या सेवेंत हें लहानसें पुष्प सादर करतांना मनांत नाना प्रकारच्या हृद्भावांची गर्दी होत आहे. महाराष्ट्रीय जीवन गेल्या कांहीं वर्षांत इतकें बदलत आहे, कीं त्याचें मोजमाप करणें केवळ अशक्य आहे.

आजचें जीवन इतकें गतिमान होत चाललें आहे कीं, आत्म-पुष्करणींतील कमलांचा सुगंध आपणाला जाणवत नाहीं. अंतर्यामीं वसत असलेल्या दिव्य चेतनेचें दर्शन होणें अवघड होत चाललें आहे. जीवनाला व्यापून असणारें परमेश्वरी तत्त्व जणुं लोप पावत आहे.

जीवनाला आलेली मरगळ दूर करण्यासाठीं व नव्या तेजानें जीवन बहरावें म्हणून हृदयांत उठणाऱ्या तरंगांना शब्दाचा आकार या 'सुवर्ण-रेखें'त मी दिला आहे.

यांतील आत्म्याच्या सादाला दिलेला प्रतिसाद वाचकांना अवश्य आवडेल अशी खात्री वाटते. गुरुदेव टागोरांच्या गीतांजलीच्या मार्गानें जाण्याच्या या प्रयत्नास किती सामर्थ्य व तेज प्राप्त झालें आहे हें वाचकांनीं ठरवावयाचें आहे. परंतु जीवन-साधनेच्या वीणा-तरंगांतील हें तरंग आपणांस परातत्त्वाचा स्पर्श घडवूं शकतील असें नम्रतेनें वाटतें.

— लेखिका

●●

– पंडिता सुमतिबाई शहा –

## प्रकाशित पुस्तकें

* हृदगंध
* भावपल्लवी
* ज्ञानगीता
* भावगीता
* महापुराण
* रामायण
* सुवर्ण-रेखा

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
४२०३२ वि: निबंध
नों: दि: २२।११।९५
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१५८४
१४९३४

# सुवर्ण रेखा

## आत्मन् !

किती तूं भाग्यशाली ! अंतरंगांत असलेल्या आनंद-स्वरूपांत तूं रमलास. परमात्मदर्शनास तूं उत्कंठित झालास. तुझ्या उन्नतीसाठीं अहोरात्र झटणारे, तळमळणारे कितीतरी पाठीराखे असतां तूं कां अस्थिर व्हावें ? तुझी प्रेमळ दृष्टि जरा इकडे वळव.

हा पहा वायू, प्रत्यक्ष प्राणदाता, तुला श्वासोच्छ्वासाच्या द्वारें जीवनप्रदान करीत आहे.

तुला आध्यात्मिकता लाभावी म्हणून हा झरा दररोज नवजीवन ओतीत आहे.

फलभारांनीं विनम्र झालेल्या वृक्षलता पहा ! तुझ्या शरीरधारणेसाठीं आपलें सर्वस्व अर्पूं पहात आहेत. तुझ्या अंतःप्रभूचें दर्शन घेण्यास तूं रित्या हस्तानें जाऊं नयेस म्हणून हीं नवकुसुमें फुलबागेंत फुलत आहेत.

अंधारांत तुझें दर्शन दुराराध्य होईल म्हणून सहस्ररश्मि भगवान् सूर्यनारायण हा प्रकाश देण्यास नियमित उगवत आहे. हा गुलाबी संधिप्रकाश समाधिकालाची पूर्वतयारी करून देत आहे.

आत्मोन्नति व्हावी म्हणून हें विश्वकुटुंब तुझ्या बाल्यापासून जोपासनेची पराकाष्ठा करीत आहे.

भोंवती पसरलेला हा समाज तुझ्या विकासाचा मार्ग खुला करीत आहे. हा पहा शेतकरी! तुला अन्नदान करावें म्हणून अहोरात्र हाडाचीं काडें करीत आहे. हा पहा कोष्टी! आपल्या कौशल्यानें तुझ्याचसाठीं वस्त्रें विणीत आहे. हा कुंभकार, चर्मकार, सुवर्णकार, तुझा शेजारी, तुझे बांधव हे सर्वच तुझे हितेच्छु आहेत.

तूं जिथें बसतोस, उठतोस, धान्य पिकवतोस, माड्या हवेल्या उठवतोस, ती ही धरित्रीमाता तुला प्रेमानें पोटाशीं धरत आहे.

★ ★

# पुराणपुरुषा !

आजपर्यंत पृथ्वीच्या पाठीवर झालेले सर्व महात्मे गेल्या अनंत जन्मांतील तुझे सांगाती आहेत. त्यांचें अस्तित्व व साहचर्य याचा फायदा तुला तुझ्या निरनिराळ्या अनेक जन्मांपासून झाला आहे. त्यांनीं आपल्या निष्काम सेवेनें तुझी उन्नतीच साधली आहे.

तूं आतां वैभवशाली मानव झालास. त्यामागील लहान अशा क्षुद्र, दरिद्री जन्मांचें तुला स्मरण कसें होईल ?

वैभवानें माणसाचे डोळे फिरतात. तूं वैभवानें दिपून जाऊं नयेस म्हणून तर तुला तुझ्या मागील जन्माची आठवण मी करून देणार आहे.

सूक्ष्म जंतूपासून वनस्पतीपर्यंत तुझें परिवर्तन झालें.

नंतर तूं किडा, डांस मुंगी, वानर, कुत्रा, हत्ती अशा अनेक प्रकारच्या जीवयोनींत फिरत राहिलास आणि नंतर नाना सुकृतांच्या बळानें व पुरुषार्थानें तुला हा मानवदेह मिळाला आहे.

असें असतां या दुर्लभ जन्मांत तूं अहंकाराला जर बळी पडशील तर...... तर पुनः तेंच...पुनः क्षुद्रयोनि...अधःपात...! अहंकारानें तुझा सर्व पुरुषार्थ नष्ट होईल आणि पुनः तूं एक क्षुद्र जीव !

पण छे ! हें तूं करणारच नाहींस. कारण अनेक पुण्यपुरुषांचा आणि तुझा सहवास घडला आहे, त्यांचें आगमन तुझ्या दारीं पुनः पुनः होत आहे.

हे महापुरुष तुझ्या कल्याणाची भिक्षा मागण्यासाठीं आले आहेत. त्यांना दुखवूं नकोस.

थोर पुरुषांचें आगमन घरीं व्हायला पूर्वजन्मीचें पुण्य लागतें. उठ ! त्यांचें स्वागत कर. त्यांच्या थोरवीनं तुझं जीवन हिऱ्यासारखं प्रकाशमान होऊं दे.

जर तूं त्यांना धनरूपानें मोबदला देऊं म्हणशील तर फसशील. तूं त्यांना अन्नवस्त्रांनीं परतफेड करूं म्हणशील तर चुकशील. त्या थोर महात्म्यांचा उपयोग स्वतःच्या भोगविलासासाठीं करण्याचा विचार करशील तर बुडशील. त्यांचें स्वागत करण्याचा एकच मार्ग आहे. अंतरात्मदर्शनानें, विशुद्ध भावननेनें, पवित्र भावनेनें, पवित्र विचारानें, आध्यात्मिक उन्नतीनें या थोरांचें ऋण तुला हलकें करतां येईल. तुझ्या आत्मिकविकासानें वाढणाऱ्या चंद्राला पाहून फुलणाऱ्या कमलाप्रमाणें हे साधु पुरुष आनंदित होतील, स्वतःला ते धन्य समजतील.

म्हणून विकारांचें धुकें दूर कर. विवेकसूर्याचीं किरणें फाकूं देत. सर्वत्र प्रकाशाचें साम्राज्य होऊं दे.

नेहमी चांगले विचार मनांत घोळत राहण्यानें आत्मिक शक्तीची प्रचंड वीज हृदयांत तयार होते. या शक्तीनेंच धर्मसाधनेचें थोर कार्य पार पडूं शकतें. हीच शक्ति पतितांच्या उद्धाराचें कंकण बांधते. ती त्यागी जीवनाची जतनी आहे. सभोंवताली राहणाऱ्या जीवाची सुखसमृद्धि होणण्यासाठीं ती अटोकाट प्रयत्न करते. ती तृषार्तांसाठीं तळीं बांधते. पांथस्था-

साठीं रस्ते व सराया तयार करते. ज्ञानक्षुधितासाठीं विद्यालयें स्थापन करते. अपंगासाठीं अन्नालयें उघडते. जनसेवेची रुचि निर्माण करते. धर्मस्वातंत्र्याच्या प्रभावनेसाठीं राष्ट्रस्वातंत्र्य इच्छिते. पारतंत्र्याच्या तिटकारा व स्वातंत्र्याचें प्रेम निर्माण करण्यासाठीं ती अज्ञानी जीवांना सज्ञान करूं पाहते. ही तुझी धर्मसेवा, लोकसेवा नि देशसेवा तुला उन्नत स्वरूपाप्रत खात्रीनें पोहोंचवील.

खरा विवेकच आत्मोद्धाराची गुरुकिल्ली आहे. या विवेका-पुढें जगांतील सारे प्रश्न सुटतात. ही सारासार विचारशक्तीच कळकळीचा जनपदहितकर्ता निर्माण करते.

भौतिक सुखसागरांत पोहतांना कदाचित् तुझा हा विवेक अभंग राहील; पण शरीर जर्जर झालें, गात्रें शिथिल झालीं आणि मृत्यु समीप आला तर टिकेल का तुझा हा विवेक ?

अशा खडतर प्रसंगीं विवेक अखंड राहावा अशी तुझी इच्छा असेल तर त्यासाठीं तुला साधना करावी लागेल. साधने-शिवाय हा अनन्यसाधारण विवेक चिरस्थायी कधींच होणार नाहीं. उदबत्तीस आपला परिमल दुसऱ्यास अर्पण करण्याच्या अगोदर स्वतःला जाळून घ्यावें लागतें. आपल्या सुगंधानें दुसऱ्यास प्रमुदित करण्यासाठीं कापूर स्वतःचें बलिदान करतो. आपले मोत्यासारखे दाणे अर्पून सर्वांना जीवन देणाऱ्या कणसास स्वतःस कापून घ्यावें लागतें आणि आपलें बालक थोर व्हावें म्हणून माता आपल्या सर्व सुखाचा त्याग करते.



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थापना
अनुक्रम ८2032 वि: निबंध
क्रमांक ९२८७ नों: दि: ...

म्हणूनच हे माझ्या मित्रा ! उठतां, बसतां, खातां, पितां, सर्वत्र विवेकाचें साम्राज्य कायम कर. त्या साम्राज्याचा तूं सम्राट हो.

ही विवेकशक्ति तुझ्या दैनंदिन व्यवहारांतहि दिसली पाहिजे. आत्मज्ञानाच्या गप्पा मारणें सोपें आहे. तें अंगीं बाणवून घेणें अत्यंत कठिण असते. तुझ्या आचारविचारांत संगति पाहिजे. ही संगति ( Harmony ) निर्माण व्हायला विवेकाची साधना आवश्यक आहे. न्यायाच्या कांटेकोरपणानें सर्व भौतिक व्यवहार तूं केले पाहिजेस.

निसर्गाकडे पहा. निसर्गांतली प्रत्येक गोष्ट न्यायी दिसेल. तो पहा उदार वृक्ष आपली छाया शत्रूमित्रांना द्यायला तयार आहे. हा पहा ढग. श्रीमंत-गरीब असा भेद न करतां तो सर्व ठिकाणीं समानतेनें जल-वर्षाव करीत आहे. हा सामान्य असा दीप बघ. घरच्या माणसांना उजेड करावा व बाहेरच्यांना अंधार करावा, अशी अन्यायाची वृत्तीच त्याच्याजवळ नाहीं. ऊस हा अंतर्बाह्य गोड; लावणी करणाऱ्या व कापणाऱ्या दोघांनाहि गोड. सामान्य कुत्रा ! पण तोहि मालकाचें इमान पाळतो.

निसर्गानें घालून दिलेला कायदा जर पाळलास तर तूं न्यायी होशील. पण हें कर्म तरी काय सोपें आहे ?

विवेकी माणसाला, अंतर्बाह्य न्यायी माणसाला हें निसर्गाचें विश्वकुटुंबत्व पालन करणें सोपें आहे. ज्याचा आत्म्याच्या अमरतेवर विश्वास आहे, अखिल जीवसृष्टीवर जो मातेच्या ममतेनं व न्यायाधीशाच्या निःपक्षपातीपणानं प्रेम करूं शकतो

तोच आत्मोन्नतीच्या मार्गावर अग्रेसर होतो. म्हणूनच आदर्श जीवनाची पहिली पायरी म्हणजे विवेक – सारासार विवेक.

तुझी दृष्टी आतां व्यापक बनली आहे. विशाल जीवनाचा संकेत तुला आतां मिळाला आहे. तुझा व्यवहारसुद्धां व्यापक बनला आहे. तूं आतांपर्यंत अंतर्यामीं असलेल्या अगाध जगाकडे पाहिलेंच नव्हतेस. पण आज तुला आंत पहातां येऊं लागलें. यापुढें अंतर्यामी जग व बाह्य जग या दोहोंशीं तुला व्यवहार करायचा आहे.

तूं अंतर्यामी जगांतील व्यवहारांत दक्ष आणि चोख ठरशील तर तुझा बाह्य व्यवहारहि तितकाच सचोटीचा ठरेल. अंतर्जगाशीं व्यवहार करतांना तूं जितका शांत, स्थिर असशील, तितकीच शांति, स्थिरता, तुझ्या बाह्य व्यवहारांत प्रतिबिंबित होईल. मग बाह्य व्यवहारावरून जग तुझी परीक्षा करील. ती तुझी कसोटी बनेल. म्हणून तुझे सर्व व्यवहार आध्यात्मिकतेच्या व्यापक भूमिकेवरून होऊं देत.

मग पहा तुझ्या साऱ्या अंतर्बाह्य वागणुकींत एक प्रकारचें अलौकिक सौंदर्य झळाळूं लागतें कीं नाहीं !

★ ★

# ‘ सौजन्य !’

सौजन्य ही आत्म्याची प्रभा आहे. त्या प्रभेनं तुझं जीवन प्रकाशमय होत आहे. अंधारांतील वाटचाल संपत आली आहे.

अज्ञान आणि मोह यामुळं सौजन्य आणि दुर्जनता यांतील फरक तुला कळत नव्हता. दुर्जनांच्या सहवासानं सौजन्याला तूं पारखा झाला होतास.

पण वेडचा ! सर्पाला कितीहि दूध पाजलें तरी त्याचं रूपांतर विषांत होतं, हें नाहीं का तुला ठाऊक ?

* *

# ‘ परापूजा ’

साधनेसाठीं आवश्यक असणारीं साधनें हींच तुला आकर्षक वाटली ! हीं साधनं स्वतःचा विकास साधण्यासाठीं असतां तूं त्यांच्याच पाठीशीं लागलास. शरीरांतील आत्मतत्त्व विसरून शरीरालाच आत्मा समजून तूं त्याची पूजा केलीस !

ही पूजा ‘ परापूजा ’ नाहीं. ही परपूजा आहे. आत्माच पूज्य आहे; त्याहून जें जें वेगळं आहे तें तें पर आहे, आणि जें ‘ पर ’ आहे तें पूज्य नाहीं. त्याची पूजा केल्यानें कांहीं तूं मुक्त होऊं शकणार नाहींस !

सोड ती परपूजा. तुझ्यांतील जीवतत्त्व ओळख. सारे प्रश्न त्यालाच विचार. आंतील जीवतत्त्व जागृत कर म्हणजे तूं ज्ञाता होशील.

तूं सुखी आहेस का ?

कारण......

जो स्वतः सुखी असेल तोच इतरांना सुखी करूं शकेल !

दुसऱ्यांनीं सुखी व्हावें म्हणून स्व-सुखाचा त्याग करणारीं कितीतरी माणसें आहेत. स्वार्थवृत्तीचा त्याग करून दुसऱ्यांचीं मुखमंडलें प्रफुल्लित करण्यासाठीं कितीतरी सज्जन अहोरात्र झटतात. त्यांचीं हृदयें शांतिरसानें वाहत असतात; त्यांची शांति, तितिक्षा दुर्जनांच्याहि आघातानें ढळत नाहीं. असं सांगतात--

एकदां एक विंचू नदींत बुडत होता. त्याला वांचविण्यासाठीं एक साधु पुनः पुनः प्रयत्न करीत होता. प्रत्येक वेळीं विंचवानें

आपल्या नांगीनें त्याला दंश करावा व साधूनें त्याला धरावें. शेवटीं सर्व वेदना सहन करून त्या सज्जनानें त्या विंचवास बाहेर काढलें व त्याचा प्राण वाचविला. लोकांना आश्चर्य वाटले. केवढी ही शांति व तितिक्षा ! तो दुर्जनाबरोबर दुर्जन झाला नाहीं. सज्जन आपला स्वभाव सोडीत नाहीं. चंदन सदासर्वकाळ आपला सुगंधच देणार !

एकदां का अंतःकरण शांतिपरिमलानें दरवळलें तर तें कधींच दुर्गंध निर्माण करणार नाहीं.

★ ★

# वैमानिका !

शाश्वत सुख मिळावं म्हणून तूं किती शोध करतोस ? तें सुख लाभावं म्हणून या देहाचं विमान करून तूं स्वतः वैमानिक झालास. या शरिराच्या विमानांत बसून ८४ लाख योनींचं तूं दर्शन घेतलंस.

स्वर्ग, आकाश, पाताळ अशा अनेक लोकांतून तें विमान तूं फिरवून आणलेंस. केवढी तुझी झेप ! केवढें सुंदर तुझें विमान ? पण इच्छित स्थळाचा शोध तुला लागला का ? विशाल आकाशाच्या पंक्तीला धरून तूं उंच उंच उडूं लागलास. आकाशाच्या अग्रभागीं तुला जागा सांपडली. तेथें अनंत आत्मे सिद्धशिलेवर बसलेले तूं पाहिलेस. त्या जागेंत स्थिर होण्यासाठीं तूं फिरलास ! पण तुला आसरा मिळाला का ?

कसा मिळणार तुला आसरा ? तूं या देहाच्या तावडींत सापडला आहेस. क्रोध, मान, मद, मत्सरादि घाणीमुळे तुझी दृष्टि, तुझं ज्ञान, तुझं चारित्र्य विकृत झालं आहे. ती विकृति तूं दूर कर म्हणजे हें शरीर सोडून तुला सिद्धलोकांत जातां येईल. तेथेंच तुझ्या जीवाला स्थिरता, शांति, सुख मिळूं शकेल.

आत्म्यालाच वाहन व आत्म्यालाच सारथी केल्याशिवाय तुला इष्ट स्थळीं कसं जातां येईल ?

तूं आतां आत्मज्ञानी झालास. ज्ञानवान् व अज्ञानी माणसांच्या भावनांतील अंतर अवगत झालं.

पर–वस्तु श्रेष्ठ समजून अज्ञानी माणूस त्याचेंच ग्रहण करतो. त्याचा विचार ऐहिक जीवनाभोवतीच घोटाळत असल्यानें त्याचीं व्रतें कामनासिद्धीच्या इच्छेनें होतात निर्विकल्प व्रतनिष्ठा त्याच्याजवळ दिसत नाहीं.

ज्ञानी माणसाचें सोडणें व घेणें वेगळ्या प्रकारचें असतें. तो कषायाचा त्याग करतो व आत्मिक गुणांचें ग्रहण करतो. आत्मिक विकास हाच त्याच्या जीवनाचा ध्येयबिंदू असतो. ज्या गोष्टींचा ज्ञानी त्याग करतो त्या वस्तू अज्ञान्यास ग्राह्य वाटतात व त्यांतच तो रमतो.

शुभ भावनांचा विकास शुद्ध स्वरूपांत कसा होईल याचा ज्ञानी विचार करतो. शुभ भावना, विकाराच्या बंधाला कारणीभूत आहेत असें तो समजतो. सर्व विकारांच्या पलिकडे असलेली शुद्ध भावना आपलीशी करून निर्विकल्प मनानें आत्म्याशीं गुजगोष्ट करणें तो श्रेष्ठ मानतो. अज्ञान्यास कदाचित् अशुभ भावना नकोशा वाटतील व शुभ भावना धारण करण्याची वृत्ति येईल. पण फक्त शुभभावना ही त्याचें अंतिम ध्येय बनल्यानें खऱ्या आत्मवस्तूपासून तो दूरच राहणार !

ज्ञानी व अज्ञानी यांच्यामधील केवढें हें अंतर !

* *

# आत्मन् !

तुझ्या दर्शनासाठीं मी निघालें. मी आळवूं लागलें मजजवळ दीप नाहीं, धूप नाहीं, नैवेद्यहि नाहीं. रत्नाचीं आभूषणें मजजवळ नाहींत. सोन्या चांदीचीं पूजापात्रेंहि नाहींत. तुझ्या गळयांत घालण्यासाठीं मी पुष्पहाररहि आणला नाहीं. माझे हात रिकामे आहेत फक्त पवित्र हृदय एवढेंच तुला समर्पावें म्हणून तेंच घेऊन आलें आहे. तें तुला मी अर्पण करीत आहे. हें हृदय तुझेंच झालें.

तुझ्या शोधार्थ केव्हांची मी निघालें आहे. कधीं पोपटाच्या वेषानें तुझा शोध केला, तर कधीं किडामुंगीहि झालें. रंक झालें, राव झालें. यच्चयावत् प्राणिमात्राच्या वेषानें मी तुझा शोध अनंतकाळ चालवीत आलें. या शोधार्थ स्वर्ग, तर कधीं पाताळ पायतळीं घालण्यासहि मी कमी केलें नाहीं. पर्वत ओलांडलें, नद्या उल्लंघिल्या, मोठीं शहरें धुंडाळिलीं. केवढा आटापीटा केला जिवाचा ! शेवटीं तूं मला सापडलास. तूं माझ्यांतच आहेस असें मला कळलें. नको तो पर्वत अन् ती दरी, नकोत ते नाना वेष ! आज मी सुखी आहे; कारण तुझें सान्निध्य मजजवळच आहे.

नव्हे, तूंच मी अन् मीच तूं असं साम्य झालं आहे !

★ ★

# प्रभू !

तुला वाटलें असेल मी एकटीच तुझ्या शोधार्थ निघालें असेन. मी निघालें ती माझा सारा परिवार घेऊन निघालें. चाकर, नोकर, इष्टमित्र, आप्त यांच्यासह मी निघालें. माझी कुबेराला लाजविणारी संपत्ति बरोबर घेण्यासहि मी विसरलें नाहीं. कामक्रोधादि कषायांनींहि माझी सोबत केली; पण मज बरोबर असणारे सारे सुखाचे सोबती ठरले. तुझ्यासाठीं खडतर जीवन, कष्टप्रद मार्ग अवलंब करणें त्यांना कठीण जाऊं लागलें.

हा आपला मार्ग नव्हे म्हणून चाकर, नोकर, आप्तमित्र यांनीं माझा निरोप घेतला. यापुढें आपली कदर होण्याऐवजी हाल मात्र होतील म्हणून कषायांनीं मागल्या पावलानें पळ काढला. संपत्ति बिचारी कषायावर प्रेम करणारी ! कषायांनीं पळ काढलेला पाहतांच तीहि पुढें येण्यास नाराजी दर्शवून निघून गेली.

मी एकटीच उरलें. अपरिग्रही बनलें. माझें असें मजजवळ कांहींच उरलें नाहीं. माझी अजूनहि साथ करणारे क्षमा, दया, शांति, सत्यज्ञान, सत्यदर्शन यांना बरोबर घेऊन मी पुढचा मार्ग आक्रमण केला. तेच माझे खरे सांगाती ठरले

★ ★

# कृषीवला !

किती अविश्रांत श्रम घेतोस !

चांगल्या सकस विचारांची निपज व्हावी म्हणून तुझें मनाचें शेत तूं नांगरतोस, आणि शांतिजलाच्या वर्षावानें तें सजल करतोस. सत्यज्ञानाचें बीं-बियाणें तूं पेरतोस. क्रोधादि विकाररूप पांखरांनीं पीक खाऊं नये म्हणून डोळचांत तेल घालून तूं जपतोस.

रति, अरति, शोक, भय या उंदीर-घुशी नासधूस करतील म्हणून किती जिवापाड मेहनत घेतोस तूं !

तुला कीर्तीची अपेक्षा नाहीं, मोबदल्याचा लोभ नाहीं, पैशानें मोजावें अशी हीन वृत्ति तुजजवळ नाहीं !

निर्माण केलेलें धान्य स्वतःपेक्षां तूं दुसऱ्यासाठींच दान करतोस. तुझ्या श्रेष्ठ धर्माची जग किंमत करो न करो, तूं आपल्या नियत कर्मांत सदैव चूर असतोस.

धन्य आहेस तूं, कृषीवला !

★ ★

# भांडवलदार

तूं अनंत गुणांचा भांडवलदार आहेस ! आजपर्यंत संयम, तप, चारित्र्य वगैरे आत्मिक गुणांची तूं पिळवणूक केलीस. अरे, वास्तविक तेच तुझे खरे हितचिंतक !

पण अहंकाराच्या श्रीमंतीनें उन्मत्त होऊन तूं तुझ्या हितचिंतकावरच तरवार उपसलीस. त्यांना हृदयाचा निवाससुद्धां पारखा केलास. तुझ्या आश्रयाविना ते अकिंचन बनले. पण ज्यांच्या अभावामुळें तूं आजपर्यंत उन्मत्त बनलास त्यांच्याच सद्भावामुळें आज जागा झालास. तुझा अंतरात्मा आतां जागा झाला. तुझा उन्माद उतरला. तुझे सद्गुण हे तुझे किंकर नसून खरे खुरे हितचिंतक आहेत, हें तुला समजलें.

आतां तूं आपली संपत्ति सर्वांना वाटतोस. एवढेंच काय, तुझ्याजवळ असणारें सर्व तूं समर्पित म्हणून देऊन टाकतोस. आजपर्यंत धनाधिष्ठित म्हणून तूं भांडवलदार होतास.

पण आतां तुला आत्मिक गुणांचं अधिष्ठान लाभलं आहे. तूं साऱ्या आत्मिक गुणांचा खराखुरा भांडवलदार झाला आहेस!

★ ★

# चोरा !

चोरी करण्यांत किती काळ घालविलास ! कशासाठीं ही चोरी ? पोटासाठीं ? ज्या पोटासाठीं तूं चोरी करीत आलास त्याची भूक चोरीनं थांबणार नाहीं, अग्नीची भूक इंधनानं तृप्त करण्यासारखाच हा प्रकार नाहीं का ?

अन् पोटासाठींच का चोरी करतोस ? पोटाहून आत्मा श्रेष्ठ आहे. आत्म्याचं अस्तित्व शरिरांत आहे म्हणून पोटाचा विचार तुझ्या मेंदूंत उद्भवतो. आत्म्यावेगळं पोटाला अस्तित्व नाहीं.

मग आत्म्याला विचार कीं ही चोरी तुला मान्य आहे का ? ही परद्रव्यासंबंधीची ममत्वाची भावना त्याला आहे का ? ममत्वाच्या कल्पनेनं बंधनाच्या चाकोरींत तूं शिरला आहेस. घर फोडण्यापेक्षां ही ममत्वाची चाकोरी फोडून तूं आंत शिरलास कीं जी गुणरत्नसंपदा तुझ्या हातीं लागेल तिला त्रैलोक्यांत मोल उरणार नाहीं तुला त्यावेळीं जो निरतिशय आनंद होईल त्याची कल्पनाहि तुला करवणार नाहीं.

ममत्वाचं चक्रव्यूह भेदून तूं आंत शिरलास कीं तुझ्यांतील परमात्मा प्रकट होईल. त्रैलोक्याचा तूं धनी होशील.

★ ★

# अपराधी

बा आत्म्या, तूं दुसऱ्यांच्या डोळ्यांतील अत्यंत लहान दोषाकडे पाहतोस आणि तो मोहरीएवढाला दोष मेरूएवढा मोठा दाखवतोस.

आपल्याजवळची ज्ञानज्योत कदाचित् इतरांना प्रकाश देईल व दुसरे ज्ञानवान् होतील म्हणून त्या तेजोमय दीप्तीवर तूं झडप घालतोस. दुसऱ्याचा हेवादावा तर तुझ्या पांचवीलाच पुजलेला आहे. तसेंच दुसऱ्याच्या ज्ञानमार्गांत अडथळा आणून त्यांना सत्यापासून पराङ्मुख करणें तूं आपलें ब्रीद मानतोस. अशा प्रमादामुळें तूं स्वतःला तर फसवितोसच, पण इतरांनाहि या मार्गाकडे येऊं देत नाहींस.

तूं माझ्या आत्मस्वरूपाकडे दुर्लक्ष करून त्याला ओळखेनासा झालास. कसलें मोहपटल आलें आहे तुझ्या डोळ्यावर ? तूं आत्म्याचें अस्तित्वसुद्धां मानायला तयार नाहींस. संयमाचें नांव निघतांच रोषानें तुझ्या कपाळावर आठी पडते आणि स्वेच्छाचार म्हटला कीं अगदी लोलुपतेच्या इच्छेनें तूं धावतोस. दुसऱ्यांना झालेला लाभ, मिळालेला सुखोपभोग हा तुला पाहवत नाहीं. परोपकार करणाऱ्याचा तूं हात धरतोस. सदिच्छेनें प्रेरित होणाऱ्यांच्या मार्गांत तूं कांटे पसरतोस, मंगलकार्यांत विघ्नें उत्पन्न करून कार्यनाश करतोस. केवढा हा प्रमाद !

स्वतःच्या क्षुद्र स्वार्थासाठीं तूं सज्जनांची निंदा करतोस. श्रेष्ठांचा अवमान करावयाला मागेंपुढें पहात नाहींस. दुर्जनापुढें

लांगूलचालन करून स्तुतीचा वर्षाव करायला मात्र तूं कधींच चुकत नाहींस. तूं स्तुति कर अथवा निंदा कर; दोन्हीहि तुला 'बंधनांत' बांधतील हें लक्षांत ठेव.

कर्मजन्य उपाधीनें तूं सुखदुःख मिळवितोस. पण तुझी वृत्ति लहान बालकापेक्षां श्रेष्ठ नाहीं. इच्छित गोष्टींच्या प्राप्तीनें लहान मूल संतोषतें व अपेक्षेनें रडतें. तूंहि इच्छित मिळालें कीं सुखसागरांत पोहोतोस; न मिळालें कीं दुःखनदींत पार बुडून जातोस. सोड ही बालवृत्ति!

★ ★

# बंदीवान्

तुला अपराध करतांना आनंद वाटतो. पण त्याचीं फळें भोगतांना तुला जड जातें. हें शरीर म्हणजे तुझा तुरुंग ! त्या तुरुंगांत तुझा आत्मा बंदिस्त झाला आहे. या बंदिवासांत जन्मामुळं कधीं राज्यपद तर कधीं भिक्षेकऱ्याचं पदहि मिळतं.

पण तुरुंगवास तो तुरुंगवास. 'अ' वर्ग असो, नाहींतर 'क' वर्ग असो.

कां झालास तूं बंदीवान ? याचा कधीं तरी विचार केला आहेस का ? मग ही संधि आहे आज तुला. कर त्याचा विचार.

स्वेच्छाचारी बनून संयमाला लाथ मारलीस तूं ! मग त्याबद्दल शिक्षा नको का भोगायला ? अरे, तुझ्या हातून पापांच्या राशी निर्माण झाल्या आहेत. तूं दुसऱ्याच्या मार्गांत विघ्नें उत्पन्न केलीस; स्तुतिनिंदा, सुखदुःख यांच्या मागे धावलास नाना वेष धारण केलेस, भौतिकतेला आपली सखी मानलीस. मग या पापाबद्दल थोर न्यायालयासमोर काय शिक्षा सांगितली जाईल ? तुला लाखों वर्षें असेंच बंदी म्हणून कुजावें लागेल.

केव्हां होणार तुझी जागृति ? ऊठ, सोड हीं कर्में आणि हो या तुरुंगांतून मोकळा. हा सत्यसंकल्प केल्याविना तुझे दुर्दिन संपणार नाहींत कधीं.

सत्यसंकल्प करायला आजचा मुहूर्त श्रेष्ठ आहे. म्हण 'मी मुक्त आहे' म्हणजे झालास मोकळा. या जन्मापुरता हाच सत्यसंकल्प !

★ ★

# क्षत्रिया

तूं शूर आहेस, वीर आहेस. तूं सिंहाचा बच्चा आहेस. बंदिवान् होणें तुला शोभते का ? हा तुझा स्वभावधर्म नव्हे. तूं क्षत्रिय वंशांतला ! किती वर्षं बंदिवासांत असा खितपत पडणार तूं ? बंदी झालास तरी त्याचं कारण अद्यापिहि तूं कां समजून घेत नाहींस ?

तूं बंदी झालास तो प्रमादानं – विकारानं. जें तुझं नाहीं त्याला कवटाळल्यानं. तुझ्या अंगांतील अनंत शक्ति, तुझ्या आत्म्यांतील अनंत बळ याचा तुला विसर पडला. किती काळ लोटला तुला आत्मशक्तीचा विसर पडून ?

तुझ्या अंतरंगांतील सामर्थ्य प्रकट कर म्हणजे तुझ्या पायांत पडलेल्या या सोनेरी बेडया तुटून पडतील. तुझ्या आत्म्याभोंवती असलेल्या या भिंती कोसळतील. तूं मुक्त-निष्कलंक होशील.

तुझं सामर्थ्य तुझ्यांत आहे, तें तूं अन्यत्र धुंडत होतास. क्रोध, मान, कपट आणि मोहाच्या सैन्यानं तुझा पराभव केला. पाण्यांतून बाहेर आलेल्या मगरीसारखी तुझी अवस्था झाली. तुझं सामर्थ्य काळवंडलं. तूं बंदी झालास. इंद्रियांचा गुलाम झालास. क्रोधादि षट् रिपूंचा पाडाव करण्याचं सामर्थ्य तुझ्यांत प्रकट झालं कीं तुझं तेज सर्वत्र चमकेल. तूं खरा क्षत्रिय म्हणून जग तुला ओळखील.

★ ★

# रंगारी

अंतरंग व बहिरंगाच्या पटावर भावनेच्या कुंचलीनें जीं चित्रें तूं चितारतोस, तीं किती भिन्न असतात ! तुझें हृदय वज्रासारखे कठोर असतें त्या वेळेस तुझा रंग काळा असतो. एखादे वेळीं तूं बाह्यदर्शनीं काळा दिसलास तरी अंतर्यामीं मृदु असतोस. जसा कांहीं एखादा नारळच. पण या उलट कित्येकदां तूं बाह्य शुभ्रता दर्शवून अंतरीचा काळेपणा झाकण्याचा यत्न करतोस. बोर जसे बाहेर सुंदर पण आंत कठोर असतें, अगदीं तसा तूं असतोस.

तुझें हृदय कित्येकदां पाषाणाची कठोरता धारण करतें. त्या वेळीं तूं गडद निळा रंग वापरतोस. तुझें हृदय पाषाणाची कठोरता सोडून विटेच्या रंगासारखे बनते, तेव्हां तुझा कुंचला विटकरी रंगानें ओथंबलेला असतो. एवढेंहि काठिण्य न धरतां तुझें मन खडीसाखरेसारखे बनलें तर तूं आपली नजर पीत रंगावर लावतोस.

हृदयपद्मांतून विकारांची कठोरता नष्ट झाली तर कमलाप्रमाणें आरक्त रंगानं तुझी चित्रं रंगू लागतात.

ज्या वेळीं तूं तुझा कुंचला आत्मरसाच्या रंगांत बुडवितोस त्या वेळीं नवनीतासारखा शुभ्र रंग तूं वापरतोस.

आपल्या प्रत्येक क्रियेंत नवनीतासारखी मृदुता आणि शुभ्रता आली तर स्वतःचं अन् दूसऱ्याचंहि जीवन उन्नत होईल यांत कसली शंका ?

* *

# सौदागर

रोजचा तुझा व्यापार चालू आहे. दिवसाच्या शेवटीं तूं जमाखर्च करतोस, हिशेब पाहतोस, नफा-तोटा किती झाला याचा अंदाज घेतोस. आपली संपत्ती प्रत्यहीं वाढावी म्हणून केवढा हा तुझा अट्टाहास! कुशल व्यापारी बनण्यासाठीं किती अविश्रांत श्रम घेतोस तूं.

धन म्हणून तूं काय काय गोळा करणार? सारी पृथ्वी, रत्नाकर म्हणून ओळखला जाणारा समुद्र, प्रत्यहीं नवनवीन संपत्तीची निर्मिति करीत आहे. हें सारं धन, वैभव, ऐश्वर्य तुला इथंच सोडून जायचं आहे.

या संपत्तीचा तूं खरा मालक नाहींस हें विसरलास वाटतें? तुझें खरें धन वेगळें आहे. तें मिळविणें हा तुझा पुरुषार्थ, त्या थोर धनासाठीं व्यापार कर. रोज किती मिळविलें व किती गमावलें याचा आढावा घे. तुझ्या आत्मिक गुणांची वाढ चक्र-वाढ व्याजानें कर. हा तुझा व्यापार तुला एकदां कळला कीं आत्मविकासाचें अलोट धन तुझ्या पदरांत पडलेंच म्हणून समज.

★ ★

# मजूर

दुसऱ्यांच्या सुखासाठीं रात्रंदिन किती काबाडकष्ट करीत आहेस ! ज्या वेळेस तूं घरीं जातोस त्यावेळीं तुझ्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठीं पुरेल एवढाहि पैसा तुझ्याजवळ नसतो. घरांतील दारिद्र्याचं अस्तित्व पाहून तुला अतोनात दुःख होतं. तूं दुःखी होतोस. या दुःखाचा विसर पडावा म्हणून तूं गुत्त्याकडे धाव घेतोस व मोहवारुणीचें प्राशन करतोस. तुला नशा चढते व तूं त्यांतच झोपीं जातोस या दारूमुळे तूं अत्यंत दुबळा बनला आहेस. तुझी विचार करण्याची शक्ति देखील नष्ट झाली. तुझें चालणें–बोलणेंसुद्धां तुला सुसंगत करतां येईना.

दुःख विसरण्याचा हा मार्ग खरा नाहीं. हाच अज्ञानी लोकांचा भ्रम त्यांच्या पुरुषार्थाला काळवंडून टाकतो.

मोहाचे पाश ते हेच ! प्रत्येक वस्तु तुला हवी हवीशी वाटते. त्या वस्तूच्या प्राप्तींत तुझा आनंद आणि वियोगांत दुःख !

हीच सुषुप्ति ! या मोहनिद्रेमुळें त्रैलोक्याचा तूं स्वामी असतां तूं गुलाम बनला आहेस.

ही मोहाची सुषुप्ति सोड म्हणजे तुझ्यांतील खरें चैतन्य उदयाचलावर आलेल्या सूर्याप्रमाणं तेजस्वी असलेलें तुला दिसेल !

★ ★

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ........................ वि: ..........
क्रमांक ने दि

# शूद्रा !

कोण शूद्र ? कोण हरिजन ?

सारेजण शूद्र अन् हरिजन! आत्म्यासारख्या मूल्यवान् शक्तीची उपासना सोडून देहाची पूजा करणारे शूद्र ! या नश्वर शरीराची किती काळजी ! देहाला स्वच्छ करण्यासाठीं, त्याला सजविण्यासाठीं, त्याला बरं वाटतं म्हणून त्यासाठीं अहोरात्र किती परिश्रम ! किती चिंता ! किती अवाढव्य पसारा !

याच देहासाठीं राजकारण अन् समाजकारण ! कां उगीच जनकल्याणाच्या गोष्टी करतोस रे शूद्र मना ? ही फसवणूक आहे ज्याला स्वत:ला कल्याणाचा मार्ग ठाऊक नाहीं तो इतरांना मार्ग कसा दाखवील ? कल्याणाच्या मार्गानें तूं तरी गेला आहेस का ? मग जो मार्ग तुलाहि अपरिचित तिथें आंधळेपणानें कां निघालास ?

मोठमोठचा गिरण्या, कारखाने, शहरांतील सोयी या सार्‍यांचं प्रयोजन एक देहच नाहीं का ? आपण सारेच देहवादी भंगी आहोंत. जें नित्य घाण होत आहे तेंच आपलं ध्येय ! त्याला स्वच्छ ठेवण्याचा चिंतेंत आत्म्याच्या निर्मळपणाची कधीं तरी चिंता केली आहे का ? हृदयांतील द्वेषभावना, हिंसक प्रवृत्ति जावी म्हणून तूं कधींतरी प्रयत्न केला आहेस का ?

या उलट पक्षोपपक्षाचं राजकरण खेळत आहेस, विषारी समाजकारणाचा तूं पुढारी झाला आहेस. हेंच शूद्रत्व. शूद्रत्व याहून का वेगळं असतं ?

★ ★

# मौनी !

‘ मौनानं सारं जग तुला कळेल ’ हें वाचून तूं मौन स्वीकारलंस ! ही पोपटपंची झाली. मौनानं आत्मज्ञान होतं तर कृमिकीटक आपल्याहून अगोदर आत्मज्ञानी झाले असते. हे वृक्ष वगैरे तर महामौनाचे भोक्ते आहेत. पण कुठं आहे त्यांना आत्मज्ञान ?

अरे, मौन म्हणजे ‘ न बोलणं ’ एवढाच का त्याचा अर्थ ?

मौन ही एक क्रांतिकारी क्रिया आहे. मौन म्हणजे शारीरिक क्रियांना विराम ! मानसिक आंदोलनांचं स्थिरीकरण म्हणजे मौन. मन आणि शरीर क्षणभर लौकिक व्यवहारांतून बाहेर काढून आत्म्याची हांक तूं ऐकली आहेस का ? ज्या मौनांत आत्म्यांतून बाहेर पडणारा ॐकार ध्वनि ऐकूं येत नाहीं तें मौन नव्हे.

विकारी होऊन अविकाराचें ध्यान कसें जमेल ? समर्याद राहून अमर्यादाचं दर्शन कसं घडेल ? लोभांत अडकून निर्लोभत्वाचं दर्शन तुला कसं घडेल ? बहिरात्म्यांत राहून परमात्मा कसा भेटेल ?

मौन स्फटिकासारखं असतं. वस्तूचं प्रतिबिंब पडूनहि त्यांत स्वतांत विकृति नसते.

हें उत्कृष्ट मौन तुला मिळो !

★ ★

# संन्यासी !

तूं सारा पसारा सोडून बाहेर पडलास ! साऱ्या संसार-सुखावर लाथ मारलीस, देहदंड म्हणून दिगंबर झालास, रानावनांतून पायीं हिंडलास, उपासतापास केलेस, सारा देह या तपश्चर्येनं अगदी कृश झाला. सापडलं का तुला सुख ?

नाहीं सापडलं नां ? कसं सापडणार ? केवळ बाह्य क्रियेनं सुख मिळतं, तर वेडया, पशुपक्षी आपल्याहून का कमी कष्ट सहन करतात ? देह-दंड हें आत्मध्यान प्राप्तीचं ' साधन ' होतं. पण तुझं सारं लक्ष देहदंडाकडेच !

शरीर कृश झालं, पण क्रोध गेला का ? मोहाची भावना गेली का ? समीचीन दृष्टि तुला लाभली का ?

नाहीं ना ? मग हें सारं पालथ्या घागरीवर पाणी पडल्यासारखं झालं. अरे, अज्ञानानं केलेली चांगलीहि गोष्ट नाशाला कारणीभूत होते. अहंकाराची वाट तूं धरलीस. मौनानं आत्मचिंतन करण्याऐवजी तूं देहदंडाचंच चिंतन केलंस.

संन्यास म्हणजे हृदयाचं निर्मलत्व. संन्यास म्हणजे क्रोधादिकांचा त्याग. संन्यास म्हणजे आत्मचिंतन-आत्मजागृति ! आत्मजागृति झाली नाहीं तर हें सारं शून्य ! ...सारं निरुपयोगी. क्रोध, मान, कपट, लोभ इत्यादि विकृत मनोवृत्तींचा त्याग म्हणजे संन्यास.

★ ★



मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ९२०३२ ....... वि: निबंध
९६८८ ....... नों: दि: २३।२।६६

# पुढारी !

तूं पुढारी बनलास. राजकारणांत तूं पडलास तें यासाठीं कीं जनताजनार्दनाचं हित करावं. त्यांना सामाजिक, राजकीय हक्क मिळवून द्यावेत म्हणून तूं आपल्या घरादाराची होळी केलीस !

सारखा कांही तरी उद्योग सतत चालूं आहे. आज कसल्या तरी कारखान्याचं उद्‌घाटन, उद्या कोणत्या तरी परिषदेचं संचालन, परवा निवडणुकीचा दौरा. किती उद्योग ! किती परिश्रम !!

पण तुझे परिश्रम आणि तुझी कल्पना यांत फार मोठें अंतर पडलें आहे. तूं जो विचार करतोस त्याच्यावरच तुझ्या कार्याची उभारणी होत नाहीं म्हणून तुला अपयश येतें.

तुझं चिंतन वेगळं अन् क्रिया वेगळी. सेवा करतां करतां तूं पुढारी होऊन बसलास हाच तुझा कार्यनाश ! हक्क मिळवून देतांना तूंच हक्काचा हक्कदार झालास ! तुझ्या कार्यांतून आलेली ही विकृतीच तुझं कार्य नष्ट करणार, असं नाहीं तुला वाटत ?

क्षणभर पुढाऱ्याचीं वस्त्रं बाजूला टाक. विचार-समुद्रांत क्षणभर अवगाहन कर. मौनी हो. तुलाहि पटेल कीं केलेला आरडा-ओरडा म्हणजे अरुण्यरुदन होय; केलेले परिश्रम म्हणजे वायूचा किल्ला.

सत्याच्या विकृतींतून या क्रिया निर्माण झाल्या. ध्येय बाजूला राहिलें अन् कार्यहि वेगळेंच झालें. तुझ्या वाचाळतेनं प्रश्न सुटण्याऐवजीं अधिकच बिकट होऊन बसला. गणपति करायला गेलास पण वानरमूर्ति निर्मिलीस. पुनः मौनांत शिरून आत्मदेवाचा शोध करून घे !

★ ★

## भक्ता !

ईश्वरावर तुझी केवढी भक्ति ! परमेश्वर–प्राप्तीसाठी तुझा केवढा हा खटाटोप ! खरंच का देव आहे ? कुठं आहे तो तुझा परमेश्वर ? आपल्या साऱ्या शुभाशुभ कर्मांचीं फळें का तो भोगणार आहे?

ज्यावेळीं तूं म्हणतोस की ईश्वर आहे त्यावेळीं ती तुझी समजूत असते. व्यक्ति अन् परमेश्वर अशा गोष्टी तूं मानतोस. अशा मानण्या, न मानण्यामुळं तुझ्यांतच काय व्हायचा तो बदल होईल. पण जें सत्य आहे तें कांहीं तुझ्या मानण्या, न मानण्यामुळं बदलणार नाहीं.

तुला वाटतं ईश्वर आहे असं मानल्यानं तुझ्या जीवनांत आशेचीं किरणं येतात, मनाला संतोषाचा शीतल वारा स्पर्श करतो, जीवनाला कांही तरी किंमत येते ! खरं ना ?

पण चोरी करणाऱ्याबरोबर, हिरोशिमावर ॲटम बॉम्ब टाकणाऱ्याबरोबर, युद्धमान् शत्रू-मित्र राष्ट्रांबरोबरहि परमेश्वर होताच ना ? सर्वच परमेश्वरावर श्रद्धा ठेवून काम करीत होते. याचा अर्थं परमेश्वर कुणाबरोबरच नव्हता. सारे जण आप-आपल्या कल्पनांना देवाचं रूप देत होते. खरं म्हणजे आपल्या कल्पनांना ते सारे मूर्त करीत होते. ईश्वर ही केवळ पळवाट होती.

दररोजच्या जीवनांत घडणारं वैफल्य अन् साफल्य परमे–श्वरावर टाकून तो तुम्हाला सापडणार नाहीं. विकारांनीं जोंवर

तुमचं मन ग्रासलं आहे; चिंता आणि अभिलाषा तुमच्या मनाला वेढून आहेत, लौकिक जीवनांत तुम्ही गढून गेलां आहांत तोंपर्यंत तो तुम्हाला कसा सापडेल !

हे भक्ता ! तुझं मन शांत होऊं दे. विकाराचं शमन होऊं दे. मनांतील भौतिकतेचं आंदोलन विलीन पावूं दे. त्या देवाला आळवूं नकोस. हृदयांतील आत्मदेवाची हाक ऐक. तोच खरा परमेश्वर आहे. त्याच्यासाठींच जीवन...... त्याच्यासाठींच सारा खटाटोप !!

★ ★

# हिमालया !

हिमालया ! मला तुझ्या शिखरावर जाण्याची उत्कंठा लागली आहे. मी जाईन अशी खात्री आहे; पण चढावयास जातें तोंच पडतें. कित्येकदां वाटतें, आहे तीच स्थिति ठीक आहे. पण येथें मनांत शांति नाहीं. शुभाशुभ कषायांनीं आत्मा दुःखी होतो. एवढेंच काय पण एखाद्या वेळीं मी पायथ्याशीं जाऊन आदळतें कीं काय अशी भीति वाटते.

हा घसरगुंडीचा पर्वत, हा झुलता पर्वत ! आहे त्या पायरीवर अशी चिकटून राहिलें तरी भाग्य समजेन. तेव्हां खालीं तरी नेऊं नकोस !

तुला वाटत असेल मी प्रमादी आहे; पण मी प्रमादी राहणार नाहीं. नेहमी जागृत राहीन. डोळ्यांत तेल घालून बसेन. वाटेल तें करीन पण शिखराकडे जाण्याचा माझा प्रयत्न राहील !

हिमालया, तुझें आत्मबल थोडें का आहे ? तूं थोडाच मला मोहांत फसविणार ? तुझ्या शरिरावर मादकता उत्पन्न करणारीं रसांना प्रसवणारीं हजारों झाडें असतील. तो रस पिण्यांत माझा जन्म गेला; पण त्यानें माझा नुसता मदच वाढला.

तुझ्या पर्वतावर मधमाशा थोड्या का आहेत ? त्या सुंदर मधूची निर्मिती करतात. पण अनंत जीवांच्या बलिदानानें तयार झालेला हा मद मला कसा सात्त्विक बनवील ? तेव्हां त्या मधाचा मीं त्याग केला.

तुझ्या पर्वतावर पशु थोडे का आहेत ? मौजेनें शिकार करावी व खावें मांस. पण त्यांनाहि आपल्याप्रमाणेंच सुखदुःखें असतात, पशूंनाहि आत्मा असतो. त्यांच्या घातानें आपल्या आत्म्याचा घात होतो. एवढेंच काय, मेलेल्या मांसामध्यें देखील अनंत जीव असतात. त्यानें उन्मत्तता येते. म्हणून अंतःकरणास हें सहन होईना. केला त्याचा मी त्याग व झालें शाकाहारी. पानाफुलांत देखील अनंत सूक्ष्म जंतू कमीअधिक असतात. त्यांचा मी शोध करूं लागलें. ज्या योगानें सात्त्विकता येईल असा आहार मी घेऊं लागलें. पशूसारखें रात्रंदिवस चरणें बरें वाटेना. शरीररक्षणार्थ जरुरीपुरता एक वेळचाच आहार मी चालू केला.

या जगांत असें एकहि स्थळ नाहीं कीं ज्या ठिकाणीं सूक्ष्म जंतू नसतील. पण शक्य तों आपल्या हातून प्रयत्न करावा. तेवढा तरी समभाव प्राप्त व्हावा म्हणून आहारविहारांत दक्षता ठेविली.

आहारविहारांतील संयमानं मी आत्मबलाचं दर्शन घेऊं लागलें. माझ्यांतील विकार हळूहळू कमी झाले.

हिमालया, फार कालापासून तुझ्या पायथ्याशीं आहे. तुला शोभा यावी म्हणून निरनिराळ्या वनस्पति झालें. तूं महान् दिसावास म्हणून पृथ्वी झालें. तुला जगतां यावें म्हणून मी वारा झालें. तूं शुष्क होऊं नयेस म्हणून मी जीवन झालें. तुझ्या जीवनांत विशुद्धता यावी म्हणून मी अग्नीच्या जन्माला आलें व सर्व घाण जाळून टाकली. त्या त्या अवस्थांमध्यें सुद्धां मला ज्ञान होतें, मला स्पर्शज्ञान होतें, माझा श्वास व्यवस्थित चालत होता. मी कित्येक वर्षें सूक्ष्म जंतू आणि कीटक झालें; रसनेद्वारें मला

आस्वाद घेतां येऊं लागला. मुंगी, भ्रमर झालें, सुगंध दुर्गंधाचा वास घेतां येऊं लागला. डोळ्यानें सर्व दिसूं लागले. तुझ्या ठिकाणीं केवढी शोभा ! सिंह, हरीण, गाय सर्व कांही मी झालें. कानांनीं ऐकलें, मनानें विचार केला.

माणसाशिवाय तुझ्या सृष्टिसौंदर्याचा, अरण्यवासाचा, एकान्ताचा, निर्झर-झरणीचा कोण आस्वाद घेणार ? तो आस्वाद घेतां यावा म्हणून मी योगिनी झालें.

येथील निवास मला सुखकारक वाटत आहे. तुझ्या सन्निध राहावयाचें म्हणजे योगिनी झाल्याशिवाय कसें शक्य आहे. म्हणून मी योगिनी झालें आहे. ही तुझीच कृपा नाहीं का?

★ ★

# गौरीशंकरा !

तुझी चढण किती रे महत्त्वाची ! स्वैराचार अगदी नकोसा वाटूं लागला आहे. आत्म्याचा नुसता ध्यास लागला. तुझें अत्युच्च शिखर केव्हां पाहीन असें मला झालें आहे. आत्मधर्माची ज्योत हृदयांत प्रज्वलित व्हावी अशी इच्छा होते. माझ्याबरोबर सर्वांनीं शिखर गांठावें अशी उत्कंठा मला लागून राहिली आहे.

पण मी ज्या महत्त्वाकांक्षेनें वर जाण्याचा प्रयत्न करते ती सफल होत नाहीं. पण ती कशी सफल होणार ? माझ्याच अपरिपक्व भावना मला परतवितात.

मला आहारविहारांत बंधन हवेसें वाटतें. पण मोहराजा मला भुलवितो. त्याची ती एवढी मोठी सेना, मला हतबल करते. पण अंतरंगांतून सारखी टोंचणी लागली आहे कीं मी व्रती केव्हां बनेन ! तुझें दर्शन घेण्यासाठीं मला तसं बनणं आवश्यक आहे.

आत्मदेवाचं दर्शन घ्यायचं म्हणजे त्याच्यासाठीं हृदय पवित्र नको का करायला ? विकारांना हृदयांत ठेवून तुझ्या जवळ आलें तर तूं कसा दिसणार मला ? विकारांच्या वादळांत सापडूं नये म्हणूनच मी अहिंसेचीं वस्त्रें, सत्याचीं भूषणें, ब्रह्मचर्याचें कवच ल्यालें आहे. आत्मदेवाला भेटण्यासाठीं कसलंहि दिव्य मी करूं शकेन असें सामर्थ्य माझ्यांत येऊं दे ! तुझ्या आश्रयाला किती तरी ऋषि-मुनि आहेत. तूं दिगंबर ! तुझ्या सहवासांतले ते साधुवर्य आतां अंतर्बाह्य दिगंबर बनले असून

त्यांचें दर्शन मला मिळालें. त्यांचा उपदेश माझा जीवनपथ उज्ज्वल करील. तो उपदेश ग्रहण करण्यास लागणारी पात्रता मी मिळविली म्हणून तो मला ग्रहण करतां आला. पात्रतेशिवाय काय ? माझें भाग्य खुललें. तुझ्या ऊंच शिखराचें मला दर्शन झालें. आतांपर्यंत तुझ्या पायथ्यासच मी शिखर समजत आलें. पण इथें आल्यावर पहातें तों सारा चमत्कार !

गुरूच्या उपदेशानें विशुद्धता वाढू लागली. त्या शिखराचा ठाव घेण्याचा विचार मनांत डोकावूं लागला. चौथ्या पायरीवर केव्हां जाईन असें झालें आहे. त्याकरितां संक्लेश परिणामानें युक्त असे उत्कट बंध मी कमी केले आहेत. या पायरीस योग्य अशी कर्माची स्थिति केली आहे. दिवसेंदिवस माझा दृढनिश्चय होऊं लागला. कधींच न अनुभवलेली विशुद्धता मला प्राप्त झाली, व तिच्याच बळावर मी चौथी पायरी गांठली.

किती रे ही पायरी सुखद आहे ! माझ्या आत्म्याचा विश्वास गाढ झाला. मी आतां केव्हांना केव्हां तरी शिखर गांठीन असा आत्मविश्वास बाणला मजजवळ. आत्मानुभवाचा स्वाद मिळाला. परिणामांत केवढें स्थित्यंतर झालें म्हणून सांगू !

हें सारं तुझ्यामुळं !

★ ★

# गौरीशंकरा !

तुझी चढण किती रे महत्त्वाची ! स्वैराचार अगदी नकोसा वाटूं लागला आहे. आत्म्याचा नुसता ध्यास लागला. तुझें अत्युच्च शिखर केव्हां पाहीन असें मला झालें आहे. आत्मधर्माची ज्योत हृदयांत प्रज्वलित व्हावी अशी इच्छा होते. माझ्याबरोबर सर्वांनीं शिखर गांठावें अशी उत्कंठा मला लागून राहिली आहे.

पण मी ज्या महत्त्वाकांक्षेनें वर जाण्याचा प्रयत्न करते ती सफल होत नाहीं. पण ती कशी सफल होणार ? माझ्याच अपरिपक्व भावना मला परतवितात.

मला आहारविहारांत बंधन हवेसें वाटतें. पण मोहराजा मला भुलवितो. त्याची ती एवढी मोठी सेना, मला हतबल करते. पण अंतरंगांतून सारखी टोंचणी लागली आहे कीं मी व्रती केव्हां बनेन ! तुझें दर्शन घेण्यासाठीं मला तसं बनणं आवश्यक आहे.

आत्मदेवाचं दर्शन घ्यायचं म्हणजे त्याच्यासाठीं हृदय पवित्र नको का करायला ? विकारांना हृदयांत ठेवून तुझ्या जवळ आलें तर तूं कसा दिसणार मला ? विकारांच्या वादळांत सापडूं नये म्हणूनच मी अहिंसेचीं वस्त्रें, सत्याचीं भूषणें, ब्रह्मचर्याचें कवच ल्यालें आहे. आत्मदेवाला भेटण्यासाठीं कसलंहि दिव्य मी करूं शकेन असें सामर्थ्य माझ्यांत येऊं दे ! तुझ्या आश्र-याला किती तरी ऋषि-मुनि आहेत. तूं दिगंबर ! तुझ्या सहवासांतले ते साधुवर्य आतां अंतर्बाह्य दिगंबर बनले असून

त्यांचें दर्शन मला मिळालें. त्यांचा उपदेश माझा जीवनपथ उज्ज्वल करील. तो उपदेश ग्रहण करण्यास लागणारी पात्रता मी मिळविली म्हणून तो मला ग्रहण करतां आला. पात्रतेशिवाय काय ? माझें भाग्य खुललें. तुझ्या ऊंच शिखराचें मला दर्शन झालें. आतांपर्यंत तुझ्या पायथ्यासच मी शिखर समजत आलें. पण इथें आल्यावर पहातें तों सारा चमत्कार !

गुरूच्या उपदेशानें विशुद्धता वाढूं लागली. त्या शिखराचा ठाव घेण्याचा विचार मनांत डोकावूं लागला. चौथ्या पायरीवर केव्हां जाईन असें झालें आहे. त्याकरितां संक्लेश परिणामानें युक्त असे उत्कट बंध मी कमी केले आहेत. या पायरीस योग्य अशी कर्मांची स्थिति केली आहे. दिवसेंदिवस माझा दृढनिश्चय होऊं लागला. कधींच न अनुभवलेली विशुद्धता मला प्राप्त झाली, व तिच्याच बळावर मी चौथी पायरी गांठली.

किती रे ही पायरी सुखद आहे ! माझ्या आत्म्याचा विश्वास गाढ झाला. मी आतां केव्हांना केव्हां तरी शिखर गांठीन असा आत्मविश्वास बाणला मजजवळ. आत्मानुभवाचा स्वाद मिळाला. परिणामांत केवढें स्थित्यंतर झालें म्हणून सांगू !

हें सारं तुझ्यामुळं !

★ ★

# ओढा !

तूं हिमालयावरचा ओढा ! किती रे तुझा खळखळाट ! तुझ्यांत पाणी तर किती थोडें आणि तुझा आवाज तर महानदी एवढा. जसा कांही समुद्रच. नुकतीच कुठें तुझ्या सत्यज्ञानाला सुरुवात झाली आहे, तर किती फुगला आहेस ? आतांच कुठें त्यागी झालास, व्रताचरण पाळूं लागलास, तर अहंकारानें भरून गेलास. लोकांस मूर्ख, तुच्छ समजूं लागलास. तूं त्यागी म्हणून लोक तुला पूज्य मानूं लागले, मग नम्रता धारण करण्याऐवजी असा उथळ कां बनलास ?

" जीवांचें माझ्या हातून पुष्कळ कल्याण होतें; मी मोठा परोपकारी, निरनिराळ्या संस्थांत कोठें अध्यक्ष, कोठें सेक्रेटरी... केवढा अभिमान मला या गोष्टीचा ! "

एखादे दिवशीं लंघन केलेंस व दुसऱ्या दिवशीं जर भुकेची व्यवस्था झाली नाहीं तर किती रागावतोस ? आज मौनाचा दिवस. सर्वांनीं माझें ऐकावें म्हणून किती तुझा अट्टाहास. तूं घेतलेली प्रतिज्ञा, तुझें आचरण व व्यवहार यांत कितीतरी विसंगता दिसते. ती झाकण्याचा तूं यत्न करतोस. बा, ओढ्या ! वाटेल तेवढा मोठा खळखळाट कर; तुझें खरें स्वरूप उघडें पडल्याविना राहणार नाहीं.

असा गर्वानें फुगूं नकोस, कोरडा ठणठणीत पडशील. जें थोडेंबहुत आहे तें सर्व जाईल. हा तुझा स्वभाव नव्हे. अरे,

कशाला हें असलें निंदास्पद जीवन कंठीत आहेस? निदान चांगल्या कामाकरितां आदर्श उदाहरण तरी बन. तुझ्याजवळ असणाऱ्या जीवनाची वाढ कर. आत्मबल वाढव. प्रत्येक वेळीं तुझें लक्ष ध्येयबिंदूवर असूं दे.

स्थिर व सम वाहणारी गंगानदी हो !

★ ★

# रोगी !

तुझी शरीरप्रकृति अजून कां सुधारत नाहीं ? किती मोलाचीं औषधें घेतलीं ! किती स्थिर निश्चयानें पथ्य सांभाळलें! अहिंसादिकांचें केवढें अचल व्रत... पण तेंहि पाळलें ! कुठें चुकलें तुझें ?

लबाडा ! वेळेवर औषध घेण्यास कुचराई करतोस ? औषधांच्या पुड्या कोनाकोपऱ्यांत फेकून दिल्या आहेस ? इतका कसा तूं विसराळू ? विसराळू कसला तूं ? प्रमादी आहेस. काय काय खाल्लेस रे चोरून ? तुझी शक्ति नसतांना किती रे फिरलास ! जाग्रणेंहि केलीस ?

कधीं जिभेच्या लालसेनें अधाशासारखें खाल्लेस ; केव्हां सुंदर गायनानें लोलुप होऊन रात्रभर जाग्रणें केलीस. क्रोधानें विस्तवासारखा लाल झालास, अभिमानानें तुझी मान ताठ झाली. मायावी भाषा व कृति यांनीं किती जणांना फसविलेस—अरे, काय झालें सांग! आणखी कोणत्या लोभाला बळी पडलास तूं ?

कधीं स्त्रीकथा, कधीं भोजनकथा, केव्हां राजकथा, कधीं विलासकथा तर कधीं पुरुषकथा यामुळें आत्मकथेकडे तुझें लक्षच गेलें नाहीं. कधीं स्नेहानें, तर कधीं झोपेनें प्रमादी झालास. या प्रमादांना वशीभूत होतोस तेव्हां तुझें स्वास्थ्य बिघडतें. तुला आत्म्याचा विसर पडतो. तूं स्वतःचा घात करतोस. होच ती हिंसा ! तूं या प्रमादांमुळें हिंसक बनतोस, चोर ठरतोस, असत्यवान् समजला जातोस ! सोड ही पर पदार्थांवर असणारी आसक्ति ! अरे तीच तुला रोगी बनविते.

★ ★

# महारोगी !

एवढा मोठा रोग होऊनहि असें दुर्लक्ष कसें चालेल ? योग्य डॉक्टराचा तूं सल्ला घेतला आहेस का ? तुझी इच्छा असेल तर वाटेल तें साध्य होईल.

तुझा रोग तुला वाटतो तसा शारीरिक नाही. हा रोग दिसतो तितका नवा नाहीं. योग्य मार्गच तूं धुंडाळला नाहींस. योग्य मार्गदर्शकहि तुला मिळाला नाहीं. ज्या नावेंत बसून आपण तरून जाऊं असं वाटलं ती नाव दगडाची होती. ज्याला वाटाड्या म्हणून तूं बरोबर घेतलास तो तुझा शत्रू निघाला. संजीवनी म्हणून जें औषध घेतलंस तें विष निघालं.

तुझा रोग तुझा नाहीं. तो तुझा वाटतो हेंच चुकीचं आहे. शरीर आणि आत्मा जरी एक वाटत असले तरी किती भिन्न आहेत. करवंटी म्हणजे नारळ नव्हे. करवंटी कवच आहे.

तुझा रोग आहे मिथ्यादर्शनाचा. खरं काय अन् खोटं काय यांतला फरक तुला कळत नाहीं, हाच तुझा महारोग आहे. भौतिक सुखदु:खांनीं तुझ्या मनांत, तुझ्या शरिरांत विकृति निर्माण केली आहे. ही विकृति दूर करण्याचा एक मार्ग आहे; तो म्हणजे आत्मचिंतन. 'मी कोण आहे' याचा तूं विचार केला आहेस का ?

'मी रोगी, मी रोगी' आहे म्हणून सतत चिंतनानं तूं स्वत:ला रोगी समजत आहेस.

परमेश्वराची अनंतशक्ति तुझ्या अंगांत निवास करीत असतां तुला रोग कसा होईल? तूं पवित्र, शुद्ध, निरोगी आहेस. तुझं स्वामित्व साऱ्या त्रिभुवनांत गाजतं आहे.

तुझ्यांतील मिथ्या कल्पनांचा महारोग निघून जात आहे! तुझं शरीर सूर्याप्रमाणं तेजस्वी, हृदय चंद्राप्रमाणं शीतल आणि आत्मा परमात्म्याइतका पवित्र झाला आहे!

असं चिंतन तूं कां करीत नाहींस ?

★ ★

नि. १८९५

# शिल्पकार !

तूं आपल्या कौशल्यानें सुबक शिल्पांना जन्म देणारा कलावंत बनलास. आज पावेतों तूं तुझ्या अंतरंगांत नाना प्रकारचीं चित्रें काढलीस. पण तीं ओबडधोबड होतीं.

पण आतां प्रयत्नानं मनाला निर्विकल्प समाधि देण्याला तुझीं चित्रं योग्य झालीं आहेत. साध्या दगडा-धोंड्याला देवत्व प्राप्त करून देणारं कसब तुला साध्य झालं आहे.

ज्यावर सुंदर चित्रें आलेखित करावयाचीं तें अंतरंग अगदी निर्विकल्प, निर्विकार, स्वच्छ झालें पाहिजे. विकाराचा ओबडधोबडपणा विचाराची टाकी लावून साफ केला पाहिजे. शांति-समतेच्या छिन्नीनें कषायांची घाण काढून टाकली पाहिजे.

पूर्वीं तुझीं चित्रें काढण्याची तऱ्हा वेगळी होती. कारण तुझीं हत्यारेंच दुसरीं होतीं. त्यावेळीं तूं अंःतपटलावर मोहाचीं व रागद्वेषाचीं चित्रें रेखाटलींस. तेव्हां तुला तींच चित्रें सर्वोत्तम वाटलीं. पण आता मात्र तुझी अंतदृष्टि जागृत झाली आहे.

तुझ्या निर्मल हृदयांत परमात्म्याचं निरंजन, निराकार, सिद्धस्वरूप चित्र रेखाटलें गेलें आहे. साऱ्या त्रिभुवनांतील यच्चयावत् पदार्थ तुझ्या आरशासारख्या निर्मळ मनांत दृग्गोचर होत आहेत.

तूं धन्य आहेस !

★ ★

# ठगा ?

किती तुझी फसवेगिरी चालली आहे ! दुसऱ्याला हातोहात फसविणें याला आजच्या युगांत 'चातुर्य' म्हणतात. हें चातुर्य ज्याच्या जवळ नाहीं तो भुकेकंगाल होऊन दारोदारीं नौकरीसाठीं फिरतो. जवाहिऱ्या गिऱ्हाईकांच्या गळचांत हिरा म्हणून कांच बांधतो गवळी दुधांत पाणी घालून तें उत्तम दूध म्हणून खपवितो. व्यापारी मालांत भेसळ करतो. सर्वत्र ही विकृति आहे.

या विकृतीचं मूळ मनांत आहे. ज्याच्या मनांत आत्म-अनात्म विचार नाहीं, सारासार विवेक नाहीं, तो माणूस भौतिकतेला अति महत्त्व देतो. या विकृतीनं त्याचं मन इतकं विकृत होतं कीं, 'जें करतो तें चांगलें' असा त्याचा वाईट ग्रह होतो.

परंतु थोडा विचार केला तर फसवणूक दुसऱ्याची होत नाहीं. दुसरा फसला आणि आपणाला त्यापासून फायदा झाला ही कल्पना चुकीची आहे. दुसऱ्यांना फसवितांना आपल्या मनाला पडणाऱ्या विकृतीच्या गांठी आपणास दिसत नाहींत.

वाईट विचारांनी मनाचा तोल, तितिक्षा, सहनशीलता निघून जाते. तुझं खरं अस्तित्व या मानवोचित गुणांमुळंच आहे. या गुणांना सोडून मिळालेलं सम्राट्पद देखील तकलादी असतं. सध्याच्या आविष्कारांनीं तें पद धुळीला मिळालें आहे.

याची जाणीव तुला होतांच गरुडाच्या आवाजानं फणींद्राची त्रेधा उडावी तशी तुझ्या विकारांची स्थिति होईल. विकारांचे पाश सैल होतील. तुझं मन निर्मळ होईल. याच निर्मळ स्थितींतून जगाला हिंसेच्या, लोभाच्या, परिग्रहाच्या मगरमिठींतून सोडविणारे चातुर्याचे बोल तुझ्या दिव्य वाणींतून निघतील ! ★

# पंडिता !

किती हें अध्ययन ! काय हा ग्रंथसंभार ! दररोज वाचन. दिवसा-रात्रीं वाचन ! कधीं मनाला विचार करायला तरी सवड देतां का ? आत्मचिंतनाच्या गुहेंत शिरून कधीं देहधारी आत्मदेवाचं दर्शन घेतलं आहे का ?

सुखाचा प्रश्न सोडवावा म्हणूनच ना सारीं शास्त्रं अन् पुराणं ! मिळालं का सुख ?

उलट मी पंडित म्हणून गर्वानं तुझ्या हृदयांत ठाण मांडलं. स्वतःचंच खरं म्हणून अनेक गुणात्मक वस्तूंच्या एकांगाची मांडणी केलीस व तीच सत्य म्हणून साऱ्या जगाला सांगत सुटलास.

तुझ्या पुढील सारे प्रश्न तुला तरी सुटले आहेत का ? सुखाचा मार्ग तुला तरी कळला का ?

नाहीं ना ! मग जें ध्येय होतं तें विसरून साधनाशीं कां खेळत बसलास ? सारे ग्रंथ अन् पुराणं बालकांचीं खेळणीं आहेत. क्षणभर विरंगुळा म्हणून वापरायचीं तीं. तूं मात्र सारा जन्मच त्यांच्याशीं खेळत बसलास.

सुख कुठं आहे म्हणून विचारलंस का कधीं आत्म्याला ? त्याला न विचारतां तूं तें पुस्तकांत धुंडाळत बसलास ! पुस्तकी ज्ञानाचीहि धुंदी असते—दारूसारखी. त्या धुंदींतून बाहेर पड.

आत्मा हाच एक ग्रंथ आकाशाहून विशाल, सागराहून गंभीर अन् पृथ्वीहूनहि अनाकलनीय आहे. तो ग्रंथ अगोदर वाच.

४.. * *

# कामिनी !

तुझ्या मोहक शंखाकृति अवयवांनी तूं प्रियकराला मोहून टाकलें आहेस. मधुर मधुर शब्दांनीं त्याच्या मनावर भुरळ टाकली आहेस. मोहक हावभावांनीं त्याचं चित्त हरण केलं आहेस. तुझ्या रूपावर, तुझ्या सौंदर्यावर तूं हें सारं करीत आहेस.

हें सारं करतांना तूं तुझ्या खऱ्या प्रियकराला वंचित करीत आहेस. तुझ्या या भौतिक शरिराचा खरा प्रियकर बाहेर नाहीं, तो आंतच आहे; त्याला ओळख.

तो प्रियकर म्हणजे तुझा आत्मा. त्याच आत्म्याच्या सौंदर्याचं तेज तुझ्या या भौतिक शरिरावर पसरलें आहे. तो आत्मा निघून गेला तर हा सारा प्रेताचा साजच ठरेल.

सौंदर्याच्या निर्मात्या आत्म्याला तूं ओळखलं तर हें सौंदर्य सुप्रतिष्ठित होईल, आराध्य होईल, चिंतनीय होईल.

★ ★

१५१३५

# यात्रिक !

किती देश पायदळीं घातलेस ? किती तीर्थराजांचें दर्शन तूं घेतलेंस ? उंच उंच डोंगरमाथ्यावरील देवळांतील पाषाण-मूर्तीचें दर्शन घेण्यासाठीं कोण यातायात सहन केलीस ! नद्या, नाले, किर्र दाट झाडीचीं जंगलें ओलांडलीस !

सम्मेदशिखरावरील तीर्थंकराच्या चरणपादुका पाहण्यासाठीं तूं पायीं प्रवास केलास. गिरनारच्या नयनमनोहर प्रदेशांत जाऊन भ. नेमिनाथांचं तूं दर्शन घेतलंस. भ. नेमिनाथांची सहचरी असलेली तपस्विनी राजुलबाला हिचंहि दर्शन घेतलंस.

पण पाण्यासाठीं मृगजळ धुंडाळणाऱ्या हरिणाप्रमाणं देहसंतापाशिवाय तुला कांही मिळालं का ?

हे योगिरूप मना, हा सारा प्रवास करतांना, तीर्थाटन करतांना तुझ्या, या भौतिक शरिराबरोबर कोण हिंडला ठाऊक आहे तुला ? – ज्याला शोधण्यासाठीं तूं हिंडलास तो तुझा शिवस्वरूप आत्मा ! नाहीं ना ओळखलंस तूं त्याला ?

संकल्प-विकल्पांच्या जाळ्यांत सांपडलेला तुझा आत्मा तुला कळला नाहीं तर हें तुझं देशाटन अखंड चालू राहील.

वेड्या, पाणी घुसळून का लोणी निघणार आहे ?

★ ★

# भिकारी !

कुणाकडून भिक्षेसारखी ही लाजीरवाणी न् निंद्य कृति करून घेत आहेस, हें नाहीं कळलं का तुला ? कुणाला दीनपणें बोलावयास लावत आहेस, ठाऊक आहे का तुला ?

प्रत्यक्ष परमेश्वराला तूं भीक मागावयास लावत आहेस. परमात्म्यास तोंड वेंगाडावयाला लावत आहेस. शिवस्वरूप आत्म्यास दीनपणें बोलावयास लावत आहेस.

तुझ्या शरिरांत निवास करणाऱ्या आत्मराजाला तूं भिक्षे-सारख्या नीच कामास जुंपलें आहेस.

धन्य रे धन्य !

★ ★

# गुराख्या !

गायी–म्हशींना एकाच कुरणांत चारून चारून तुला कंटाळा कसा येत नाहीं ? रोज रोज तेंच करतांना तुला तें सोडून द्यावं, असं कां वाटत नाहीं ?

तुझ्या आशा-आकांक्षांना या साध्या, भौतिक कुरणांत चारतां चारतां तुला असं कधींच नाहीं का वाटत, कीं एकदां नंदनवनांत जाऊन यावं म्हणून.

त्या नंदनवनांत चल. जिथं तुझीं इंद्रियं बंधनांत राहतील आणि आत्मा अनंत आकाश न् पृथ्वींत मनसोक्त संचार करूं शकेल. त्या आत्मानुभवाच्या नंदनवनांत तूं शिरलास तर परत घरीं येण्याची तुझी काळजी नष्ट होईल.

त्या नंदनवनांत अहर्निश प्रकाश आहे, कसलाहि उपद्रव नाहीं. हिंस्र–पशूंचा त्रास नाहीं.

तुझ्या मुरलीच्या तालावर सारी सृष्टि नाचेल. सारं नंदनवन सौरभान्वित होईल. चल त्या नंदनवनांत.

★ ★

# लोखंड !

थोडा वेळच विस्तवाशी तुझा संबंध आला. पण त्याच संबंधामुळं हा लोहार तुला घणांनीं ठोकून काढत आहे. काय तुझी दैना ! किती कठिण होतं तुझं अंग ! पण दुष्टांशीं मैत्री केली अन् त्याचे हे परिणाम तुला भोगावे लागत आहेत.

हे मना, क्षणभर क्रोधानं तूं तप्त होतोस, विकारांनीं तप्त होतोस आणि मग अखंड दुःखाचे घण तुला सहन करावे लागतात. सोड हा दुर्जन इंद्रिय सुखाचा सुरुवातीला सुखद वाटणारा सहवास !

★ ★

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत


# बगळ्या !

तूं किती पांढरा शुभ्र ! किती मोहक अन् आकर्षक ! पण तूं इथं तळ्याकांठीं कां बसलास ! आप्तेष्टांचा, सर्वसंगपरिग्रहांचा त्याग करून कसलं चिंतन चाललं आहे तुझं ! आणि पृथ्वीचाहि मोह नको म्हणून का एक पाय वर उचलून उभा आहेस ?

ही फसवणूक आहे. तुझी अन् जगाची फसवणूक ! साऱ्या फसव्या विश्वाचं प्रतीक होऊन तूं उभा आहेस. या फसवाफसवीनं तूं जीवनाचे प्रश्न सोडवूं इच्छितोस. पण अशानं ते प्रश्न सुटणार नाहींत. विकृत मनानं तूं प्रश्न सोडवूं पाहतोस. कांही मासे फसतील. हाच अनुभव जमेला धरून तूं उभा आहेस. अनुभवाच्या आधारावर उभं असलेलं तुझं जग संकुचित आहे. पोटाच्या पलिकडचं विश्व तुला नको आहे.

कधीं मंदिरं, कधीं राज्यं, कधीं युद्ध अन् कधीं शांतता यांच्या नांवाखाली तूंच हा फसवा व्यापार केलास. फसवणुकीनं फसवणूक मूळ धरत आहेत. हृदयांतील क्षमता, मृदुता, ऋजुता, निर्लोभता यांचा नाश करणारी ही वल्लरी म्हणजे फसवणूक !

जितकं तुझं शरीर निर्मळ तितकं तुझं मन व्हावं असं वाटत असेल तर सोड ही फसवणूक. स्वतःला फसवण्याइतकं पाप कोणतंच नाहीं ! निर्मळ आरशाशिवाय त्यांत तुझ्या आत्मब्रह्माचं स्वरूप कसं दिसेल ?

★ ★

# पतंगा !

दिव्याच्या तेजस्वी प्रकाशानं तुझे डोळे दिपले आहेत. त्या दीप्तीच्या मोहानं तूं दिव्यावर झडप घालतोस आणि प्राणाला मुकतोस.

अरे वेडया, सुरी सोन्याची असली म्हणून का ती उरीं खुपसून घ्यायची ? ज्याला तूं प्रकाश म्हणतोस ती दाहकता आहे. जें जवळ करावंसं तुला वाटतं तेंच तर त्याज्य आहे. जे तुला 'आप्त' वाटतात तेच तुझे वैरी आहेत.

★ ★

# कोळी !

तूं आतां निश्चयी बनलास. ध्येय पताका घेऊन तूं आतां आघाडीवर निघालास. जाळें बांधण्यास तूं सुरुवात केलीस खरी. पण तें बांधतांना तुला हजारदां अपयश येईल. अपयश उन्नतिशिखराची पायरी आहे हें लक्षांत ठेव. अपयशानें निराश होऊं नकोस

निर्दोष हो आणि चालू ठेव काम. एवढें थोर घरटें एकाएकीं का बांधलें जाणार आहे ? क्रमाक्रमानें इमारत चढेल पण . . .

. . . पण त्यासाठीं तुजजवळ अविश्रांत कष्ट, ध्रुवनिश्चय आणि अविचल ध्येयदृष्टि पाहिजे. तुझ्या भावनेच्या उंचीबरोबर या घरटयाची उंचीहि वाढत जाईल.

कोळीराजा, वीण तुझें आत्मतेजाचें जाळें.

★ ★

# नटराज !

साऱ्या रंगभूमीचा महान् राजा आहेस तूं. रंगभूमीवर तूं आलास तर सारे प्रेक्षक हास्य, रति, अरति, खेद, भय, जुगुप्सा, कारुण्य, क्रोध, मद, मत्सर इत्यादि अनेक चल, अचल भावनांच्या रक्तप्रवाहांत तल्लीन होतात.

स्त्री म्हणून कुणाचा संसार सुखाचा करतोस, तर कधीं पुरुषरूपांत त्याच संसाराची होळी करतोस. कधी कुणाची पत्नी तर कधी कुणाची माता ! कधी कुणाचा पिता तर कधी कुणाचा मुलगा !

कधी राजपुरुष, कधी पुरोहित, कधी वैश्य तर कधी शूद्र ! सारींच कामें किती तल्लीन होऊन तूं करतोस !

ही तुझी कला मला कां बरें साध्य होत नाहीं ? सारं तल्लीनपणें करीत असतां 'मी त्याहून वेगळा आहे' अशी तुझी भावना असतेच. तसं माझं कां होत नाहीं ? माझ्या आत्म्याचं वेगळं अस्तित्व मला अद्यापि कां ओळखतां येऊं नये ? मीहि जगाच्या रंगभूमीवरचें एक पात्र ! मग त्या पात्राहून वेगळं माझं अस्तित्व आहे, हें मी कां ओळखूं शकलें नाहीं.

ही विद्या शिकवशील का, हे नटा !

★ ★

# मृगा !

कोणत्या संगीतानं तल्लीन झाला आहेस एवढा ? अप्सरेच्या, गंधर्वाच्या कीं कोकिळाच्या ?

संगीताच्या मधुर सुरानं एवढा तल्लीन झालास ! पण तिकडे पाहिलंस का ? तुला मारण्यासाठीं तुझ्या इंद्रियांना मोहजालांत धरतील असे मधुर आलाप त्या व्याधानं निर्माण केले आहेत, हें तुला कळलें कां ?

सुटला पहा त्याचा बाण ! झालास ना घायाळ ?

हेंच तर मी म्हणत होतें. तूं इतका कसा रे भाबडा ? श्रुतिसुखद आलापासाठी स्वतःचे प्राण कां खर्चिलेस ?

★ ★

# रेसच्या घोड्या!

किती चपळाईनं धावत आहेस ! साऱ्यांना मागं टाकायचं हाच एक ध्यास !

कशासाठीं ही धावाधाव ?

तूं पहिला आलास याचे वर्तमानपत्रांतून येणारे फोटो तूं पाहणार आहेस का ?

लोकांना पैसा मिळवून दिल्याबद्दल 'दानशूर' म्हणून तुझा लौकिक होणार आहे का ?

अरे वेडया ! हें जीवन म्हणजे घोडदौडच आहे. सगळ्यांना पळत जाणं क्रमप्राप्त आहे. काळाच्या तीव्र गतिमानतेंत आपण सारेच सापडलों आहोत. मी टांगा ओढून ओढून मरणार, दुसरा फेरफटका करून करून मरणार आणि तूं पळून पळून.

... मरणाचा बोळा फिरला की पाटी कोरी. त्यांतून पलिकडे–जीवन मरणाच्या दृश्यमान जगाच्या पलिकडे-जाण्याची हिंमत असेल तर चालूं दे तुझी दौड !

★ ★

# वाट !

वाटसरूची सोबतीण तूं !

अनोळखी वाटेनं नेऊन तूंच नाहीं का निश्चित मार्ग दाखविलास ?

मी एक गांव सोडल्याशिवाय दुसरं गाठूं शकत नाहीं.

पण तुझं सारंच अलौकिक ! दोन्ही गांवांच्या पाठीवर हात ठेवून त्यांना तूं एकाच समयाला स्पर्श करूं शकतेस, जाणूं शकतेस !

आदि, मध्य व अंतीं सर्वत्र तूंच आहेस. मी नुसता रेषे-भोवती फिरणारा एक बिंदू !

स्वर्ग-मध्य-पाताळाला युगपत् स्पर्श करणाऱ्या परमात्म्याची सख्खी बहीण दिसतेस !

मलाहि तूं बहीण समज ! आणि तुझं हें भूत-भविष्य-वर्तमानाचं एक समयावच्छेदेकरून ज्ञान करून घेण्याची कला मला शिकव !

★ ★

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ...८२०३२... विः ...निबंध...
क्रमांक ...९६५८... नों: दि: ३.२११२५६

# वादळ !

खूप सोसाटयाचा वारा सुटूं दे. सारा दर्या खवळून जाऊं दे. पर्वतप्राय लाटांचें तांडवनृत्य निर्माण होऊं दे ! प्रलयकाळाचीं पावलं वाजत आहेत कीं काय अशी मेघगर्जना होऊं दे. अखिल ब्रह्मांडाचीं शकलं शकलं करील असा विद्युत्पात होऊं दे ! समुद्र अन् पृथ्वी याच्यांत जणुं ऐक्य निर्माण होत आहे असा भयानक प्रसंग घडूं दे.

अशा प्रसंगानं जें घडणार नाहीं तें क्षणार्धांत मोहाला बळी पडल्यानं घडतं. अनंत काळ टिकवून ठेवलेली माणुसकी क्षणाभरांत दानवीरूप धारण करते. नैसर्गिक वादळांचा आवाज च तेवढा मोठा असतो. पण ही 'पेल्यांतील' अन् 'ओठांतील' वादळं दिसायला लहान असलीं तरी अधिक हिंसक अन् अधिक राक्षसी असूं शकतात.

हे वादळांतील तुफान वाऱ्या ! माझ्या अंगांतील क्रोध वाहून ने. माझ्यांतील विकारांच्या राशी तूं पोटांत घे. माझ्यां-तील अहंकारावर एकदां तरी वीज पडूं दे.

जें तूं कधींच करूं शकला नाहींस तें एकदां तरी कर.

★ ★

# पांखरा !

आकाशांत उंच उडत उडत तूं कुणाकडे येत आहेस ?

माझ्या स्वर्गस्थ जिवलगाचा कांही निरोप तूं आणला आहेस का ?

स्वर्गांत कुणाची रिकामी जागा मी भरून काढावी म्हणून आमत्रंण देण्यासाठीं तूं आला आहेस का ?

या देहाची राख, येणाऱ्या कुणा महात्म्याच्या शरीर निर्मितीसाठीं हवी आहे हें सांगण्यासाठीं तूं येत आहेस ?

कीं बरेंच दिवस मी तेथें गैरहजर राहिल्यामुळें तेथील मंडळींची अशी समजूत झाली कीं, मी या मर्त्य लोकांत फारच रमून गेलें आहे.

छे ! छे ! तसें कांही नाहीं. या लोकांत मी रमणेंच शक्य नाहीं. माझा देश सोडून मी प्रवासासाठीं आलें आहे. हा प्रवास मी थांबवावा अशी तुझी इच्छा असेल तर निरासक्तीनं मी हा देह खाली ठेवीन. ठेवतांना या देहाचं पावित्र्य राहील, मातीचं पावित्र्य राहील, अशा गंभीर समारोहानंच मी तो खाली ठेवीन.

जसा जन्माचा समारंभ तसा मरणाचा ! निरोप देतांना नाहीं का समारंभ करीत तसा...... अगदी तसा !

* *

# सम्राट् !

तुझ्याकडे जगांतील सारी संपत्ति, सारं वैभव, सारी सत्ता आणि मत्ता ! तुझ्याकडं जें नाहीं तें जगांतच नसावं. अन् तुझ्याजवळ जें आहे तें इतर कोणाकडेहि नसावं असा जणुं विधिसंकेतच.

तुझ्या जनानखान्यांत उत्तम उत्तम सौंदर्याच्या खाणी असलेलीं स्त्रीरत्नें आहेत. शेंकडों सौंदर्यसम्राज्ञी तुझे पाय चुरत आहेत, तुला हवा घालत आहेत, तुझ्या मनाला संतोष देत आहेत.

हें सारं असूनहि तुझ्याकडे चार स्त्रीरत्नं नाहींत.

तीं कोणतीं म्हणून तूं विचारशील. 'हें बत्र ! सवतीवरहि प्रेम करणारं 'मैत्री' नांवाचं स्त्रीरत्न तुझ्याकडं नाहीं.'

'अन् दुसरं –सवतीला मूल झालेलं पाहून प्रमुदित होणारं 'मुदिता' नांवाचं स्त्रीरत्न तुजजवळ नाहीं.'

'तिसरं ... सवतीच्या मुलाच्या दुखण्यानं जिचं वात्सल्य कारुण्यानं उचंबळून येईल असं 'करुणा' नांवाचं स्त्रीरत्न तुझ्यापाशीं नाहीं.'

'चवथं ... तुझं प्रेम सवतीपेक्षां स्वतःवर कमी आहे हें जाणूनहि विवेकानं त्याची उपेक्षा करणारं 'उपेक्षा' नांवाचं स्त्रीरत्न तुझ्याकडं नाहीं.

★ ★

# कथा-लेखका !

अनेक जीवांचे संसार तूं रंगविलेस. चोर, डाकू, दर्यावर्दी खलाशी यांच्या कथाहि तूं लिहिल्यास. राजा-राणीच्या गोष्टी सांगून लहान मुलांमुलींचं मन तूं रिझविलंस. प्रणयाच्या गोष्टी सांगून तरुण-तरुणींचीं मनं तूं उद्दीपित केलीस. खाद्यपेयांचीं वर्णनं करून भोजनभाऊंची भूक तूं शमविलीस. शब्ददुनियेचा जादुगार म्हणून सारे लोक तुला ओळखतात. कथांतील पात्रांच्या स्वभावाचे पापुद्रे न् पापुद्रे तूं उघडे केलेस. तूं जगाचा अद्वितीय कथालेखक ठरलास !

पण तुझ्या जन्माची कहाणी तूं वाचली आहेस का ?

हृदयांत उठणाऱ्या अनेक विकार अन् विचारलहरींचं तांडवनृत्य तूं पाहिलंस अन् तें लिहिलंस. परतु त्या समंधाचं शांतवन तूं करूं शकला आहेस का ?

इतरांची करमणूक करण्यासाठींच का तूं जन्माला आलास? दुसऱ्यांची भूक शमली म्हणजे तूं तृप्त होणार आहेस का ? दुसरे आनंदी झाले म्हणजे तुझें दुःख कमी होणार आहे का ?

अंतर्मुख होऊन आत्मदेवाचं दर्शन तूं घेतलं आहेस का ? 'कोऽहं' म्हणून आर्ष द्रष्टयांच्या मनांत उद्भवलेला प्रश्न तुझ्या मनांत कधींतरी उद्भवला आहे का ? आत्मचिंतनाच्या शांत गुहेंत क्षणभर तरी तूं शिरला आहेस का ? नसशील शिरलास तर तेथें अवश्य जा, आणि जो अनुभव येईल तो मग लिही. ती कथा अमर-कथा होईल. रामायणासारखी अमर ! रामायणासारखी लोकोत्तर !

* * ५

# मांत्रिक !

मंत्राच्या सामर्थ्यानं भूत, पिशाच्चांनाहि तूं ताब्यांत ठेवल्याचं सांगतोस अन् तशी कांही किमयाहि करून दाखवितोस. केवढा अभिमान तुला त्याचा !

कसल्याहि भयंकर सर्पांना तूं वश केलं आहेस. विषारी जंतूंच्या मरणप्राय दुःखालाहि उतारा देण्याचं सामर्थ्य तुझ्या मंत्रांत आहे. धन्य आहेस तूं.

पण असा मंत्र आहे का तुझ्याजवळ कीं ज्यायोगें माझ्या अंगांतील क्रोधाचं हलाहल विष निघून जाईल ? काम विकाराच्या भयंकर दंशावर तुझ्याकडं कांही औषध आहे का ? 'हें माझं' 'तें माझं' म्हणून हव्यासानं पैसे गोळा करण्याच्या समाज अन् आत्मघातक प्रवृत्तींवर कांही उपाय आहे का तुझ्याकडे ? अविचाराचं, संभ्रमाचं, संशयाचं विष दूर करण्याचा आहे का मंत्र तुझ्याकडे ?

'नाहीं ?'

नाहीं म्हणू नकोस ! आहे तुझ्याकडे तो मंत्र. तो मंत्र म्हणजे आत्मश्रद्धा – आत्मविश्वास ! या आत्मश्रद्धेच्या महामंत्राच्या घोषानं परमात्म्यावर विश्वास ठेवून तूं कार्यप्रवृत्त हो म्हणजे काम झालंच म्हणून समज !

★ ★

# दिगम्बर पुरुषा !

नवजात शिशूसारखं पवित्र, मंगल होतां यावं म्हणून तूं सर्वस्वाचा त्याग केलास ! बालकासारखं होतां आलं का तुला ?

भोगलेल्या सुखाचे अन् दुःखाचे ओघळ सुकले तरी वण कायमच आहेत. पूर्वीचे सुखदुःखाचे प्रसंग आठवून आजहि तुझ्या मनांत विकाराचे तरंग उठत आहेत.

असं कां होतं ?

तूंच मनांत विचार कर. तुला शिशूसारखं मांगल्य आणायचं आहे तर तुझं मन आरशासारखं निर्मळ झालं आहे का ?

तसं नसेल झालं, तर कात टाकणाऱ्या पण विष न टाकणाऱ्या सापाप्रमाणं तुझी अवस्था होईल.

कपडे टाकलेस पण मनांतील क्रोध, मान, मद, मत्सर कुठे टाकले आहेस ?

त्यांना सोड. जे लवकर सोडतां येत नाहीं तें आधी सोडण्याचा प्रयत्न कर. जें सहजसाध्य आहे तें करून साधु म्हणून मिरवूं नकोस. तुझं जीवन तें कलंकित करील.

★ ★

# आर्य स्त्री !

परमात्मा कसा असेल याचा मी विचार करतें त्यावेळीं नेहमी स्त्रीचीच मूर्ति माझ्या डोळ्यापुढें उभी राहते. असं कां व्हावं ? परमेश्वराचं चिंतन करतांना त्याचं कांही तरी स्वरूप निश्चित करावं असं मी ठरविलं, अन् मूर्ति घडविली. ती हुबेहुब एका आर्य-स्त्रीसारखी निर्माण झाली. ती त्या अन्य व्यतिरिक्त होऊंच शकणार नाहीं असं आतां वाटूं लागलं आहे.

कारण ती समतेची प्रतीक आहे. त्यागाचा त्रिकाल आदर्श म्हणून ती उभी आहे. कोणाकोणाचा म्हणून सांगूं ! दारुडे, व्यभिचारी, व्यसनी, संन्यासी, ब्रह्मचारी, अवतारी पुरुष, तीर्थंकर, प्रेषित या साऱ्यांच्या संगतीचा तिला पुरा अनुभव आहे.

पण तिनं सर्वांवर प्रेम केलं. स्वर्वस्वाचं दान दिलं. मारहाण, दारिद्र्य, विरह, वियोग इतकंच काय विक्रीला देखील ती वस्तूसारखी उभी राहिली. सम्राज्ञीपदहि भोगलं अन् बटीकहि झाली. पण या साऱ्या सुखदुःखांत अविचल सत्यासारखी ती उभी होती.

कोटयवधि वर्षांत घडणाऱ्या साऱ्या घटना जसा सूर्य पहात आला आहे; त्याला कधींहि त्याचा हर्ष विषाद वाटला नाहीं तशी ही आर्य स्त्री ! भेदांतहि एकत्व पाहणारी, अनेकांत एक अन् एकांतहि अनेक पाहणारी प्रत्यक्ष सरस्वति देवि !

★ ★

# सेनापति !

एकदां यक्षानं धर्मराजाला एक प्रश्न विचारला होता--
' बीं फुटून दोनच पानें सुरुवातीला कां फुटतात ? '

काय उत्तर दिलं होतं ठाऊक आहे तुला या प्रश्नाचं धर्मानं ?

धर्म म्हणाला होता-- प्रत्येक वस्तूकडं दोन तऱ्हेनं पाहतां येतं याचं तें सूचक आहे. जें आपणाला सत्य वाटतं तें इतरांना तसं वाटेलच असं नाहीं. जें एकाला अन्न तें दुसऱ्याला विषहि असेल.

याची सदैव जाणीव असणारा माणूसच खरा सेनापति आहे. कारण तो आपल्या मताबरोबर इतरांचंहि मत गृहीत धरतो. आपल्या मताप्रमाणें इतरांच्याहि मतांचा तो आदर करतो.

दोन्ही पक्ष सांभाळतो तोच खरा सेनानी ! कां ? तर त्याला युद्धाचा प्रसंगच येत नाहीं. त्याच्या संतुलित मनामुळं तो विकारांच्या अधीन होत नाहीं. जो विकारांच्या अधीन न होतां विचार करूं शकतो, निर्णय घेऊं शकतो आणि त्या प्रमाणं आचरण करूं शकतो त्या सेनापतीचा कधींच पराजय होत नाहीं. कारण जय अन् पराजय यांत शब्दाव्यतिरिक्त अंतर तरी काय आहे ? तो या दोन्ही शब्दांचा साक्षी आहे. दोन्ही शब्दांनीं त्याच्या मनांत विकार उद्भवत नाहीं.

असं सेनापतित्व तुला मिळालं आहे का ?

★ ★

# अ‍ॅटम बाँब टाकणाऱ्या वैमानिका !

किती घेतलेस बाँब्स तूं आपल्या विमानांत ? दोनच ? वेडया......! हिशेब चुकलास की काय ? दोननीं काय होणार ? शंभर घे...सहस्र घे...लक्ष घे... कोटयवधि अ‍ॅटमबाँब्स घे.....!

मानवी मनांतील क्रोध, मान, मद, मत्सर, काम, ईर्षा, असूया इत्यादि अनंत विकारांना कायमची मूठमाती द्यायची आहे ना ? मग या अनंत सैन्याला दोन बाँब्स कसे रे पुरतील ?

'पुनः युद्ध नको' यासाठींच ना ही धडपड ! पण एवढयानं युद्धं थांबणार का आहेत ?

तूं त्या उंटावरच्या शहाण्यासारखा आहेस. मान कापूनहि मान निघालीच नाहीं. शेवटीं मडकें फोडा म्हणून सांगितल होतं त्यानं. तसाच तूंहि दिसतोस. मानवतेसाठीं मानवांचा नाश करून कसं चालेल ?

क्रोधादि विकारांवर तुझे उपाय कुचकामाचे आहेत. क्षमा, तितिक्षा, दया, इत्यादि सिंधूंतील पाण्याच्या वर्षावानं जें होईल तें अ‍ॅटम बाँबसच्या वर्षावानं नाहीं होणार !

विकाराच्या साधनांनी विधायक कांहीच होणार नाहीं.

★ ★

# बालक !

बालक म्हणजे मूर्तिमंत प्रेम. प्रेमाचा उगम अन् पूर्तता म्हणजे बालक. तुझ्या हास्याची बरोबरी अनंत परमेश्वराचे शुभाशीर्वादहि करूं शकणार नाहींत. अमूर्त, अबोल न् मुग्ध प्रेमाचं शाश्वत प्रतीक म्हणजे तूं. तुझ्या प्रत्येक बालकृतींतून जगड्व्याळ जगाचं नियंत्रण करणाऱ्या सत्-चित्-आनंदरूप आत्म-देवाचं मंगल स्वरूप दिसतं.

आत्म्यासारख्या दृष्टीला न दिसणाऱ्या पदार्थाला पाह्यचं असेल तर मी सांगेन बालकाकडे पहा. चैतन्याचा पुतळा म्हणजे बालक.

माझं बाल्य कुठं हरपलं? मी मांगल्याची मूर्ति होतें. पावित्र्याचं तेज माझ्यांत होतं. दुःखी जगालाहि संतोषानं हसायला लावीन अशी माझ्यांत शक्ति होती. कुठं गेलं सारं ?

मी तुझ्यासारखी निर्विकार राहिलें नाहीं म्हणून माझं हंसणं प्रेताचं हसणं ठरलं. मी लोभी झालें म्हणून मांगल्यानं पळ काढला.

सापाला जशी घाण आवडत नाहीं तसाच मांगल्याचा लोभ आवडत नाहीं; मला ठाऊक आहे. पण ठाऊक असलेलं करून दाखविण्याची शक्ति गमावून मी हें ठाऊक करून घेतलें आहे. मी ज्ञानजड, क्रीडाजड इतकंच नव्हे तर सर्वंशः जडवादी झालें आहे.

मला सोडीव रे माझ्या बालका या जटतेंतून ! हे आत्मरूप बालका एकदां हंस तरी. म्हणजे मी सुटेन या जडतेंतून.

# अरण्यवासी !

संसारांत त्रास फार, दुःखें अनंत ! त्याशिवाय चिंता, व्यथा आणि अशाच शेंकडों गोष्टी ! संपत्ति मिळवायची म्हणजे लांडी-लबाडी केलीच पाहिजे ! त्या संपत्तीची जपणूक हा त्याहून मोठा त्रास !

हें रणक्षेत्र सोडून तूं जंगलांत गेलास. उपवासांनीं शरीराला तूं आपल्या ताब्यांत घेतलंस. इंद्रियांच्या इच्छांना संयमाचं बंधन घातलंस.

पाणी, माती न् हवा याशिवाय कोणतीहि वस्तू तूं बाळगत नाहींस. अन्नाचा संग्रह तूं करीत नाहींस. लोक देतील त्यावरच तूं संतुष्ट राहतोस.

तुझ्या मौनानं तुझी वाणी अमृतासारखी झाली आहे. शरीरदंडामुळं इंद्रियें तुझीं गुलाम बनलीं आहेत.

तुझा सारा वेळ ध्यानांत अन् चिंतनांत जातो. त्या ध्यान–चिंतनाचं नवनीत तुझ्याकडं आलेल्यांना तूं देतोस. हीच तुझी जनसेवा.

शरिरापेक्षां आत्मचिंतनांत तुझं मन स्थिर झालं आहे. त्यामुळं तुझ्या शरिरावर आत्मिक तेजाची आभा पसरली आहे. सत्यवचनामुळं तुझ्या वाणींत अमृताचे गुण आले आहेत. पुढे हींच वचनं ‘ शास्त्र ’ म्हणून लोक सांभाळतील.

चिंतनशीलतेंतून निघालेलीं हीं विचाररत्नें अनंत काळपर्यंत जनता जतन करून ठेवील.

हीच तुझी अक्षय पाणपोई ठरेल !

★ ★

# पोपटा !

तुला गुरूनं सांगितलं होतं कीं मोहाच्या वनांत जाऊं नकोस. गेलास तर तेथील झाडांना बांधलेल्या आसक्तींच्या नळ्यांना धरून बसूं नकोस. बसलास तर घट्ट धरूं नकोस. सोडून पळून ये.

पण एकदां गुरुजींचं लक्ष चुकवून तूं त्या वनांत गेलास. आसक्तीच्या नलिकांना पायांनीं घट्ट धरून बसलास. अन् स्वतःच 'मला सोडवा' 'मला सोडवा' म्हणून टाहो फोडत आहेस.

वेडया ! तुला कुणीच धरलं नाहीं. तूंच मोहाला घट्ट आवळून धरलं आहेस. तूंच सोडलं पाहिजेस. नुसतं ओरडून कसं भागेल ?

एकदां तुझी मिठी सैल झाली कीं तूं सुटलास.

सोड त्या मोह-नलिकांना आणि कर या अनंत आकाशांत स्वैर विहार !

★ ★

# कायदे पंडिता !

किती अपराधी निरपराधी ठरविलेस न् किती निरपराधी अपराधी ठरविलेस ?

उभ्या जन्माची तुझी कमाई काय ?

ही दौलत, हा बंगला, ही इस्टेट हा थाट ! ही भौतिक कमाई झाली !

पण तूं चतुर आहेस. तूं वाद घालशील – 'परलोक आहे कुठं ? मेलं कीं संपलं !' – खरं ना ?

परलोक नाहीं तर याच लोकांत पापपुण्याची, सत् कर्म – असत् कर्मांची उठाठेव कशाला हवी ? न्याय-अन्याय हवा कशा-साठीं ? नीतिमत्ता हवी कशासाठीं ?

देहवादी जीवन सोडून ध्येयवाद आणला कशाला जीवनांत ?

अंतकाळीं तुझा आत्माच तुला जाब विचारील – काय केलंस उभ्या आयुष्यांत माझ्यासाठीं ? आयुष्यांत कधीं तरी सत्य बोललास का ?

तुजजवळ उत्तर नाहीं, अन् असलंच तर तें कावेबाजाचं उत्तर आहे.

हें सारं करून तुला शांतता लाभली नाहीं. पावित्र्याचं वारं कधींच मनाला शिवलं नाहीं. मांगल्याचा स्पर्श झाला नाहीं. देहाचा कायदाच तेवढा शिकलास. आत्मदेवाचा कायदा विसरलास !

धन्य तुझ्या पांडित्याची !

* *

# तुरुंग !

अजस्र भिंती चढून तुझ्यांतून मी मुक्त होऊं शकेन !

अजस्र भिंती फोडून देखील मी मुक्त होईन !

पण मुक्त झाल्यावर या तुरुंगांत पुनः सापडणार नाहीं यासाठीं मी काय तजवीज केली आहे ? साऱ्या पहारेकऱ्यांना चुकवून मी जाईनहि. पण पाठलाग झाला तर माझ्या संरक्षणाची मजजवळ पुरेशी तयारी आहे का ?

हा देह माझा तुरुंग आहे. हाडामांसाच्या अजस्र भिंती त्याच्या अणुरेणूभोवती वेढा घालून उभ्या आहेत.

रेशमी किडयाप्रमाणें मीच निर्माण केला आहे हा माझा तुरुंग ! अन् तोच प्राणघातक ठरत आहे.

या शरिराबाहेर उडी टाकण्याचं सामर्थ्य कसं प्राप्त होईल ? आत्महत्येनं शरिराची परंपरा बंद पडणार नाहीं; उलट वाढेल !

शरिराच्या अजस्र तुरुंगांत एखाद्या दीन कैद्याप्रमाणं वागावं लागत आहे. यांतहि अ, ब, क वर्ग नाहींत असं नाहीं. पण सारे कैदीच ना ? कैदी तो कैदी ! यांत मी बडा न् तूं छोटा ही कल्पनाच मूर्खपणाची !

हे आत्मदेवा ! मला या कैदेंतून मुक्त होण्याचं सामर्थ्य दे. त्यांतल्या त्यांत मला स्त्रीचं ' मृदूनि कुसुमादपि ' असं शरीर प्राप्त झालं आहे. तें भेदायला, आत्मभृंग्या, तुला कष्ट तर नाहीं ना पडत ?

तूंच निर्णय घे अन् फोड ही अजस्र भित ! ★ ★

# उलूका !

सूर्य नारायण प्रकाशत असतां तूं डोळे बंद करून कां बसला आहेस ?

तूं डोळे बंद करूनच्या करून सारं जग अंधारानं भरलेलं आहे, सारे लोक अज्ञान अंध:कारांत खितपत पडले आहेत, सारे लोक मिथ्या कल्पना उराशी बाळगून आहेत, असं कां समजतोस ?

जें नाहीं तें भासवायचं अन् जें आहे तें खोटं म्हणायचं, हीच तुझी भ्रांति !

यावर तूं म्हणशील " डोळे बंद केल्यावर अंधारच अंधार दिसतो कीं नाहीं, " पण–

उलूका ! तर्कानं तोंड बंद होईल पण मनाला समाधान लाभेल का ?

बुद्धिवादानं तुला भ्रांत सुख मिळालेलं दिसेल. पण त्यांत चैतन्याचं सौख्य कुठलं ?

★ ★

# अस्पृश्य माणसा !

तुझ्या उन्नतीची इतरांनीं काळजी वाहावी इतका तूं पतित आहेस ? तूं का पशुपक्षांहूनहि हतबल आहेस ? तुझ्या उन्नतीचा मार्ग तुलाच आक्रमावयाचा आहे. स्वच्छ तुला व्हायचं आहे. जुगार खेळणं, मद्यपान करणं, धूम्रपान करणं, चैनींत दिवस कंठणं हें तुलाच सोडलं पाहिजे.

तुझं घर तूं मंगल कर. पवित्र कर. देवाची स्थापना कर. मुलांच्या शिक्षणाची, त्यांच्या उन्नतीची काळजी घे.

आत्मोन्नतीचं गाठोडं समितीच्या, सरकारच्या किंवा समाजाच्या खुंटीवर अडकवून तूं मोकळाच राहणार काय ?

'मी अस्पृश्य नाहीं असं म्हण व तसा वाग. मी दीन नाहीं असा निश्चय कर न् तसा वाग.' तुझा निर्णय शूराचा निर्णय असावा. अशा निर्णयापुढं देवळाचीच काय पण मोक्षाचींहि दारं खुलीं होतील.

पण निर्णय तूं घेतला पाहिजेस. नाहीं तर . . . ? नाहीं तर आहे त्याच स्थितींत तुला रहावं लागेल.

★ ★

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्र ४२०३२ ........ वि: निबंध
क्रमांक १६८७ ........ नों दि: २२।११।६६

## दक्ष ।

तूं जागरूक असशील तर तुझ्या कोणत्याहि क्रियेनें जीव मरोत अगर राहोत ती हिंसा होणार नाहीं.

हिंसेची किंवा अहिंसेची कल्पना मनाच्या सविकल्प आणि निर्विकल्प अवस्थेंतून संभवते.

कोणत्याहि सजीव प्राण्याची मरेपर्यंतची स्थिति हिंसेशिवाय शक्य नाहीं. असं असतांहि पाण्यांत राहणारं कमळ ज्याप्रमाणं निर्लेप राहतं त्याचप्रमाणं दक्ष असलेला माणूस हिंसेपासून निर्लेप राहील.

'मी हिंसा करतों' असें म्हणणारा हिंसा न करतांहि मनांत संकल्प केल्यामुळं मनोहिंसेचा भागीदार होतो.

या हिंसा-अहिंसेच्या जाळ्यांतून बाहेर पड. मनाची शुचिता, वाणीची शुचिता अन् क्रियेची शुचिता या तीनच गोष्टी पाळ म्हणजे तूं निर्विकल्प होशील. याच देहीं याच डोळां निर्वाणाचं अतींद्रिय सुख तुला लाभेल.

★ ★

# आकाश !

चंद्र-सूर्याच्या नेत्रांनीं पाहणाऱ्या हे आकाशा ! तुझ्यांतील नैराश्याचे ढग पार वितळून गेले आहेत. सम्यग्दर्शनाच्या प्राप्तीनं तुझं रूप पूर्णपणें पालटलं आहे. इतकं निर्मळ हृदय झाल्यावर त्यांत जगांतील चराचर वस्तूंचं प्रतिबिंब खासच पडेल.

हें प्रतिबिंब म्हणजे या निर्मळ ज्ञानाचा पुरावा आहे.

याच वैभवासाठीं जणुं साऱ्या देवदेवतांनीं तुझ्यावर तारकासुमनें उधळलीं आहेत. चांदण्याच्या शीतल प्रकाशानं तुला अभिषेक घातला आहे.

सर्वत्र व्यापून असणाऱ्या आकाशा ! तुझं दर्शन घेऊन मी संतुष्ट झालें आहे. मांगल्याचं लेणं लेऊन मीहि पवित्र झालें आहे.

★ ★

# कासवा !

तूं खऱ्या समाधिचं – ध्यानाचं प्रतीक आहेस. सविकल्प समाधींतून निर्विकल्प समाधिसुखांत जाण्याचं प्रतीक म्हणजे तूं. कसल्याहि वासनांना बळी न पडणारा प्राणी म्हणजे तूं. वासनांचा हल्ला होतांच तूं आपले हात-पाय, न् डोकं आंत ओढून घेतोस. त्यांचं संरक्षण करतोस. त्यांना स्वैराचारी होऊं देत नाहींस.

सहनशीलतेचा आदर्श तूंच ! तुझ्या पाठीवर होणारे तरवारीचे वारहि तूं सहज सहन करूं शकतोस. संयमाचंच हें फळ.

वासना-क्षयानं तुझं हृदय पवित्र झालं आहे. साधनांच्या व्यापांतून तूं मुक्त होऊन खरं साध्य तुझ्या हातीं आलं आहे. तूं अजिंक्य ठरला आहेस.

भारतीय प्रतीकांतील सर्वश्रेष्ठ प्रतीक म्हणून प्रत्यक्ष प्रभु-मंदिरांतहि तुला मानाचें स्थान आहे.

हे संयमाच्या साधका, तुला माझे प्रणाम !

★ ★

# मानवा !

तिळांतून तेलाचा शोध घेणाऱ्या, जागतिक पदार्थसमूहांचं निरीक्षण करणाऱ्या, जगांतील सर्व पदार्थांना स्वतःचे उपभोग समजणाऱ्या, पृथ्वी, आकाश आणि जलाशय यांना बुद्धिसामर्थ्यानं कह्यांत आणणाऱ्या, दगडांतून देव निर्मिणाऱ्या, अक्षर समूहांतून 'शास्त्र' शोधणाऱ्या, हे मानवा ! कधीं शरिरांत राहणाऱ्या चित्-शक्तीला पाहिलं आहेस का ? त्या शक्तीचा शोध घेण्याचा कधीं तरी प्रयत्न केला आहेस का ? नित्य, निरामय, ज्ञानमय, आनंदघन आत्म्याचा विचार तरी करतोस का ?

★ ★

# डोंबारी !

जीवनाच्या तारेवर तुझं अखंड नृत्य चालूं आहे. जन्म-मरणाचीं दोन टोकं असणारीं ती तार ! किती तोल संभाळून तूं एखाद्या कसलेल्या कलावंताप्रमाणं क्रीडा करीत आहेस ! पण हें सगळं करतांना तुझं सारं लक्ष स्वत:कडे केंद्रित झालं आहे. तूं एकाग्र झाला आहेस. स्वत:चा तोल जाऊं नये म्हणून सारखा जपतोस. पण ही जपणूक इतरांना तूं दाखवीत नाहींस

कोणत्या स्थितप्रज्ञाकडून शिकलास ही विद्या ? सुख-दु:खाच्या टोकांनीं बांधलेल्या या धकाधकींत मी माझ्या जीवनाचं ध्येय विसरलें. अनेकदां अध:पात झाला. पण तुझं उदाहरण डोळ्यापुढं आलं कीं पुन: मी माझ्या आत्मदेवाच्या उपासनेंत जागरूक होतें.

माझ्यांतील विकारांचं मी तिऱ्हाइताप्रमाणं निरीक्षण करतें. त्या विकारांना दूर सारणाऱ्या माझ्यांतील सुप्त शक्तीचा मला सुगावा लागतो. 'आत्मनिरीक्षण आत्मोत्कर्षाची पायरी आहे,' या ऋषिसूत्राची आठवण येते.

आहार, निद्रा, भय आणि मैथुन यांच्या वासनेंत सापडलेल्या कृमितुल्य जीवनांतून मी बाहेर यायला धडपडतें.

त्यांतून बाहेर पडतें न पडतें तोंच क्रोध, मान, मद, मत्सर, लोभ, ईर्षा, असूया इत्यादि मनोविकारांच्या अभेद्य तटबंदींत मी बंदिस्त होतें. हे मनोविकार कधीं विचाराचें तर कधीं धर्माचें,

कधीं पांडित्याचें तर कधीं त्यागाचें खोटें नांव धारण करून येतात.

या मनाच्या तावडींतून सुटायला मी धडपडत आहे. मनाच्या पलिकडे असलेलें दिव्य जीवन मला हवें. त्यासाठीच ही सारी धडपड !

★ ★

# नेति, नेति !

तूं पंडित नाहींस किंवा मूर्खहि नाहींस. ईश्वरहि नाहींस व ईश्वरनिर्मितहि नाहींस. गुरुहि नाहींस व शिष्यहि नाहींस. तू ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य वा शूद्रहि नाहींस. तूं तरुण वा म्हाताराहि नाहींस.

तूं हिंदु, जैन, शिख, ख्रिश्चन, बौद्ध वा मुस्लिमहि नाहींस.

तूं कॉंग्रेसवाला, सोशॅलिस्ट, कम्युनिस्टहि नाहींस.

तूं गोरा, काळा, पीत किंवा ताम्रहि नाहींस.

तूं अमेरिकन, रशियन, फ्रेंच, हिंदुस्थानी वा ब्रह्मीहि नाहींस.

मग तूं कोण ?

तूं मानव आहेस ! तूं शुद्ध, चिदानन्द स्वरूपाचा अमर आत्मा आहेस ! तूं प्रत्यक्ष परब्रह्म आहेस.

★ ★

# श्रोता !

कुठें निघालास ?

कुणाचं व्याख्यान, कुणाचं प्रवचन, कुणाचा उपदेश ऐकायला निघाला आहेस ? कितीदां तरी ऐकलीं आहेस तूं प्रवचनें अन् व्याख्यानें ! पण तीं सारीं कानाचीं भूषणें होऊन राहिलीं.

तुला वाटलें कीं त्यानं बौद्धिक भूक शमेल. पण वेडया भूक हा विकार आहे – अग्नीसारखा. इंधनानं पेटतो, भडकतो, पण शमत नाहीं.

तुला वाटलं असेल कीं गुरूच्या उपदेशामृतानं वाट सापडेल. पण कधीं तरी मार्ग दिसला आहे का ? जे स्वतःच अंधारांत चाचपडत आहेत, जे स्वतः ज्या मार्गानं कधीं आले–गेले नाहींत ते तुला मार्ग कसा सांगतील !

मित्रा ! आपली वाट आपणच शोधली पाहिजे इतरांनीं दाखविलेल्या वाटा सशानं सिंहाला विहिरींत दाखविलेल्या वाटेसारख्याच घातक नसतील कशावरून ?

तूं आत्मनिरीक्षण कर. तुझा मार्ग तूं शोध.

★ ★

# दानवीर !

याचकांना संतुष्ट करणाऱ्या दानवीरा, तुझं जीवन सार्थक झालं असं का तुला वाटतं ?

हें सारं जीवन म्हणजेच घेवाण–देवाण ! त्यांत हर्ष अन् विषाद कसला ? भूचं दान देऊन श्रमणाऱ्यांना जमीन द्यायला तूं तयार झालास. संपत्तीचं दान देऊन तूं गरिबांच्या दैन्यावर झूल घातलीस.

पण मागितल्यानंतर तूं सारं दिलंस. कर्तव्य म्हणून दिलं नाहींस. प्रेम म्हणून दिलं नाहींस.

ज्या क्रियेंत प्रेम किंवा कर्तव्य नाहीं ती क्रिया व्यर्थ होय. ती सुंदर असत नाहीं अन् दिसत पण नाहीं.

आणखी एक गोष्ट विचारूं तुला ?

तुझ्या हृदयांत एक नम्र याचक उभा आहे. ठाऊक आहे का तुला ? त्याला दिलीस का तूं भिक्षा? तो तुझा अहंकार, तुझा क्रोध, तुझ्या वासना, तुझे विकार मागत आहे.

वाढशील का ही भिक्षा त्याला ?

★ ★

# गायक !

तुझ्या सुस्वर तालबद्ध सुरांनीं सारं वातावरण कसं मोहक न् आकर्षक वाटूं लागलं !

निर्जीव वातावरणहि जिवंत झालं आहे. फुलांनीं डोळे उघडले आहेत. पक्षांच्या मोहक किलबिलाटांत तुझे सूर प्रतिबिंबित झाले आहेत.

मोहरलेल्या आम्रमंजरींत तुझाच राग आलापिला जात आहे.

--पण हें स्वर्गीय गायन आत्मदेवाला जागृत कां करीत नाहीं? मनांतील विकार कां शमवीत नाहीं ? अंध:काराचा पडदा दूर कां सारीत नाहीं ?

गायका, असें संगीत ऐकव कीं साऱ्या वेदना संपतील. केवळ दु:खाचा विसर पडेल असें संगीत नको. दु:खाचा नाश करणारें, अविनाशी सुखाचा अनुभव देणारें संगीत ऐकव.

★ ★

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.

# वाटाड्या !

मी निघण्याच्या तयारींत असतांना तूं दाराशीं आलास. तुझ्या दर्शनासाठीं मी देवळें, चर्च, प्रार्थना–मंदिरें, स्तूप सारीं धुंडाळलीं.

शास्त्रें, पुराणें न् आगम यांतहि शोध केला.

सारं आयुष्य तुझी गांठ पडावी म्हणून धडपडलें.

स्वागत करण्याचं त्राण संपल्यानंतर, सारं शरीर जीर्ण झाल्यानंतर, जीवनाचा दर्या शुष्क झाल्यानंतर, जीवनपुष्प सुकून गेल्यावर तूं आलास......!

दृष्टीनं तुझं रूपहि न्याहाळतां येत नाहीं. स्मृतीनं आकलनहि करतां येत नाहीं.

ये. मी अंधःकारांत प्रवेश करीत आहे. मला वाट दाखव.....!

★ ★

# प्रकाशा !

तुझा शोध करतां करतां विकाराची दाहकताच मी अनुभवूं शकलें.

त्या दाहकतेनं प्रकाश तर दिसलाच नाहीं; उलट हृदयांतलं पावित्र्य काळवंडूं लागलं.

हाच जर प्रकाशाचा मार्ग असेल तर हा जन्म तरी मी कां घेतला ?

अमरत्वाचा संदेश देणाऱ्या, निर्वाणसुखाचा अनुभव देणाऱ्या प्रकाशा, माझा मार्ग केव्हां प्रकाशित करशील ?

घनांधकाराच्या शिळेवर कपाळमोक्ष होईल असें क्षणोक्षणीं भासतें.

हा अंधःकार लयाला नेईल असलें आत्मतेज केव्हां प्रकट होईल ?

हे प्रकाशा, माझी हीच केवळ साधना आहे. मला माझें तेजस्वी रूप परत दे.

★ ★

# प्रभात !

प्रभात झाली आहे. दिशा उजळल्या आहेत. पक्षी मंजुळ गाणीं गात आहेत. तो पहा मोर ! आपला पिसारा पसरून नृत्य करीत आहे ! बेहोष होऊन प्रभूची भक्ति करीत आहे.

पाण्याचा प्रवाह मंजुळ आवाज करीत वहात आहे. घरा-घरांतून जात्यांची घरघर ऐकूं येत आहे. स्त्रिया मंजुळ गाणीं म्हणत आहेत. गवई तालबद्ध सुरांत गाऊं लागला आहे. निर्जीव पदार्थांतूनहि सुंदर निनाद होत आहे.

तुझ्या हृदयांत काय सुरू आहे ? कसले नाना विचार येताहेत ? तुझ्यांत विकारांचे कल्लोळ उठत आहेत.

रे मना ! अशा अवस्थेंत मी प्रभुगुण कसें गाऊं ?

★ ★

# दर्शन !

सूर्य आपल्या सहस्र किरणांनीं प्रभूचें दर्शन घेत आहे. आकाश देखील निरभ्र होऊन प्रभूचें दर्शन घेत आहे. हें सरोवरांतील जल किती स्वच्छ आहे! आपल्या हृदयांत प्रभूचें प्रतिबिंब असावें म्हणून तें प्रयत्न करीत आहे. पवन साऱ्या जगाला स्वच्छ करून प्रभूच्या दर्शनार्थ धावत सुटला आहे. रे चंचल मना, तुझ्या अंतःकरणांत सारा अंधार आहे म्हणून डोळे असूनहि तूं आंधळा आहेस.

ही वनराजी! किती प्रफुल्ल दिसत आहे! हिरवा शालू परिधान करून प्रभूला आपल्या फळाफुलांनीं आळवूं लागली आहे. तो हिमालय उत्तुंग धवलध्वजा फडकवून प्रभूच्या दर्शनार्थ निघाला आहे. तो पौर्णिमेचा चंद्र पिठुरी चांदण्याचा वर्षाव करीत हंसतमुखानें प्रभूचें दर्शन घेत आहे.

पण अंतःकरणांत घोर निराशा सामावलेली आहे. अशा मळकट मनानें मी तुला कसं आळवूं?

★ ★

# पावित्र्य।

सृष्टींत सर्वत्र सुगंध भरला आहे. जाई जुई, बकुल, मोगरा आपापला सुवास सर्वत्र दरवळीत आहेत. गुलाब, चाफा, रातराणी ह्या फुलांनीं स्वतःप्रमाणें आपला सुवास पसरवून सर्वांना सुगंधित केलें आहे. हरीण आपल्या कस्तुरीचा सुवास चोहोंकडे पसरवीत आहेत.

सरोवरांतील तें प्रफुल्लित कमळ! तो केवडा! आपापला सुगंध प्रभूला अर्पण करून कृतार्थ मानीत आहेत.

तूंच कसा अपवित्र? तूंच कसा अमंगल? तुझ्यांतच दुर्गंधी कां भरावी? रे दुर्गंधी मना! अशा अमंगल अवस्थेंत आत्मप्रभूचें दर्शन कसें घडेल?

हीं झाडें पाहिलीस का? हें आम्रफलाचें झाड! तें पेरूचें! हो तरुराजांची पंक्ति, नारळ, केळ, डाळिंब, मोसंबी, बदाम, सफरचंद, द्राक्षें, नारिंगी इत्यादि झाडांची आहे! आपल्या फलभारांनीं तीं सारींच झाडें नम्र होऊन प्रभूचें दर्शन घेत आहेत.

रे अहंकारी मना! तूंच तेवढा अहंकारी आहेस! शालीनतेचा स्पर्शहि कुठें दिसत नाहीं. अशा अवस्थेंत मी आत्मप्रभूचें दर्शन कसें घेऊं?

★ ★

# अर्पण !

काजु, खिसमिस, वेलदोडा, पिस्ते, अक्रोड हीं झाडें आपापल्या ओंजळी भरून प्रभूस फलार्पण करीत आहेत; वाटे-वरच्या वाटसरूंनाहि मुक्त हस्तानें फळें वाटलीं जात आहेत; पण प्रभू ! मी रिता आहे; कोरडी आहे.

मना ! तुझ्याजवळ असें काय आहे कीं जें प्रभु ग्रहण करतील ?

ही बहुरत्ना वसुन्धरा ! आपलीं बहुमोल चित्रविचित्र रत्नं प्रभूला अर्पण करीत आहे. चराचरांना ती आधार देते; आसरा देते ! पण त्याचं फल काय मिळतं तिला ? सारे लोक तिला तुडवतात ! पण ती सहनशील आहे ! साऱ्यांना ती पुत्रवत् प्रेम देते. त्याच्या दुष्कृत्यांना क्षमा करते ! ती क्षमाशील आहे; म्हणूनच प्रभु तिच्या रत्नांचा स्वीकार करतात.

मना ! तूं अत्यंत लोभी आहेस ! थोडासा त्यागहि तुला सहन होत नाहीं. घेतांना दोन्ही हात पसरून पुढें सरसावतोस ! देतांना मात्र गुरगुरतोस; लाल होतोस.

अशा अवस्थेंत मी प्रभूला काय अर्पण करूं ?

★ ★

# औदार्य !

हा पहा अथांग सागर ! किती विशाल ! तसेंच खोलहि तितकाच ! आणि गंभीर पण किती दिसतो ! त्याच्या खोल हृदयाचा ठाव तूं कधीं घेतला आहेस ? अनेक बहुमोल मोत्यांचा संग्रह आहे त्याच्यांत. हे सारे मोती तो प्रभूस अर्पण करतो. त्याचा हार गुंफून प्रभूला देतो. उथळ पाण्यांतून काय मिळणार ? गारगोटयाच ना ! त्याच्यांत मोती कधीं मिळाले आहेत ?

गंभीर अंतःकरणाच्या, उदार हृदयाच्या सागरांतून मोती मिळणार !

अनेक सद्‌गुणांची तूं खाण आहेस ! या तुझ्या बहुमोल गुणांना कशाची उपमा देतां येणार ? पण धीरगंभीर स्वभावाचा असूनहि तूं उथळ होतोस ! अशा वेळीं तुझ्यांतील गुणरत्नांचा लाभ कसा होणार? क्रोध, असूया इ. गारगोटयांचाच अशा वेळीं उद्रेक होणार ! त्यांचीच निर्मिती होणार !

रे मना ! अशा अवस्थेंत मी प्रभूचें दर्शन कसें घेऊं.

★ ★

# सुवर्ण शलाका।

ती पहा सोन्याची खाण! किती मजूर काम करीत आहेत? काय दिसतं तुला तेथें? अरे तें सोनं नाहीं; माती आहे. पण त्यांतून सोनं बनतं! मातीचे सर्व अंश दूर झाले कीं त्यांतूनच सुवर्णाची निर्मिति होते. या सुवर्णाचे अनेक हार तयार करून ते ती खाण प्रभूस अर्पण करीत आहे.

मना! तूंहि सुवर्णाची खाण आहेस. तुझ्यांतील सम्यक्-ज्ञान म्हणजे शुद्ध सोनंच! पण तेंच मलीन दिसत आहे! अनेक विकारांनीं आणि गृहीत–अगृहीत मिथ्या कल्पनांनीं तें ढगाळलेलं आहे. मिथ्या कल्पना दूर सारून तुझं ज्ञान तूं सम्यक् कां बनवीत नाहींस! ज्ञानच सुवर्ण शलाका आहे.

अशा अवस्थेंत मी प्रभूचें दर्शन कसें घेऊं?

★ ★

# समाधान !

तीं काळीभोर शेतं किती दूरवर पसरलीं आहेत ! शेतकरी गाणीं गात गात झाडांना मोटेनं पाणी पाजीत आहे. त्याचं काम अखंड चालूं आहे. त्याला उन्हाची पर्वा नाहीं. भुकेची त्याला ना खंत खंत नि कष्टाचा त्याला ना खेद ! तो ऊंस, ती बहरलेली ज्वारी आणि अमाप पिकलेला तो भात पहा ! हें सारं त्याच्या श्रमाचं फळ ! या धान्यांच्या राशी भरभरून तो सर्वांना अर्पण करतो ! सारेजण सुग्रास नैवेद्यानें प्रभूची पूजा करतात ! शेतकऱ्याचं धान्य प्रभूप्रत जातं ! शेतकऱ्याला आपल्या कष्टाचं समाधान लाभतं ! सारं जग शेतकऱ्याला धन्यवाद देतं.

तुला मोठेपणाची हांव आणि तो मोठेपणाहि कष्ट न करतां तुला हवा ! झीज न होऊं देतां समाधान हवं ! पण कष्टाविना नि झीज झाल्याविना समाधानाला काय महत्त्व आहे ? तें बेगडी समाधान ठरेल. निर्मळ मनानें ह्या समाधानाचा उपभोग तुला घेतां येणार नाहीं.

अशा प्रमादी अवस्थेंत मी प्रभूला कसं पाहूं ? त्याला कशी आठवूं

★ ★

# कृपणता !

धन्य ती गाय ! आपल्या वासरालाहि दूर सारून जगाला दूध देत आहे. तिच्या दुधानें प्रभूला रोज अभिषेक होत आहे. त्यागाचा ती आदर्श आहे ! म्हणूनच जग 'गोधन' म्हणून तिची पूजा करते. तिचें शेण पूज्य मानलें जातें.

मना, अनंतदान हा तुझा स्वाभाविक धर्म ! पण किती रे तूं कृपण ? या तुझ्या स्वभावामुळेंच तुझें अधःपतन चालूं आहे. तुझ्या कृपणपणाचे किती तरी दाखले आहेत !

रे मना, अशा अवस्थेंत मी प्रभुपूजा कशी करूं ?

★ ★

# थोरपण !

गंगा नदीची किती थोरवी ! रत्नाकराला भेटण्यास ती प्रथम किती वेगानें धावत येते ! पण पुढें पुढें ती अधिक गंभीर, अधिक शांत नि अधिक पवित्र बनते ! मार्गांत सर्वांना मोकळ्या मनानें ती पाणी देते ! मार्गांतील जमीन सुपीक बनविते ! लोक हजारों घागरी भरून पाणी नेतात ! पण ती कधीं रागावत नाहीं. ती कधीं कृपण बनत नाहीं. आपल्या शुभ्र जलानें ती सर्वांना शांत करते. पण लोक किती कृतघ्न ! गंगेची थोरवी, तिचा उपकार ते विसरतात. तिच्यांत केरकचरा टाकतात; नानाविध घाण टाकतात; प्रेतें टाकतात; पण वसुन्धरा–पर्वतकन्या गंगा आपल्या मातेप्रमाणेंच सहनशील ! ती लोकांचीं सारीं पापं पचविते ! एवढेंच नव्हे तर त्यांना ती पवित्र करते, पवित्र गंगा स्वतः पवित्र राहून अपवित्रांनाहि पवित्र करते. अपवित्रांच्या संगतीनें ती अपवित्र बनत नाहीं.

मना ! तुझा आत्मा स्फटिकासारखा स्वच्छ ! पण काय तुझी अवस्था ! अपवित्रतेच्या नि अमंगलतेच्या मार्गाप्रत तुझी धांव कां ? तुझी सदा तक्रार अशी कीं दुसरे तुला अपवित्र नि अमंगल बनवितात. दुसऱ्यांना दोष देऊन स्वतः दोषमुक्त होणं फार सोपं असतं; समज, दुसऱ्यांनीं तुला बिघडविण्याचा प्रयत्न केला; तरी पण तूं कां बिघडतोस ? तूं कां अपवित्र होतोस ? प्रत्येक जीव स्वतंत्र आहे. कोणीं कुणाचं अकल्याण करूं शकत नाहीं.

तूं आपल्या कर्मामध्यें दंग रहा ! तुझी सेवा निष्काम असूं दे. हजारों बालिकांचें जीवन तुझ्या हातांत आहे. तुझ्या हातीं समाजानें संस्था सोपविली आहे ! चंदनाप्रमाणें तूं झिजतोस ! निष्काम कर्म करतोस ! पण त्यांत अंतिम समाधान मानूं नकोस! तुझ्यांतील पावित्र्य बिघडवूं नकोस. तुझी संस्था तूं पावित्र्यानें चालवीत असतांहि लोक तुझ्या चित्ताची शांति बिघडवतील. तूं स्थिर रहा. पवित्र रहा. सहनशील राहशील तरच प्रभूचें दर्शन होईल.

★ ★

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ४२०३२ वि: निबंध
१६८८ २२।३।६६

# सभयता !

तुझें दर्शन सर्वांआधीं व्हावें म्हणून मी भल्या पहाटें उठलें. प्रशांत शांतता होती त्या वेळीं ! पवित्रता होती ! पक्षांचे शब्द ऐकूं येत नव्हते. कुक्कुटांचं आरवणं ऐकूं येत नव्हतं, कोणाचीं गाणीं ऐकूं येत नव्हतीं. तुझ्या मुखाशिवाय कोणाचें मुख दृष्टीला पडूं नये म्हणून कोण माझी धांदल !

मी तुझ्या दर्शनाला निघालें; पण मला भीति वाटूं लागली. अंधाऱ्या रात्रीं मला कोणी अडवेल, माझ्या शरिरावर कोणी वार करतील याची भीति मात्र सतत वाटत होती ! कोणी चोर तर नसेल ना, संकट तर नसेल ना, इत्यादि नाना कुशंकांनीं मन गोंधळून गेलं. मी स्त्री पडलें ना ! एकटी कशी निघूं ! अशा नाना कल्पना येत असतांनाच मी निघालें, पण...! माझें मन धैर्य धरेना. पुढें जाववेना.

भित्र्या मना ! तुझा आत्मा निर्भयी असतांना असा कां भिऊं लागलास ? आत्म्याला स्त्री, पुरुष वगैरे भेद आहेत का ? समज तुला कोणीं मारलं, तुझ्या शरिराचे तुकडे केले. तरी देखील शरिराच्या नाशाबरोबर तुझा आत्मा नष्ट होईल का ? आत्मा अमर आहे, निर्भय आहे.

थरथर कांपणाऱ्या अंतःकरणानें, भीतीनें गांगरून गेलें असतां प्रभूचें दर्शन मला कसें घडेल ?

* *

# शुचिता !

आज मी भल्या पहाटें उठलें. सर्वत्र शांत वातावरण होतं. तुझ्या दर्शनाकरितां मी अत्यन्त आतुर झालें होतें. मी डोळे झांकून सरळ तुझ्या दाराजवळ आलें; पण हे प्रभो ! तुझ्या मंदिराचा दरवाजा बंद कसा ? तुझ्या दर्शनाला काय मी पात्र नाहीं ? काय मी पापी आहे ? तुला वाटलें असेल कीं मी स्नान न करतां आलें.... नाहीं, मी स्वच्छ होऊन आलें ! कपडे सुधौत आहेत. सुधौत शरीरहि सुगंधी केलें आहे....

पण प्रभो ! मंदिराचा दरवाचा खुला झाल्याविना तुझें रूप कसें पाहूं ?...

मना, केवळ बाह्य शुचितेचा काय उपयोग ? तुझा अंतःरात्मा शुद्ध कर, शुद्धात्मा दर्पणासारखा आहे; स्फटिकवत् आहे.

अंतर्भूत शुचितेशिवाय प्रभूचें दर्शन कसें घेऊं ?

★ ★

ठाणे
१५१३५

# एकाग्रता!

आज मी स्तोत्रपाठ म्हणत उठलें. भक्तिपाठ अत्यन्त तालसुरांत म्हणत आलें. एवढेंच नव्हे तर या अवधींत आबालवृद्धांना उठवून त्यांनाहि ते म्हणण्यास लावले आहेत. हे संस्कृत श्लोक अत्यन्त कठीण! पण ते शुद्ध म्हणत आलें आहे.

...तरी तुझ्या मंदिराचा दरवाजा बंद कां?

रे चंचल मना! पोपटासारखे नुसते तोंडानें पाठ म्हणून काय उपयोग? तोंडानें तुझा पाठ चालूं असतां तुझें लक्ष कुठें होतें, याचं तूं अवलोकन केलं आहेस? त्या स्तोत्रांतील भाव तूं जाणलास का?

चंचल मना! मन एकाग्र केल्याशिवाय प्रभूचें दर्शन कसं घेऊं?

★ ★

# वैभव !

भल्या पहाटें मी तुझ्या दर्शनास निघालें ! तुझ्या दरबाराकडे निघालें ! साध्या लोकाधिपतीकडे – राजाकडे – जावयाचें म्हणजे केवढ्या मोठ्या लवाजम्यासह जावें लागतें ? मी तर त्रैलोक्याधिपतीकडे – परमेश्वराकडे निघालें, म्हणून मी माझा परिवार गोळा केला. नाहीं तरी या सर्वांना सोडून मी कशी येऊं ? हे सर्व माझ्या सुखदु:खाचे साथी ! यांत कोणी मला जन्म देणारे आहेत; कोणी पालनपोषण करणारे आहेत; कांही माझ्या सुखदु:खांत समरस होणारे आहेत. तसेंच यांत मी ज्यांचं पालनपोषण करीत आहे, शिक्षण देत आहे असा शिष्यपरिवार आहे. म्हणजे माझे जन्मदाते, मित्र, हितकर्ते आणि शिष्य हे सर्व माझ्या परिवारांत आहेत. त्यांना सोडून मी एकटी कशी येऊं ? त्यांचं आणि माझं जीवन एकरूप झालं आहे. अलग अलग अस्तित्वच आम्हांला नाहीं.

ज्याचा परिवार मोठा, ज्याचं वैभव मोठं, ज्याची संपत्ति विपुल अशाकडे साऱ्यांचें लक्ष जातें. मित्रांचें, शेजारचें, गांवाचें प्रांताचें, एवढेंच नव्हे तर सार्वभौम राजाचें पण त्याकडे लक्ष जातें. तें कशाला ? ज्यांनीं संसारत्याग केला अशा त्यागी जनांचें पण तिकडे लक्ष जातें ! मग प्रभो ! तूं तर सर्वांचा अधिपति ! तुझं लक्ष माझ्याकडं चट्कन आकर्षित व्हावं म्हणून मी माझा सारा परिवार घेऊन आलें आहे.

...मी तुझ्या मन्दिराजवळ आलें; पण दरवाजा बंद कसा ?... काय तुला शंका आली कीं काय, माझा परिवार लहान आहे म्हणून ? प्रभो ! माझा परिवार मोठा आहे. त्यांत माझ्या घरांतले, गांवांतले, प्रांतांतले एवढेच काय पण साऱ्या देशांतले लोक आहेत. यावरून माझा परिवार किती विस्तृत आहे हें तुला सहज कळून येईल. या परिवारावरून मी किती लोकप्रिय आहे; लोकनेत्री आहे याची तुला कल्पना येईल.

आतां तरी पाहिलीस माझी संपत्ति ? ...तरी तुझा दरवाजा बंद कसा ? तो उघडल्याशिवाय तुझ्या दरबारांत कशी येऊं ? तुझं दर्शन कसं घेऊं ?...

मना ! प्रभूला तुझ्या बाह्य विभूतीची काय गरज आहे. तुझं अंतरंग वैभव दाखव ! बाह्य वैभवानं प्रभूचं दर्शन कसं होईल ? तूं भाग्यवंत झालास म्हणजेच तुला भगवन्त भेटेल असं समजूं नकोस. या बाह्य वैभवानें तूं स्वत: तरी सुखी होतोस का ? हें वैभव नैसर्गिक नाहीं; तें नकली आहे. तें तुझ्या कामाचं नाहीं.

तुझ्या खऱ्याखुऱ्या आत्मवैभवाचं दर्शन घडव ! 'नाहीं भक्ति, नाहीं भाव; तेथें प्रभूचा अभाव !' हीं आंतरिक भक्ति व्यक्त कर ! हें आंतरिक वैभव असल्याशिवाय प्रभूचें दर्शन कसें घडेल.

★ ★

# मनोमंदिर ।

आज मी मंगल प्रभातीं उठलें नि सरळ तुझ्या दर्शनार्थ निघालें! पण माझे रिते हात पाहतांच मलाच संकोच वाटला. मी शरमून गेलें! तत्काळ बगीच्यांत जाऊन जाई-जुई, गुलाब, मोगरा इत्यादि सुगंधी फुलं तोडून ओंजळ भरली. आंबे, नारिंग, नारळ, डाळिंब वगैरे फळांनीं चांदीचें मोठें ताट पूर्ण भरलें. जिलेबी, बर्फी, पेढे, बुन्दी वगैरे पंचपक्वान्नांनीं ताटें भरलीं. घागर भरून दूध आणलें; दही आणलें. जल, गंध, अक्षत, पुष्प, नैवेद्य, दीप-धूप, फल व अर्घ्य हीं अष्टद्रव्यें मीं आणलीं. हें सर्व वैभव घेऊन मी तुझ्याकडं आलें. सर्वांआधीं तुझंच दर्शन व्हावं म्हणून मी कोणाकडे पाहिलं सुद्धां नाहीं.

...पण हे प्रभो! हें सर्व माझ्या हातांत मी किती वेळ धरूं? माझी शक्ति किती आहे हें तूं जाणतोसच! असं असून माझी ही दीर्घ परीक्षा तूं कां घेत आहेस? तुझ्या मंदिराचीं दारं बंद करण्यास तूं कोणत्या पहारेकऱ्यास सांगितलं आहेस? तुझ्या मंदिराचा रखवालदार कोण आहे तें तरी सांग. तूं देवाधिदेव! तेव्हां तुझ्या मंदिराचा रक्षक मानव प्राणी थोडाच असणार? तो स्वर्गांतील देवच असणार! रे प्रभो! मी आधीं त्याची सेवा करूं काय? मग प्रसन्न होऊन तो तुझ्या मन्दिराचें द्वार उघडेल काय?

हे प्रभो! आतां तुझ्या मंदिराचं द्वार उघडण्यास उशीर होऊं देऊं नकोस. उशीर झाला कीं हीं फलं, पक्वान्नं, हीं

फुलं कोमेजून जातील. हे सारे पदार्थ शिळे होतील. तें पाहून तूं मला कधींच दर्शन देणार नाहींस ...

रे मना, ह्या बाह्य निर्जीव फलां-फुलांनीं व पंचपक्वान्नांनीं का देव दरवाजा उघडेल ? तुझा आंतरिक बगीचा फुलव, फलव. आंतरिक भक्तीच्या दिव्य रसांत डुंबूं देत तीं पक्वान्नें. नंतरच त्या प्रभूचं दर्शन मला घडेल !

* *

# कृपाप्रसाद।

मी माझ्या साऱ्या वैभवासह तुझ्याप्रत आलें! सुंदर सुगंधित फुलं नि फळं घेऊन आलें! पण तुझं दर्शन घडलं नाहीं! तुझ्या अंतरंगांतील भाव मी ओळखलें. माझ्या वैभवाचा नि डामडौलाचा तुझ्यावर विपरीत परिणाम झाला हें मीं ओळखलं! देवत्वाच्या प्राप्तीसाठीं डामडौल निरुपयोगी आहे याची मलाहि कल्पना आली! सुंदर व सुवासिक फुलांनीं भुलून देवाची प्राप्ति होते ही माझी समजूत वेडगळ असल्याचें मला कळून आलें.

संपत्तीनें – वैभवानें तुझी पूजा आतां करणार नाहीं. त्यानं तुझी प्राप्ती होणार नाहीं; अन् वैभवाला तूं भुलतोस असं एकदां सिद्ध झालं कीं, गरिबांच्या मनांत ईर्षा निर्माण होईल; धनहीन लोकांमध्यें तुझ्याविषयीं अनादर निर्माण होईल; नि त्यांच्या चटणी-भाकरीचा अनादर होईल. याचा परिणाम म्हणून ते तुझी पूजा सोडून देतील. तुझ्या कृपाप्रसादाविषयीं त्यांच्यांत संशय निर्माण होईल. म्हणून हे प्रभो! आज तुझी साधीच पूजा करणार आहे मी...

...अजूनहि तुझ्या मंदिराचं दार बंद कां ? तें उघड ना! तुझ्या दरबारीं येण्यासाठीं तुझ्या द्वारीं मी तिष्ठत उभी आहे. कृपा कर. मंदिराचा दरवाजा उघड!

चंचल मना ? अजून तुझं लक्ष लौकिक व्यवहारांत आहे ? बाह्य वस्तूंचं अवडंबर माजवून त्यानें प्रभूच्या मनास भुरळ

पाडून त्याचें दर्शन घेऊं इच्छितोस? बाह्य वैभव आणण्यापेक्षां क्रोधादि विकल्पांचा त्याग करून सदगुणांचं वैभव घेऊन ये. त्यानंच तुला प्रभु भेटेल.

अंतरंग स्वच्छ केल्याशिवाय मी प्रभूचं दर्शन कसं घेऊं?

★ ★

# देवत्व ।

तुला वाटत असेल कीं मला वैभवाची धुंदी चढली आहे. संपत्तींतच मी गुंग आहे. तिचं प्रदर्शन करणं मला आवडतं असं तुला वाटत असेल; पण आतां माझी धुन्दी पार उतरली आहे. डामडौल कोसळून पडला आहे. पण मी आतां या साऱ्या वैभवाचा त्याग करतें. सारी आभूषणें फेकून देतें. सगळी संपत्ति दान देऊन टाकतें. हजारों गरिबांचें भलें होईल असं करतें. त्यांच्या कल्याणाकरितां झटतें. गरिबांच्या सेवेला सारं घरदार आणि वैभव अर्पण करतें. दीन, दुःखी लोकांच्या सेवेंत, आजाऱ्यांच्या शुश्रुषेंत मी सतत माझी काया झिजवीन. पतितांच्या उद्धारास्तव तनमनधनानें मी प्रयत्न करीन. यासाठीं मी अभिमान धरणार नाहीं. सेवेच्या या कार्यास्तव अहंकाराचा स्पर्श मी मला होऊं देणार नाहीं. परोपकाराचा टेंभा मी मिरवणार नाहीं. प्रसिद्धी मिरवणार नाहीं. माझं नांव, गांव न समजूं देतां प्रसिद्धि-पराङमुख होऊन अन्धारांत राहून मी सेवा करीन.

रे प्रभो ! प्रत्येक मानवांत, पशु-पक्ष्यांत आणि झाडां-झुडुपांतहि तुझा निवास आहे. कृमिकीटकांतहि तुझं अस्तित्व आहे. त्यांची सेवा म्हणजेच तुझी सेवा असं मी समजेन.

रंजल्या गांजल्यांची सेवा म्हणजे तुझी सेवा, असं तुझ्या रखवालदरानं मला कळविलं आहे. म्हणून साऱ्यांना समान लेखून, साऱ्यांत वसत असलेल्या परमेश्वरास स्मरून मी सेवेला

आरंभ केला आहे. रे प्रभो, माझ्या परिवर्तनाची कल्पना मी तुला दिली आहे. तेव्हां आतां तरी दार उघड . . . किती वेळ माझी परीक्षा पाहणार तूं ? प्रभो, तुझ्या मंदिराचा दरवाजा उघड ! असंख्य लोकांना तूं दर्शन देतोस; मग माझीच कां तूं परीक्षा पहात आहेस ?

मना ! सर्व मानवांत, पशुपक्ष्यांत देव आहे; एवढेंच नव्हे तर ते पवित्र जीव म्हणजेच देव. रंजल्या-गांजल्यांची म्हणजेच परमेश्वराची सेवा करण्याचं मी ठरविलं आहे. त्या दृष्टीनं सुरुवात झाली आहे. कार्यास प्रारंभ झाला आहे.

पण एवढ्यानं कसं भागेल ? देवत्वाची प्राप्ती कशी होईल ? कार्याची सुरुवात म्हणजे कांही शेवट नाहीं.

माझे शुद्ध विचार अखेरपर्यंत राहिले पाहिजेत. मना! तुझं कार्य शेवटपर्यंत टिकलं पाहिजे. त्याशिवाय तुला प्रभूचें दर्शन कसें होईल ?

★ ★

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ........................ वि: ....................
क्रमांक ........................ नोंद दि: ..............

# सेवा।

मी सेवा करावयास निघालें. हरिजन वस्तींत गेलें; मजुरांच्या चाळींत फिरलें; भंगी वस्तींत हिंडलें; आंधळ्या-पांगळ्यांकडे गेलें. इस्पितळांत जाऊन रोग्यांची विचारपूस केली.

ह्या सर्व दीन दुःखी जीवांकडे पहिल्यानंतर मला भडभडून येतें. त्यांच्या सेवेस माझी शक्ति अपुरी पडते. माझ्याजवळ ना अलोट पैसा, न कसलं बल ? काय म्हणून मी सेवा करूं ? कशी करूं ? कोटचवधि रुपये देखील अपुरे पडतील. हजारों माणसांची सेवा देखील अपुरी पडेल.

मनांत येतं, जगांत इतके दुःखी, अनाथ जीव कां निर्माण झाले ? कसे निर्माण झाले ? यांच्या दुःखास कारण तरी कोण ? ते स्वतः... ? समाज... ? राष्ट्र... ?... कोण आहे कारण ?

त्यांना पाहून माझं अंतःकरण द्रवतं ! माझे डोळे अश्रूंनीं भरून येतात. माझ्यांतली शक्ति नाहींशी होते. मन निराश होतें. हातपाय थंड पडतात. या दुःखी जगाचा कायमचा निरोप घ्यावा असंहि वाटूं लागतं.

तूं एकदां तुझ्या मंदिराचं दार उघड. डोळे भरून एकदां तुला पाहूं दे. तुझ्या दर्शनानें माझ्या निराश मनाला स्फूर्ति मिळूं दे; आनंद मिळूं दे. म्हणजे माझ्या अंगीकृत कार्यांत मला चालना मिळेल; जिवंतपणा येईल.

मना, तूं विश्वाची सेवा करीत आहेस. पण त्याकरितां तुझ्या मनांतील सर्व विकार काढून टाकावे लागतील. वीतरागी बनावं लागेल; ज्ञान संपादन करावं लागेल.

तुझी शक्ति अपुरी आहे. तुझी सहनशीलता अपुरी आहे.

हें कार्य मोठं आहे. आतांच तूं निराश झालास तर प्रभूचं दर्शन तुला कसं घडेल ?

* *

# मृत्यू !

अथांग सागरांत पाणीच पाणी दिसावं तसं जगांत सर्वत्र दुःखच भरलं आहे असं दिसतं. अंतराळांत सर्वत्र आकाशच दिसावं तसं जगांत दुःख भरून राहिलं आहे. दुःखी लोकांचं दुःख दूर करावं, त्यांचे अश्रु पुसावेत, त्यांचं सांत्वन करावं असं मला सतत वाटूं लागलं आहे.

आज मी तुझ्या दर्शनाकरितां घाईघाईनं निघालें. पण रस्त्यांत मला एक भेसूर दृश्य दिसलं. मी थबकलें. जवळ गेलें. अनेकजण ऊर बडवून बडवून रडत होते. दुःखानें बेहोष झाले होते. एक भरदार शरीरयष्टीचा, तारुण्यानें मुसमुसलेला मनुष्य जमिनीवर पडला होता. त्याच्याभोवती बसून अनेकजण शोक करीत होते. तो पुरुष गतप्राण झाला होता; त्याचं सारं कुटुम्ब दुःखी झालं होतं. त्याची तरुण पत्नी तर भयंकर दुःखी झाली होती. तिचा गोजिरवाणा बाळ जवळच झोपला होता. त्याच्या भवितव्यतेच्या प्रश्नानं तर ती अधिकच शोकाकुल झाली होती.

मी त्यांचं समाधान केलं. दुखभार हलका केला. संसाराच्या अशाश्वततेची जाणीव करून दिली. अधिक दुःख केल्यानें संसाराच्या वृक्षास विषारीं फळंच येतील हें समजावून सांगितलं. त्यांच्या दुःखांत समवेदना दर्शविली. त्यांचं दुख क्षणभर तरी दूर झालं असं मला वाटलं.

८..

प्रभो ! ही सेवेची हकीगत तुला सांगावी म्हणून तुझ्याप्रत निघालें! पण तुझा दरवाजा पूर्वींप्रमाणें बंदच ! माझ्या सेवेचं फल हेंच काय ? माझ्या परिश्रमाचं बक्षीस हेंच काय ? अजूनहि तूं माझ्यावर अप्रसन्न कां ?

सुख आणि दुःख यांचा निर्माता ज्याचा तोच आहे. प्रत्येक व्यक्ति निराळी. तिची प्रकृति निराळी. तिचीं सुखदुःखं निराळीं. ती कोणी निर्माण करूं शकत नाहीं. त्यांच्या दुःखांत नि सुखांत समभागी होण्याची भावना ही व्यावहारिक. आत्मिक शुचितेसाठीं केलेली सेवा हीच फलदायी होईल. कुणाच्याहि सुखांत – दुखांत तूं आपलं सुखदुःख समजतोस हाहि व्यवहारच! मना! तूं दीपासारखा हो. प्रकाश दे. मार्ग ज्याचा त्यानेंच शोधायचा असतो.

* *

## संतोष।

तूं सर्वत्र भरून आहेस ! मुलाच्या हास्यांतून तुझं दर्शन घडतं; मातेच्या प्रेमांतून तुझं अस्तित्व दिसतं; पित्याच्या वात्सल्यांतून तूं प्रकट होतोस. प्रेमळांच्या मायेंतून तूं आम्हांला दिसतोस, प्रत्येक प्राणीमात्राची सुकृति दर्शविते कीं त्या प्रत्येकांत देवत्व – ईशत्व आहे. पशु, पक्षी, वृक्ष, वेली, यांतहि देवत्वाचे अंश आहेत. त्याशिवाय का ते उपकारकर्ते बनले आहेत ?

प्रभो ! आज मी जंगलांत जाऊन तुझं दर्शन घ्यावं असं ठरविलं. मंगल प्रभातीं तुझ्या दर्शनास निघालें. नुकताच अरुणोदय झाला होता ! रात्रीं पडून गेलेल्या पावसानें वृक्ष, वेली टवटवीत दिसत होत्या. सोनेरी सूर्यप्रकाशांत त्यांचं प्रत्येक पान चमकून दिसत होतं. आसपासचे डोंगर सोन्यानें मढविल्याप्रमाणें भासत होते. सुखद वारा अंगाला स्पर्श करून जात होता. फुलांचा सुगंध सर्वत्र दरवळला होता त्यामुळें अत्यंत प्रसन्न चित्तानें वाट कापीत मी चाललें होतें. आजूबाजूचे वृक्ष नम्र सेवकाप्रमाणें माझे स्वागत करीत होते. त्या लहानशा जंगलांत एक सुंदर सरोवर होतं. नुकतींच कमळं फुललेलीं होतीं. सरोवराभोवती अनेक पक्षी विहरत होते. कांहीं सरोवरावर उडत होते. त्यावेळीं त्यांची आकाशांत दिसत असलेली माळ, मनाला भुरळ पाडीत होती.

मी तशीच पुढें चाललें. थोडं अंतर चालून गेल्यावर मला एक झोपडी दिसली. जवळ जाऊन पाहिलं. आंत एक जोडपं

जेवण करीत होतं. माझ्याकडं त्यांचं लक्ष गेलं! त्यांनीं हंसून माझं स्वागत केलं! आपल्या चटणी-भाकरीचा प्रसाद घेण्याची मला विनंती केली! त्यांची ती झोपडी कित्येक ठिकाणीं भग्न झाली होती. त्यांच्या फाटक्या कापडयांमधून अनेक ठिकाणीं त्यांचं उघडं अंग बाहेर पडूं पाहत होतं. मी विचार केला, 'हे लोक किती दुःखी असतील? ना यांना गगनचुंबी घर, ना त्यांना नानाविध इच्छा पूर्ण करणाऱ्या वस्तू!' पण त्यांच्या आनंदी चेहऱ्यावरून नि सुखद जीवनावरून ते दुःखी असतील असं वाटणं चूक ठरलं असतं. ते दोघे मजेंत होते. झोपडी अनेक ठिकाणीं फाटली होती म्हणून त्याची खंत त्यांना वाटली नाहीं; किंवा साधी चटणी भाकरीच खावी लागते म्हणून त्याचा खेदहि त्यांना वाटला नाहीं. त्यांची सेवा करण्याची इच्छा झाली. पण काय करूं त्यांची सेवा? दुःख नांवाची चीजच त्यांच्या बोलण्यावरून दिसून येत नव्हती. त्यामुळें मी निराश झालें. तेव्हां उभयतांनीं मला विचारलं, 'माताजी! आपणांस कसलं दुःख आहे?' आपण एकाकी या जंगलांत कशा? आम्ही आपली काय सेवा करावी?"

कांहींहि परिग्रह नसूनहि त्यांचं सुख कोणी हिरावून घेतलं का? त्यांचा संतोष कुणी काढून घेतला आहे का? मना! संतोष बाळगणें, समाधानी असणं हाच तर तुझा धर्म आहे. अनेक गोष्टी तुझ्याजवळ असूनहि तूं दुःखी आहेस; तूं विव्हळतोस.

अशांत, अस्थिर आणि अस्वस्थ मनानें मला का प्रभु भेटेल?

★ ★

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलक्रम
अनुक्रम ................ विः ......
क्र. ...... नों. दि.


# उलगडा !

तुझ्या दर्शनाभावीं निराश होऊन मी दूर दूर चाललें. मला माझ्या राहत्या गांवाचा वीट आला. मी स्टेशनवर गेलें. थोडचा वेळानें गाडी आली. मी त्यांत बसलें नि माझा प्रवास सुरू झाला. वेगानें जाणाऱ्या गाडीबरोबर माझें विचारचक्रहि आपोआप फिरूं लागलें. इतक्यांत मंजुळ आवाजाची लकेर आली. माझं विचारचक्र थांबलं. डोळे वर करून मी पाहूं लागलें. एक भिकाऱ्याचं पोर गाणं म्हणून भीक मागत सुटलं होतं; गाणं म्हणतां म्हणतां ईश्वराला डोळे भरून पाहिल्याचं समाधान मानीत होतं. तो मुलगा आंधळा होता. त्याच्या गाण्यावर लुब्ध होऊन लोकांनीं पैसा पैसा दिला. मुलाच्या वाटींत पांच मिनिटांत रुपया झाला. माझं कुतूहल जागं झालं. मीं त्याला विचारलं

"आंधळ्या तूं सुखी आहेस का ?"

"माई ! मला कसलं दुःख आहे. आंधळा असलों तरी माझ्या भजनांत नि कवनांत मला देव दिसतो. त्याला डोळे भरून पाहतांच माझ्या अंतःकरणाला किती समाधान वाटतें ! अन् पोटाची खळगी माझ्या भक्त प्रवाशांनीं दिलेल्या पैशापैशावर भरते. यापेक्षां मला जास्त काय हवं आहे ?"

मी आश्चर्यानें थक्क झालें. आंधळ्याच्या दुःखाचं कोडं उलगडून त्याला सुखी करण्याच्या हेतूनं त्याला मी प्रश्न केला. पण आपल्या सुखी जीवनान त्यानंच माझ्या दुःखाचं कोडं उलगडलं. माझ्या अंतर्मनाची खळबळ थांबविली.

* *

# कर्म ।

तुझ्या दर्शनाकरितां निघालें. झपझप पावलं पडत होतीं. अनेक शेतं पायाखालीं घालून मी पुढें पुढें जात होतें. रस्त्यांत एक शेतकरी एका शेतांत नांगरत असतांना दिसला. सूर्योदया-पूर्वींहि त्याचं काम चाललेलं पाहून मला त्याची करुणा आली.

मीं विचारलं, "रे कृषीवला ! तूं किती कष्टांत आहेस ? किती दुःखी आहेस तूं ? तुला कांही मदत हवी का ?" तो म्हणाला, "बाईसाहेब ! यांत दुःख कसलं ? माझ्या शेतांतल्या कष्टांत माझं सुख दडलेलं आहे. रात्रीच्या पोटांत उषेनं निवास करावा तशी माझ्या या श्रमांत माझीं नि माझ्या मुलांबाळांचीं सुखं दडलेलीं आहेत. शेत नांगरणं, त्यांतून धान्य काढणं आणि तें जगास – परमेश्वरास अर्पण करणं हें माझं स्वाभाविक कार्य आहे, तो माझा धर्म आहे. तें स्वभाव-नियत कर्म आहे. निष्काम भावनेनं नि अनासक्तीनं तें करणं हें माझं कर्तव्य आहे. जगांत कर्तव्य-पूर्तीच्या आनंदापेक्षां श्रेष्ठ असा आनंद नाहीं मी दुःखी नाहीं; पूर्ण सुखी आहे मी. पण बाई ! एवढ्या पहाटें आपण कुठें निघालांत ?"

कृषीवलाच्या उत्तरानें मी आश्चर्यचकित झालें; दिङ्मूढ झालें. त्याचं म्हणणं माझ्यापुढं सतत नाचूं लागलं. त्याचे बोल पुनः पुनः आठवूं लागले. 'स्वभावनियत कर्म करा; तें निष्कामपणें करा; आसक्ति ठेवूं नका' हाच त्याच्या म्हणण्याचा अर्थ !

मना ! तुमच्या वाटचाला आलेलं कार्य – मग तें लहान असो कीं मोठें असो; श्रेष्ठ असो किंवा कनिष्ठ असो करीत चला. त्यांत रस घ्या. अशा कामांत परमेश्वर तुमच्या सहाय्याला आल्याशिवाय राहाणार नाहीं. त्यांतच तुम्हांला प्रभूचें दर्शन घडेल. कृषीवलाचे ते शब्द ऐकून मी थक्क झालें.

दुसऱ्याला सुखी करण्याचा नाद सोड ! स्वतःच दुःखी असणारा दुसऱ्याला काय सुखी करणार ? तूं अज्ञानी असतांना दुसऱ्याला ज्ञानाचा प्रकाश काय दाखविणार ? तूं स्वतः दुर्बळ असतांना इतरांस काय साहाय्य करणार ? तेव्हां तूं स्वतः परिपूर्ण होण्याचा प्रयत्न कर ! दुसऱ्याच्या चिंतेंत व्यर्थ वेळ घालवूं नकोस !

★ ★

# प्रभु-दर्शन !

तुझ्या दर्शनार्थ येत असतां आज रस्त्यांत मला एक भंगीण भेटली. तिची दयनीय अवस्था पाहून मला करुणा आली. पण तिच्या सुरकुतलेल्या चेहऱ्यावर मला दुःखाचा लवलेशहि सापडला नाहीं. उलट ती समाधानी दिसली. मी तिला म्हटलं,

"बाई ! हा धंदा सोड. किती त्रास होत असेल तुला !"

"बाईसाहेब !" ती म्हणाली, "वर्षानुवर्षं चाललेला माझा पिढीजात धंदा आहे हा ! हा करतां करतां माझाहि जन्म संपत आला. आयुष्यांत हें कार्य करीत असतां दुःखानं मला कधींच स्पर्श केला नाहीं. लोकांची घाण उपसणं नि त्यांचीं जीवनं शुद्ध करणं हें काम थोडंच वाईट आहे ? जणुं प्रभूनेंच माझ्याकडं हें कार्य सोपविलं आहे. लोकांची ही सेवा करतां करतांच माझं हें थकलेलं शरीर गळून पडलं तर त्यांत मला आनंदच आहे. हें कार्य मीं सोडून दिलं तर प्रभु माझ्यावर नाराज होतील; त्यांची भक्ति कमी होईल. बाईसाहेब ! तुम्ही कुठं निघालांत ?"

"प्रभूच्या दर्शनास."

माझ्या उत्तरानं ती गोंधळांत पडली. आपल्या कार्या-शिवाय इतरत्र प्रभु आहे या कल्पनेनं ती गोंधळली. ती म्हणाली, "बाईसाहेब ! तुमच्या कार्यांत तुम्हांस अजून प्रभु दिसला नाहीं? मग तुमचं कार्य निरलसपणें चालत नसेल, कांहीं तरी दोष असेल त्यांत ! कर्तव्याची जाणीव ठेवून केलेल्या निरलस कार्यांत प्रभु भेटतो. त्यासाठीं निराळी धडपड किंवा वेगळा वेळ नको."

* *

# सुश्रुषा !

आज तुझ्या दर्शनास निघालें असतां रस्त्यांत एक रुग्णालय दिसलें. मी आंत गेलें. तेथें एका खोलींत कॉटवर एक रोगी झोपला होता. त्याच्या हातांत वर्तमानपत्र होतं. तें वाचण्यांत तो गुंतला होता. मी त्याच्याजवळ गेलें. त्यानें प्रश्नार्थक मुद्रेनं माझ्याकडं पाहिलं. मी म्हटलं.

'तुम्हा रोग्यांची सेवा करण्याकरितां मी आलें. तुमचं दुःख थोडं बहुत दूर करण्याकरितां मी आलें आहे. डॉक्टर तुमची सेवा करतात हें पाहून मला आनंद झाला. त्यांची थोर सेवा पाहून मला आनंद झाला. मीहि आलें.' तो रोगी खिन्नपणें हंसला; नंतर उदासपणें म्हणाला,

"बाई ! कशाला आलां तुम्ही येथें ! हा सर्व देखावा आहे ! जगांत पैसा बोलतो आहे. जगांत सर्वांत अधिक किंमत आहे पैशाला. तो आहे म्हणून तर या दायी नि हे डॉक्टर मला हातावरल्या फोडाइतके जपतात. बाई ! पैशानें या भौतिक जगांत वाटेल तीं कामं होतात. यांच्या अंतःकरणांत खरी दया असती न् यांच्यांतला परमेश्वर मला भेटला असता तर मी केव्हांच बरा होऊन घरीं गेलों असतों बाई ! सेवेच्या नांवाखाली कोणाची सेवा करूं नका ! आपली सेवा अज्ञात असावी ! खरी सेवा अनमोल असते. खऱ्या दयेनं प्रेरित होऊन तन, मन धनानं केलेलं कार्य म्हणजे सेवाच होय. कीर्तीच्या अपेक्षेनं नांव व लौकिकाची हाव धरून केलेलं कार्य सेवा नसून दंभ होय. ★ ★

# सौख्य।

आज तुझ्या दर्शनार्थ निघालें असतां एक महिला पाण्याची भली मोठी घागर घेऊन ओझ्याच्या भारानं वाकल्यासारखी चालली होती. मला तिची दया आली मी विचारलें,

"हे दुःखी भगिनी! एवढ्या प्रातःकालीं पाण्यानें भरलेली ही मोठी घागर घेऊन कुठं चाललीस?"

"बाई! मी दुःखी आहे हें कसं कळलं तुम्हांला? ही घागर घेऊन मी घरीं चाललें आहे. स्वयंपाक करणं, भांडीं धुणं, कपडे धुणं, मुलांना व पतीला जेऊं घालणं इत्यादि बरींच कामं पडून राहिलीं आहेत. म्हणून मी पाणी घेऊन चाललें आहे."

मी म्हटलं, "बाई! सकाळपासून संध्याकाळपर्यंत हीं कामं चालणार तुमचीं. मग तर तुम्ही फारच थकून जात असाल! फारच दुःखी असाल! सुखाचा क्षण कसा तें तुम्हांला ठाऊकहि नसेल बाई! मी तुम्हांस कांहीं मदत करूं?"

माझ्या बोलण्यानं ती हंसूं लागली. ती म्हणाली,

"बाई! मी आर्य स्त्री आहे. मला दुःखाचे क्षण कसे याची कल्पना नाही. माझ्या कार्यांत मला सतत आनंदच मिळतो. माझे पति किती प्रेमळ आहेत! त्यांच्या सेवेंत असतांना मी स्वतःला धन्य समजतें. किती सुख मिळतं त्यांत मला! दुःखाचा लवलेशहि नसतो त्यांत. तशींच तीं माझीं गोजिरवाणीं मुलं. जणूं देवांचाच अवतार! त्यांच्या हास्यांत मला देव

दिसतो ! त्यांना सांभाळतांना, जेवू घालतांना, स्तनपान देतांना स्वर्गीय आनंद मिळतो मला. हीं मुलं म्हणजे देवाघरचीं फुलं. त्यांचं जतन करणं म्हणजे प्रभूचीच सेवा करणं ! हीं मुलं म्हणजे राष्ट्राचा आधार ! त्यांना सुखी करण्यांत किती आनंद भरलेला असतो ! त्यांतच मला समाधान वाटतं ! बाई ! मी दुःखी नसून पूर्ण सुखी आहे."

मला निरुत्तर करून तिनें पुढें विचारले, " बाई ! भल्या पहाटें आपण कुठें निघालांत ?"

" प्रभूच्या दर्शनास जात आहे." मी उत्तर दिलं. माझं हें उत्तर तिला विचित्रच वाटलं. ती हंसत हंसत म्हणाली,

" बाईसाहेब ! कशाला जातां इतक्या दूरवर ? पायपीट करून काय देव लाभतो ? त्यानें कांहींच प्राप्ती होणार नाहीं. तुमच्या ताब्यांत मोठी संस्था आहे. कित्येक मुली आहेत त्यांत. त्यांचा नीट सांभाळ करा. त्या बाल-बालिकांचें जतन करा. त्यांच्या जीवन-कळ्या फुलवा. त्यांच्या अंतरंगांत शिरून त्यांचे आत्मे थोर बनवा. त्यानेंच तुम्हांला आनंदाची प्राप्ती होईल.

त्यांच्या अंतःकरणांत प्रभु दडलेला आहे; असं असतांना तुम्ही दुसरीकडे कां चालतात ? आपण परमेश्वराचेंच कार्य करीत आहांत. परमेश्वर तुमच्या संस्थेंतच आहे, त्याचा शोध अन्यत्र कुठं करणार ? तो दुसरीकडे तुम्हांस कसा दिसेल ?"

असं म्हणून ती बाई निघून गेली.

मी खिन्न झालें. प्रभूच्या शोधाचा मार्ग चुकीचा आहे हें मला कळून आलें.

★ ★

# उपासना ।

सूर्योदय झाला होता. अनंत कोवळीं किरणें सर्वत्र विखुरलीं होतीं. सूर्य-किरणांच्या सोनेरी जाळ्यांत जग अडकलं होतं. मी पायींच चाललें होतें. रस्ता माणसांनीं फुलून गेला होता. त्यांत पुरुष होते, स्त्रिया होत्या, म्हातारे होते नि तरुणहि होते मी सहज त्यांची चौकशी केली. ते सारे गिरणी मजूर होते. एवढ्या सकाळीं केवळ पोटाच्या विवंचनेकरतां जाणाऱ्या या मजुरांची मला करुणा आली. त्यांच्याविषयीं दयाबुद्धि निर्माण होऊन त्यांच्यापैकीं एकास मी सहज विचारलं, "कसं काय आहे तुमचं ?" माझा हा अनोळखी प्रश्न ऐकून तो म्हणाला, "बाई ! आपण कोण ? कुठं चाललांत ?"

"मी प्रभूच्या दर्शनास चाललें. ठीक आहे ना ? तुम्ही कुठें चाललांत ?" मीं पुनः विचारलें.

माझ्या या प्रश्नानें तो हसला. सकाळच्या सूर्याचं ऊन तोंडावर होतं रात्रीची गाढ निद्रा नि सकाळची न्याहारी यांनी त्यांचा चेहरा उजळला होता. संध्याकाळीं घराची ओढ; दिवस-भरचा थकवा नि रोजच्या विवंचना यामुळें त्याचा चेहरा टवटवीत दिसणार नाहीं, दुपारच्या प्रखर उन्हानें कोमेजून जाणाऱ्या फुलां-प्रमाणें तो म्लानहि दिसेल. पण आतांच्या उत्साही वातावरणांत तो सुखी होता. तो म्हणाला,

"बाई ! आमचा तो प्रभू दिसला का तुम्हांला ? पाहिला का त्याचा चेहरा, आक्राळविक्राळ देह ? हत्तीच्या सोंडे-

प्रमाणें तो आपलं लांबट तोंड वर करून आकाशांत धूर सोडीत आहे. मधून मधून मोठा आवाज करून तो आम्हांस बोलावीत आहे. तोच आमचा देव! त्याचीच आम्ही दिवसभर सेवा करतों. श्रम व मेहनत करतों. आमच्या वाटयाचं हेंच काम आम्ही करावं अशी प्रभूची इच्छा आहे. आमचे हात नि आमचे पाय राबण्याकरितां आहेत. हें काम केलं नाहीं तर आम्हांला जगण्याचा अधिकार नाहीं! नव्हें आम्हांला जगतांच येत नाहीं. आमच्या श्रमाच्या मोबदल्यांत आम्ही सारे मजूर घरखर्च भागवून स्वतःच विणलेला कपडा परिधान करतों. मला कसलं कर्ज नाहीं. रात्रीं जेवण झाल्यावर प्रभूचं नांव घेतो न घेतो तोंच गाढ झोप लागते मला. बाई! मी सुखी आहे."

या मजुरांची सेवा करावी, त्याच्या कुटुंबियांना हातभार लावावा असं माझ्या मनांत होतं! पण...... मना! श्रम करीत रहा! पवित्र भावनेनं कार्य करीत रहा! परमेश्वर तुझ्याजवळ आहे. आईबापांची सेवा करण्यांत दंग असणाऱ्या भक्तांनी परमेश्वर सेवेसहि गौण स्थान दिलं आहे. कर्तव्य-कर्म करणाऱ्यांना पुन्हां वेगळी अशी ईशसेवा करावी लागत नाहीं.

मी मजुराशी बोलत उभी असतांच मोटारींतून एक व्यक्ति खालीं उतरली. मला तिनं जेव्हां नमस्कार केला तेव्हां माझ्या ध्यानांत आलं कीं ती व्यक्ति म्हणजे गिरणीमालक होय. त्याच्या मोटारीकडे माझें लक्ष गेलें! चांदीच्या ताटांत अनेकविध फळं होतीं. अनेक सुगंधित द्रव्यं आपला सुवास पसरवीत होतीं मोठमोठे हार नि गुच्छ आपला सुगंध दरवळीत होते. हें पाहून.

त्या गिरणीमालकास प्रश्नार्थक मुद्रेनं मीं विचारलं. " हें सर्व कशासाठीं ?"

" बाई ! तुम्ही खऱ्या भगवंतोपासक आहांत ! तुम्ही भगवंताजवळ जाण्यापेक्षां तुमच्या कार्यानं संतुष्ट होऊन भगवंतच तुमच्याजवळ येत असतो ! पण आमची गोष्ट निराळी आहे ! आमच्या पापकृत्यांनीं भगवंतास आम्ही दुरावलों आहोंत. त्याला जवळ करायचं म्हणजे नकोत का हीं आवश्यक द्रव्यं ? या द्रव्यांनीं आम्ही त्याची पूजा करणार आहोंत. माझ्यावर आज कचेरींत केस चालू आहे. मी लाखों रुपये मिळविले, भावाचं लग्न मोठ्या थाटानं केलं, नवीन चार बंगले बांधले यावर सरकारची ' वाईट ' नजर गेली. हा न्यायाचा पैसा नाहीं असं सरकारचं म्हणणं आहे. माझी पत्नी घरांत क्षयानें आजारी आहे. या साऱ्या विवंचनेनं माझी झोप उडाली आहे. या त्रासांतून प्रभूनं आमची कायमची सुटका करावी म्हणून त्याची आम्ही आज मोठी पूजा करणार आहोंत."

मना, मालक आणि नोकर या परस्परविरुद्ध जगाचं दर्शन घडलं ना ? भगवंत भक्तीचा नि निरासक्त कर्माचा भुकेला असतांना त्याला भुलविण्याचे हे नानाविध प्रयत्न पाहिलेस ना ?

तुला मिळालेल्या अनुभवाचं चिंतन कर. मनन कर. त्यांतून वैराग्यांचं महान् विकसनशील जीवन निर्माण होऊं दे ! चितेंतून पवित्रतेची साक्ष पटवीत बाहेर येणाऱ्या सीतेप्रमाणं तुझ्या वैराग्यांतून उन्नत जीवन बाहेर पडूं दे !

★ ★

# चिकित्सा !

पहाट झाली होती ! शांतता वातावरणांत भरून राहिली होती ! आश्रमांत पवित्रता व्यापून उरली होती. घंटेच्या खण-खणाटानें शांतता भंगली नि दर्शनार्थ मुलींची रांग लागली ! मुलींच्या खोल्या धुंडाळीत धुंडाळीत मीहि तुझ्या दर्शनार्थ निघालें. सर्व मुली तुझ्या मंदिरांत गेल्या हें पाहून समाधानानें मीहि तुझ्याकडे निघणार, इतक्यांत एका खोलींत मला दोन मुली झोंपलेल्या आढळल्या! माझा राग अनावर झाला! अशा प्रशांत वेळीं तुझ्या मंदिरांत न येतां झोपेत रहाणें, हा तुझा अपमान समजतें मी ! मी त्यांना रागावलें; खूप खूप टाकून बोललें ! "पहाटेच्या वेळीं सर्व विद्यार्थिनींनीं उठलं पाहिजे; त्यांनीं सत्वर प्रभूचं दर्शन घ्यावं; आळस सोडून द्यावा नि मन लावून अभ्यास करावा." असं माझं पुराण चालूं झालं ! पण . . .

भुकेलेल्याचं पोट गोड गोड शब्दानं भरणार काय ? तहानलेल्याची तहान काव्य गायन ऐकून शमणार आहे काय ? जागरणानं ज्याचे डोळे प्रयत्न करूनहि झांकलेच जात आहेत, अशांना लवकर उठण्याचें पुराण सांगून कांही उपयोग आहे काय ? माझा अनिवार राग पाहून एक मुलगी म्हणाली,

"बाई ! आमच्यावर रागावूं नका ! आज परीक्षा अस-ल्यानें रात्रभर जागरण करून मी अभ्यास केला आहे. अभ्यास करतां करतांच मला झोप लागली. घंटा न ऐकूं आल्यानं अधिक

वेळ झोपण्याचा प्रमाद मजकडून घडला आहे. मला क्षमा कराल तुम्ही ? तुमच्या मुलींचा एवढा अपराध पोटांत घालाल?

दुसरी मुलगी म्हणाली,

"काल संध्याकाळीं जेवतांना थोडंसं कच्चं मजकडून खाल्लं गेलं, रात्रभर पोट दुखत होतं. आतां कोठें डुलकी लागते न लागते तोंच उठण्याची घंटा झाली. पोटांतल्या त्रासामुळें मी उठूं शकलें नाहीं."

त्यांचीं हीं उत्तरं ऐकून माझं मलाच वाईट वाटलं. न कळत माझे डोळे ओलावले नि माझ्या अन्तःकरणाला मायेचा पाझर फुटला. मी त्यांची शांततेनें चौकशी केली असती तर, मुलींना वाईट वाटलं नसतं ! त्यांच्या अंतःकरणाला जखम झाली नसती; पण अजाणपणें बोललेल्या कठीण शब्दांमुळें त्यांना केवढी जखम झाली असेल !

* *

# क्षमा ।

आज मंगल प्रभातीं उठलें. तुझ्या दरबारीं येण्यास निघालें इतक्यांत माझ्यापुढें दोन मुली दत्त म्हणून उभ्या राहिल्या. अधोवदन करीत दुःख प्रदर्शित करणाऱ्या त्या मुलींना पाहून प्रथम मला आश्चर्य वाटलं. त्यांचीं कोवळीं तोंडं पहाटेंच सुकलीं होतीं ! त्यांच्या डोक्यावरील अस्ताव्यस्त केस पहाटेच्या मंद वाऱ्यानें भुरभुरत होते. मीं प्रश्नार्थक मुद्रेनें त्यांना विचारतांच त्या म्हणाल्या,

"भून, आपण प्रभूच्या दरबारीं निघालांत. पण त्याआधीं तुमच्या या अपराधी मुलींना क्षमा करा."

क्रोधाची एक सनक माझ्या अंगांतून गेली. विजेचा झटका बसावा त्याप्रमाणें प्रथमदर्शनीं झटका बसला ! मंगल प्रभातींहि अपराध करणाऱ्या मुलींचा मला खूप राग आला. संतप्त अवस्थेंतच मीं विचारलं,

"चुका मुद्दाम करतां आणि वर हें क्षमा मागण्याचें सोंग करतां ? हें नाटक आतां पुरें करा ! रोज पहावं तर एक नवीनच सोंग ! आश्रमाच्या रंगभूमीवर मुद्दाम अपराध करून क्षमा मागणारांचीं अनेक सोंगं मीं पाहिलीं आहेत. आणि मी तुम्हांला काय क्षमा करूं ?"

मी अचानक धारण केलेल्या रौद्र स्वरूपामुळें त्या मुली घाबरून गेल्या. माझ्या पायावर आपलीं शरीरं लोटून देऊन अश्रुमोचन करीत त्या म्हणाल्या,

"भून, आम्ही तुमचीं बालकं! तुम्हीच रागावल्यानंतर आम्ही कोणाकडे पाहावं? तुमच्या प्रेम सरोवरावर तरंगणाऱ्या आम्ही हंस पक्षिणी! तें प्रेम-जलच तुम्हीं काढून घेतलं तर आमचं भवितव्य तुम्हांला काय निराळं सांगायला हवं?"

मुलींच्या अपराधानं मी जशी क्रुद्ध होतें तशीच त्यांच्या दीन भाषणान लगेच शांतहि होतें. क्रोधाच्या झोतानं हेलकावे खाणारं माझं संवेदनशील अंतःकरण कालावधीनं शांतहि होतं. मी शांत झाल्याचं पाहून मुली म्हणाल्या,

"भून! आम्ही तुम्हांला सकाळींच त्रास दिला! आजच्या दिवसाची सुरुवात तुम्हांस अशा रीतीनें करावी लागली, याबद्दल आम्ही तुमची क्षमा मागतों. पुन्हा आमच्या हातून अशी चूक होणार नाहीं. अनंत अपराध पोटांत घालणाऱ्या परमेश्वराप्रमाणें आपण आम्हांस क्षमा कराल ना?"

माझं मन द्रवलं! क्षणापूर्वींच निर्माण झालेल्या क्रोधाचा पर्वत मुलींच्या क्षमायाचनेच्या शस्त्रानं दुभंगून त्याच्या ठिकऱ्या ठिकऱ्या झाल्या! प्रभो! माझ्या क्रोधाची भरती-ओहोटी ही अशी रोज चालते! तूं मला याबद्दल क्षमा करशील ना?

अस्थिर विचारांच्या लाटांच्या प्रवाहांत तूं सतत वहात आहेस. तुला स्थिरता नाहीं. अनेक रूपांनीं तो तुझ्याप्रत येऊन तुझी परीक्षा पाहत आहे, अन् तूं सागरपृष्ठावर वहात जाणाऱ्या लाकडाच्या तुकड्याप्रमाणें भावनेच्या प्रवाहांत हेलकावे खात इकडे तिकडे वहात आहेस! हे मना, लहान लहान बाल-बालिकांत आविष्कृत झालेल्या प्रभूला जाण!

★ ★

# मानवता !

मी पहाटें उठलें. तुझ्या दर्शनार्थ निघणार इतक्यांत माझ्यापुढें पांच-सहा मुली हजर झाल्या. तें मुलीचें शिष्टमंडळ होतें. कालच्या घटनेमुळं उत्स्फूर्त विचारांमुळेंच ह्या मुली आज आल्या होत्या. अन्यायाची दाद हवी होती त्यांना ! त्यांनीं म्हटलं,

" भून ! आपल्या स्वयंपाकीण बाईला सोडूं नका ! दूध देऊन आटलेल्या गाईची कत्तलखान्यांत रवानगी करावी, तशी तिची भेसूर जगतांत रवानगी करूं नका ! आपल्या सुंदराबाई पिकलं पान आहे ! आज आहे उद्यां नाहीं ! आजार, संकटं इ. कालवाताच्या झुळुकीबरोबरहि तें खालीं गळून पडेल. त्या थकल्या आहेत, अंगांत त्राण नाही. अशा अवस्थेंत त्या कुठें जाणार ? आपण सर्वांचा सांभाळ करतां तसाच तिचाहि करा. अंगांत शक्ति असेपर्यंत तिनं आपणांस स्वयंपाक करून घातला आहे. अलीकडे कांहीं वर्षे तिचा आपण सांभाळहि केला आहे. तेव्हां आतांच असा निर्णय कां घेतला ? "

मुलींच्या भाषणानं मला राग आला. मी उफाळून म्हणालें,

" लहान तोंडीं मोठा घास घेऊन तुम्हांला बोलायला कांहीं वाटतं काय ? हलवायाच्या घरावर तुळशीपत्र ठेवण्याचा हा प्रकार आहे. माझा निर्णय तुम्ही फिरवूं इच्छितां ! पण आजपर्यंत वृद्ध सुंदराबाईची सेवा करण्याचे कोणा मुलीच्या मनांत विचार आले होते ? आजच तिच्याविषयीं स्नेहाचा झरा तुमच्या ठिकाणीं पाझरूं लागला आहे."

माझ्या या अनपेक्षित उत्तरानें मुली सर्द झाल्या. पण त्या विचारी होत्या. आपला बेत तडीस जाणार नाहीं या जाणिवेनें त्या दुःखी झाल्या ! पण एक धीट मुलगी पुढें येऊन म्हणाली,

" भून ! तुम्ही तुमचा निर्णय मागे घ्याल तर आम्ही वृद्ध सुंदराबाईची सेवा करूं ! ! तिच्या वृद्धापकाळीं आम्ही तिला आधार होऊं. अनाथांची सेवा करण्यांत आम्हांला आनंद वाटेल."

त्या मुलींचे हे आंतरिक भाव ऐकून मी सद्‌गदित झालें पण त्यांची पुन्हां परीक्षा पाहण्याच्या हेतूनें मी एका मुलीस म्हटलें,

" काय ग ! तुला हें मान्य आहे?"

ती अत्यंत नम्रपणें म्हणाली, मला दुर्दैवानें आजी नाहीं; आजीच्या प्रेमाला मी पारखी झालें आहे. हिला मी माझी आजी समजून तिची सेवा करीन."

मुलींच्या या उत्स्फूर्त सेवा-भावनेचं कौतुक करण्यासाठीं मी म्हटलं,

" मुलींनो ! तुम्ही खरोखर थोर आहांत ! एवढे उन्नत विचार ज्या मुलींच्या ठिकाणीं आहेत त्यांच्या उदरीं भाग्यवान् पुरुषांचाच जन्म होणार ! तुमचा हा विचार खरोखर फार मोठा आहे ! तुम्ही असाच उच्च विचार मनांत बाळगा नि तुमचा, कुटुंबाचा, समाजाचा आणि देशाचा उद्धार करा. मी माझा निर्णय मागे घेत आहे."

माझ्या या विचारानें त्या सर्वजणी हर्षित झाल्या ! त्यांचा आनंद हृदयांत न मावतां त्यांच्या चर्येवरून ओसंडून वाहूं लागला. अत्यंत समाधानानें त्या आल्या तशा निघून गेल्या.

माझं मन मात्र विचारांच्या फेऱ्यांत चकरा खाऊं लागलं. लहान मुलींच्या ठिकाणीं एवढे उच्च विचार वास करीत आहेत, हें पाहून माझं मन आनंदानं मोहरून गेलं. माझ्या सुखद नि दुःखद प्रसंगाच्या स्मृतिमंजुषेंत ही स्मृति विशेषत्वानं चमकून उठते. माझ्या जीवनसरितेला कलाटणी देणाऱ्या अनेक प्रसंगांपैकीं हा एक विशेष प्रसंग आहे.

त्यानंतर आणखी कांहीं दिवसांनीं घडलेली गोष्ट ! वृद्ध सुंदराबाईनीं आंथरूण धरलं. सर्व मुलींनीं तिची मातेप्रमाणें रात्रंदिवस सेवा केली. आजार बळावतच चालला ! मृत्यूच्या दाढेंतून तिला परत आणण्यासाठीं मुलींनीं प्रयत्नांची पराकाष्ठा केली ! पण व्यर्थ ! एके दिवशीं मृत्यूच्या वादळाच्या थयथयाटांत म्हातारीची प्राणज्योत कायमची मालवली ! शेवटपर्यंत ॐकार मंत्राचं जाप्य देत आणि संल्लेखनेचा अंगीकार करीत म्हातारीनें प्राण सोडला. म्हातारीचं सोनं झालं. मुलींच्या प्रयत्नास योग्य फळ मिळालं. धर्माचं उच्चारण करीत मरण येणं हें भाग्यशाली समजलं जातं. असं भाग्यशाली मरण म्हातारीस आलं. मुलींना याहून दुसरं बक्षीस कोणतं हवं होतं ?

मुलींची ही सेवा सदैव ध्यानांत ठेव ! हेंच तुझं धन! तें तूं त्यांची सेवा करतांना खर्चीं कर ! तुला आढळून येईल कीं, तें धन खर्चीं न पडतां त्यांत दिवसेंदिवस वृद्धीच होईल ! मनाची शांति वाढतच जाईल.

★ ★

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ४२०३२ वि: निबंध
क्रमांक ९६५८...... नों: दि: २३।११।६६

# वात्सल्य !

सकाळ झाली होती ! आश्रमांतील कोपरान् कोपरा प्रकाशानें उजळून निघाला होता. प्रत्येकजण उद्योगांत दंग होता मोहि स्नानादिक क्रिया आटोपून तुझ्या दर्शनास निघालें; पण फाटकांतून आश्रमांत येत असलेला टांगा पाहून मी थबकलें. माझी दृष्टि टांग्याकडे गेली ! सुव्यवस्थित पोषाख केलेली सुस्थितींतली एक प्रौढ व्यक्ति दिसली मला. मागच्या बाजूला चार सुंदर मुली दिसल्या ! मला कुतूहल वाटलं. टांगा जवळ येऊन थांबला. हातांतील तबक जवळ ठेऊन मी त्यांना नमस्कार केला. माझ्या नमस्काराची सस्मित वदनानें प्रतिफेड करीत त्यांनीं म्हटलं,

" आपणच भून कां ?"

मो होकार दिला आणि ' कोठून आगमन झाल ' म्हणून प्रश्न केला.

इतक्यांत चारहि मुली खालीं उतरल्या. त्यांच्या गोड किलकिलाटानें माझ्या आनदाला भरती आली ! नवीन जागेंत आल्याचं कुतूहलहि त्यांना वाटू लागलं होतं. त्यांच्याकडे अंगुली-निर्देश करीत ते गृहस्थ म्हणाले,

" या चार शिष्या आपल्या स्वाधीन करण्याकरितां मीं आलों आहे. त्यांचा सांभाळ करून त्यांना सुशिक्षित नि सुसंस्कृत करा. "

चौदा वर्षांच्या आंतील होत्या त्या चार मुली! श्रीमंत नि सुशिक्षित दिसलं त्यांचं घराणं! असं असून त्यांना आश्रमांत आणल्याचें आश्चर्य प्रदर्शित करीत मी विचारलं,

"यांना तुम्ही घरींच शिक्षण कां देत नाहीं? एवढया लहान वयांत त्या येथें राहतील का?"

"भून! माळयाशिवाय फुलझाडांची देखरेख झाली आहे काय? हें शिक्षणाचं पवित्र कार्य तुम्हींच करावं. त्या शिवाय मुली सुशिक्षित नि सुसंकृत बनणार नाहींत. येथल्या पवित्र वातावरणास भुलून मी आलों आहे."

मीं त्यांचं स्वागत केलं. मुलींचं वसतिगृह दाखविलं. त्यानंतर मुलींचे पालक दोन दिवस आश्रमांत राहिले. तेवढया अवधींत त्यांनीं संस्थेचं सूक्ष्म निरीक्षण केलं. संस्थेचे नियम समजावून घेतले. अत्यंत संतुष्ट मनानें ते जेव्हां घरीं निघाले तेव्हां म्हणाले,

"या मुलींच्या माता तुम्हीच! त्यांना शिक्षण देणं, त्यांचा सांभाळ करणं, धार्मिकतेकडं प्रवृत्त करणं आतां तुमच्या-वर सोपविलं आहे."

जातांना मुलींच्या पालकांचे डोळे भरून आले. माझंहि अंत:करण भरून आलें.

हीं मुलं म्हणजे समाजाची – राष्ट्राची ठेव आहे. तीं देवा-घरचीं फुलें आहेत. त्यांचा नीट सांभाळ करण्यांत, त्यांना सु-संस्कृत करण्यांतच माझ्या जीवनाचें सार्थक आहे.

★ ★

## स्त्री !

अनेक दिवसांपासून मी तुझ्या दारापुढें आक्रोश करीत आहे. एखाद्या ठिकाणीं दबून राहिलेलें पाणी वर उसळून येण्याच्या धडपडींत असावं तशीच माझ्या अंतःकरणांतली भक्ति पुन्हा पुन्हा वर उसळून येत आहे ! हे आतुर डोळे तुला पाहूनच संतुष्ट होतील. हें अतृप्त मन तुला पाहिल्यानंतर शांत होईल; पण माझी ही स्थिति पाहूनच तूं अडून बसलास कीं काय, हें समजत नाहीं ! माझ्या उत्कट भक्तीचा उत्स्फूर्त उद्रेक पाहूनहि तुझ्या अंतःकरणांतली दया पाझरूं नये काय ? तुझं दर्शन होईल म्हणून मी वाट पहात बसलें. वाट पाहून पाहून माझे डोळे शिणले आहेत. पण तूं मात्र माझी अजून परीक्षाच घेत आहेस.

मी केलेल्या अन्यायाचा पाढा तुझ्यापुढें वाचायचा नाहीं तर कोणापुढें वाचूं ? पण येथें पहावें तर साराच कारभार निराळा ! जखमेवर मीठ चोळावं तसं तुझ्या वर्तनामुळं माझं दुःख द्विगुणित होत आहे.

माझी ही आंतरिक तळमळ तुला कां कळूं नये ! माझ्या दुःखानें दगडालाहि पाझर फुटेल पण तुझ्या दयार्द्र अंतःकरणांतून दयेचा एक अंधुकसा झराहि फुटणार नाहीं असं दिसतं. तूं त्रिकालसर्वज्ञ असूनहि माझी ही असहाय्य स्थिति तुला कळूं नये याचं आश्चर्य वाटतं ! तूं सर्वज्ञ असून काय उपयोग ?

तुझ्या या हट्टानें मी चांगलीच होरपळून निघालें आहे. तुझ्या दर्शनाशिवाय अन्नपाणी ग्रहण न करण्याचं व्रत मीं घेतलं आहे.

तुला नैवेद्य दिल्याशिवाय अन्नाचा घास मी कसा घेईन ? तूं माझा स्वामी आहेस ! तुला नैवेद्य अर्पण केल्याशिवाय माझ्या पोटांत अन्नाचा घास कसा उतरेल ?

मी अगदीं हतप्रभ झालें आहे. उदास झालें आहे. रोज तुझ्या दारापर्यंत तरी येत होतें. पण आतां तेंहि शक्य नाहीं. तुझ्या द्वारपालाची माझ्यावर सक्त नजर आहे. तुला हें ठाऊक असूनहि तूं स्वस्थ कां ? तुझ्या भक्तावर चाललेला हा अन्याय तूं उघडया डोळयांनीं पहावास हें आश्चर्य नव्हे का ? न्यायदेवताच आंधळी तर पामरांनी कुठं न्याय मागावा ? तुझ्या न्यायदानावरचा विश्वास उडून जावा अशा क्रिया तुझ्याकडून घडत आहेत.

मी स्त्री आहे. अशुद्ध आहे. म्हणून का तूं मला जवळ येऊं देत नाहीं ? मी शरिरानें अशुद्ध झालें म्हणून काय झाल ? मनानें तर पवित्र आहे ! देहाच्या क्षणभंगुरत्वाविषयीं आणि त्याच्या मलिनतेविषयीं तूं तुझ्या दिव्य ज्ञानानें आम्हांस कल्पना दिली आहेस ना ? मग माझ्या पवित्र मनाची तुला जाणीव नाहीं का ? मी स्त्री झालें, हा माझ्या गतजन्मांचा अपराध आहे. या जन्मांत कांहीं पौरुष करून हें स्त्रीत्व पुनः प्राप्त होणार नाहीं असा प्रयत्न तरी मला करूं दे.

सोनं तप्त केल्यानं शुद्ध होतं आणि मन पश्चात्तापानं पवित्र होतं, हें तूंच सांगत आलास ना ? आतांहि एखादं प्रायश्चित्त सांग मला तूं ! मी तें आनंदानें भोगेन ! प्रभो ! तूं आतांपर्यंत अनेक पातकी जीवांना पवित्र केलंस ! पण मीच तुझ्या कृपाप्रसादापासून वंचित कशी राहिलें ?

नश्वर देहाची मला काळजी नाहीं. त्याविषयीं मला ममता वाटत नाहीं; पण तुझ्या मुखकमलाचं दर्शन होऊं शकत नाहीं म्हणून मला वेदना होतात, म्हणून माझ्यावर दया कर ! माझा अंत पाहूं नकोस !

मना, स्त्री म्हणून किंवा पुरुष म्हणून जन्माला येणं हें कांहीं तुझ्या आधीन आहे काय ? तें कर्माधीन आहे. त्यांत आतां बदल घडवून आणणें तुला अशक्य आहे. प्रभूच्या मंदिराचं दार उघडो किंवा न उघडो ! तूं शरिरानें पवित्र आहेस कीं अपवित्र आहेस हा कांहीं महत्त्वाचा प्रश्न नाहीं ! तूं मनानें पवित्र आहेस ना ? मनानें शुद्ध आहेस ना ? शुद्ध मन असेल तेथेंच भगवंताचा वास असतो. या शुद्ध मनानें भगवंताचें स्मरण करशील तर अनेक भवांच्या संचित पापांतून तुझी सुटकाहोईल.

मना तुझ्या आत्मप्रभूची स्तुति कर ! त्यालाच भक्ति-भावानें आळवून त्याची पूजा कर ! तुझ्या शुद्ध भावजलानें त्याला अभिषेक घाल ! तुझीं भक्तिसुमनं त्याला अर्पण कर.

तुझ्या नयनरम्य हृन्मंदिराचं दार तुलाच उघडावं लागेल! सम्यक् दर्शन, सम्यक् ज्ञान आणि सम्यक् चारित्र्य या रत्न-त्रयीची प्रतिष्ठापना तूं तुझ्या हृन्मंदिरांत करणार असशील तरच तें दार उघडेल ! या तुझ्या हृन्मंदिरांतील आत्मप्रभूचं एकदां जरी तूं दर्शन घेतलंस तरी तुला तुझ्या उद्धारासाठीं निराळी धडपड करायला नको !

सरोवरांतील शुद्ध नि स्थिर अशा जलांतल्या प्रतिबिंबा-प्रमाणें तुझ्या स्थिर पवित्र हृदयांत तूं तुझा आत्मप्रभु पाहूं शकतोस. त्यासाठीं करावयाच्या तयारीस तूं आतांपासूनच लाग.

# हृन्मंदिर !

'तुझें हृन्मंदिर उघड,' असं म्हणतांच तूं गोंधळून गेलास. कां बरं असं? तुझं गोंधळून जाणं हें सयुक्तिकहि आहे. आतां-पर्यंत तुला दगडी मंदिरंच ठाऊक होतीं. दगडाविटांनीं बांधलेलीं, सोन्या-चांदीनं मढविलेलीं, दिव्यांच्या प्रकाशानं सजविलेलीं मंदिरंच तुला ठाऊक होतीं, त्या मंदिरांत तूं नेहमीच जात होतास.

मना! आज मी दगडी मंदिरासंबंधीं बोलत नाहीं! तेथील लाकडी दारं उघडण्यासंबंधीं सांगत नाहीं. आज एका वेगळयाच मंदिरांत जाण्यास तुला सांगणार आहे मी! पण एक गोष्ट ध्यानांत ठेव! तें मंदिर तुझ्यापासून फार लांब नाहीं! हें सुंदर मंदिर तुझ्याजवळ आहे. एवढेंच नव्हे तर तें तुझ्यांतच आहे. धर्माचीं सर्व तत्त्वं याच मंदिरांत आहेत! खरा धर्म तेथेंच दडला आहे. तें मंदिर म्हणजे 'हृन्मंदिर' होय. या मंदिराच्या सभोवती तुझ्या देहाचा भक्कम कोट उभा आहे. तुझं हृदय हा त्याचा गाभारा होय. त्या गाभाऱ्यांत तुझ्या अष्ट गुणांचं सिंहासन आहे. अनंत ज्ञान, अनंत दर्शन, अनत सुख, अनंत वीर्य, अव्याबाधत्व, अगुरुलघुत्व, अवगाहनत्व, सूक्ष्मत्व हें अष्टदल कमल होय. त्यावर अत्यंत निर्विकार नि अशरीरी आत्मा विराजमान आहे. त्याच्या स्वरूपाचं काय वर्णन करावं? तो अत्यंत तेजस्वी प्रकाशमान् नि निर्मळ असा आहे, या आत्मदेवाची

तूं मनोभावें पूजा कर. त्याची भक्ति कर. या आत्मप्रभूच्या दर्शनानें तुला उच्च कोटीची शांति लाभेल.

मना, उत्तम क्षमा, उत्तम मार्दव, उत्तम आर्जव, उत्ताम शुचित्व, उत्तम सत्य, उत्तम संयम, उत्ताम तप, उत्ताम त्याग, उत्ताम अकिंचन्य, उत्तम ब्रह्मचर्य या दश स्तंभांवर तुझं हृन्मंदिर अधिष्ठित आहे. प्रायश्चित्त, विनय, वैय्यावृत्य, स्वाध्याय, संयम, ध्यान, हे आंतील गाभाऱ्याचे स्तंभ होत. धर्मध्यान आणि शुक्लध्यान हे आत्मप्रभूच्या सिंहासनावरील सिंह होत. त्यावर स्फटिकासारखं शुद्ध असलेलं ज्ञानासन आहे.

संयम हा तुझ्या मंदिराचा रखवालदार आहे. अनशन, अनमोदर्य, वृत्तिपरिसंख्यान, रसपरित्याग, विरिक्त शय्यासन, कायक्लेश हीं मंदिराचीं दारं होत.

तुझ्या हृन्मंदिरांत स्वच्छ जलाचं तळं आहे. तुझ्या अंतःकरणांतून निघालेला भावनेचा प्रवाह या तलावास जाऊन मिळतो ! त्यानें तें परिपूर्ण आहे. चौवीस जिनेशांची तूं केलेली स्तुति म्हणजे त्यांतील कमळं होत. निर्भयपणें त्या हृन्मदिरांत प्रवेश कर ! शांत, स्थिर नि आनंदी चित्तानें प्रभूचें दर्शन घे. भक्तिभावानें आत्मदेवाची पूजा कर. तुला तेथें कोणी अडविणार नाहीं. ज्या प्रभूच्या दर्शनाकरितां तूं रात्रंदिवस तळमळत आहेस त्या आत्मप्रभूचं दर्शन तुला आतां सहजशक्य झालं आहे. हृन्मंदिरांतील अत्युच्च सिंहासनावर 'परमात्मा' अधिष्ठित आहे. तुझ्या आत्म्यानें लांब पल्ल्याचा प्रवास केला आहे. या अवधींत त्यांच्यांत निरनिराळीं स्थित्यंतरें झालीं ! मुक्तिप्रवासास

निघाला तेव्हां तो ‘ बहिरात्मा ’ होता ! देह आणि जीव यांना एक संबोधून त्याचे व्यवहार घडत. त्यामुळं दृष्टिहीन माणसाप्रमाणें तो ठेंचकळत, ठेंचकळत प्रवास करीत असे ! वाट चुकून भलतीकडेच जात असे ! पण नंतर त्याला शरीर आणि आत्मा यांतील फरक कळूं लागतांच बहिरात्म्याचं अंतरात्म्यांत रूपांतर झालं ! पण कर्मांच्या कचाटयांत त्याला जलद प्रगति साधतां आली नाहीं. आतां सम्यक्त्वाच्या प्राप्तीनं अंतरात्म्याचं परमात्म्यांत रूपांतर झालं आहे. हा परमात्माच तुझ्या हृन्मंदिरांतील अत्युच्च सिंहासनावर विराजमान आहे.

परमात्म्याप्रत जाण्याचा उपाय मी तुला सांगितला. त्या मार्गांनं पवित्र होऊन तूं जाशील तर तुला आत्मप्रभूचं दर्शन अवश्य घडेल.

आतां तूं मुळींच विलंब करूं नकोस. फार उशीर झाला तर तुझें इच्छित साध्य होणार नाहीं.

तुझ्या हृन्मंदिराचं शिखर किती उंच आहे ! भव्यता, सौंदर्य आणि उंची यांचा त्रिवेणी-संगम झाला आहे तेथें ! शिखराशिवाय मंदिरास कसली शोभा येणार ? तुझें शिखर असामान्य आहे. त्याचं वर्णन कोणत्या शब्दांत करतां येणार ? त्या शिखराचं शेवटचं टोक म्हणजे सिद्धशिला होय ! अनंत आकाश कापीत कापीत जाणाऱ्या वेगवान अस्त्राप्रमाणें तुझ्या शिखरानें लोकाकाशांतून असाच वेगवान प्रवास केला आहे. त्याचं शेवटचं टोक लोकाकाशाला भिडलं आहे, लोकाकाशाच्या अग्रभागीं तें आहे !

तुझ्या हृन्मंदिराच्या शिखरावरील कळस म्हणजे सिद्ध भगवान् होत ! त्यांचें तूं रोज दर्शन घेत जा ! त्यांना वंदन करीत जा ! त्यांची मनोभावें पूजा करीत जा !

तुझ्या मंदिरांतली घंटा घणघणूं लागली. प्रभातकालीं, मध्यान्हसमयीं, संध्यासमयीं आणि मध्यरात्रींहि ती घणघणूं लागली कीं सारं विश्व खडबडून जागं होतं. विश्वांतील सर्व लोक अज्ञान -झोप झटकून जागे होतात आणि तुझ्या मंदिराकडे धाव घेतात. परमात्म्याचं दर्शन घेऊन पावन होतात.

* *

# नौका !

हे नौके, मी तुझीच वाट पहात या तीरावर उभी आहे.

माझ्या आत्मदेवाला किती वेळपर्यंत तूं विरहावस्थेंत ठेवलंस !

प्रभू, त्याला मी कबूल केलं होतें कीं अंध:काराचे पटल घनीभूत होण्यापूर्वींच मी तुझ्याकडे निघून येईन.

नौके, तुला माहित आहे ना माझ्या आत्मदेवाचं स्थान ! मग उशीर कां ? चल, तुफान होण्यापूर्वीं पोंचती कर मला माझ्या प्रियकराकडे !

तिथें पोंचलें म्हणजे मी सुटलें या सुखदु:खाच्या क्षणिक वासनेंतून.

* *

# भैरवी

हें माझं हृदय संगीत आहे. हृदयांतील तरंगांना आलापबद्ध करण्याचा हा प्रयत्न मानवी जीवनाला सुखाचा न् शांतीचा प्रेरक ठरो.

भैरवीच्या सुस्वर सुरांनो ! समाधी-योगांतील निर्विकल्प अवस्थेच्या आनंदाचे आलाप द्या !

आदि - अंतीं असणाऱ्या ॐ कार ध्वनीनं सारं नभोमंडल भारून टाका.

ही माझी भैरवी आत्मदेवाच्या साधनेची सुरुवात करायला साधक ठरो.

* *

समाप्त

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १५१३५
संदर्भ शाखा
REFBK-0015135
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ८२०३२ वि: निबंध
क्रमांक १६५८ नों: दि: २२।१२।६६